# द्वितीय वर्ष कला

## सत्र - III (CBCS)

## राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. II

# राजकीय सिद्धांत

## विषय कोड : UAPOL301

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई



**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि
प्रमुख कला शाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **श्री. भूषण ठाकरे**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. हर्षद भोसले**
सहाय्यक प्राध्यापक
किर्ती कॉलेज, दादर, मुंबई

**लेखक** : **डॉ. संदिप घोडके**
सहाय्यक प्राध्यापक
वीर वजेकर कॉलेज
उरण, रायगड

: **डॉ. हर्षद भोसले**
सहाय्यक प्राध्यापक
किर्ती कॉलेज, दादर, मुंबई

: **डॉ. शंकर वेल्हाळ**
सहाय्यक प्राध्यापक
गोगटे वाळके कॉलेज
पनवेल, बांदा

: **प्रा. दत्तात्रय तोंडे**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई



**डिसेंबर २०२१, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय सिद्धांत - राजकीय सिद्धांताचा परिचय | ०१ |
| २.१ | राज्य, नागरी समाज व बाजारपेठ | १५ |
| २.२ | नागरी समाज आणि बाजार | २४ |
| ३. | सत्ता अधिसत्ता व अधिमान्यता | ३४ |
| ४. | संकल्पना :- कायदा आणि राजकीय आबंधन | ४४ |


❖❖❖❖

# SYBA

# PAPER II- POLITICAL THEORY

## SEMESTER III- PRINCIPLES AND CONCEPTS OF POLITICAL THEORY

**Module 1 - Introduction to Political Theory** **[11 lectures]**

1.1 Definition and Scope of Political Theory
1.2Approaches to the Study of Political Theory: Traditional
1.3 Approaches to the Study of Political Theory: Contemporary

**Module 2 – State, Civil Society & Market** **[12 Lectures]**

2.1 State: Concept and Perspectives
2.2 Nation - State: Meaning and Changing Perceptions
2.3 State, Civil Society and Market

**Module 3 – Power, Authority and Legitimacy** **[10 Lectures]**

3.1 Power
3.2 Authority
3.3 Legitimacy

**Module 4 : Concept of Law and Political Obligation** **[12 Lectures]**

4.1 Concept of Law
4.2 Political Obligation
4.3 Right to Resist

❖❖❖❖

# १

# राजकीय सिद्धांत- राजकीय सिद्धांताचा परिचय
# (Introduction & Political Theory)

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ राजकीय सिद्धांताची व्याख्या अर्थ

१.३ राजकीय सिद्धांताचे स्वरूप

१.४ राजकीय सिद्धांताचा पारंपारिक दृष्टीकोन

१.५ राजकीय सिद्धांताचा आधुनिक समकालीन दृष्टीकोन

१.६ सारांश

१.७ प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये :-

१) राजकीय सिद्धांताची व्याख्या व अर्थ समजून घेता येईल.
२) राजकीय सिद्धांताचे स्वरूप व व्याप्ती विषद करता येईल.
३) पारंपारिक राजकीय सिद्धांत कोणते ते शोधता येतील.
४) आधुनिक/समकालीन राजकीय सिद्धांत कोणते ते शोधता येतील.

## १.१ प्रास्ताविक :-

राज्यशास्त्राचा अभ्यास करताना राजकीय सिद्धांताची संकल्पना/ संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. राजकीय तत्वज्ञानाची सुरुवात ग्रीकापासून झालेली असल्यामुळे राजकीय सिद्धांतात ग्रीकांचे योगदान महत्वाचे आहे. ग्रीकापासून ते आजपर्यंत वेगवेगळी दृष्टीकोन विकसित झाल्यामुळे राजकीय सिद्धांताची व्याप्तीमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येते. राजकीय विचारवंतानी राजकीय सिद्धांताचे पारंपारिक व आधुनिक असे दोन भाग पाडलेले आहेत. पारंपारिक सिद्धांत हे आदर्शवादी, मूल्यावर भर देणारे तर आधुनिक सिद्धांत अनुभववादी, वर्तनवादी, विश्लेषण, यासारख्या गोष्टीवर भर देणारे आहेत. म्हणून दोन्ही दृष्टिकोनाचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो. ही प्रक्रिया निरंतर आजपर्यंत सुरु आहे.

परंतु दुस-या महायुद्धानंतर मात्र राजकीय सिद्धांताचे विश्व बदलू लागले. अनुभववादी, वर्तनवादी व विश्लेषणवादी प्रक्रियेने पारंपारिक राजकीय सिद्धांताच्या प्रस्तुततेबद्दल प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. याच काळात डेव्हिड ईस्टन या अमेरिकन विचारवंताने राजकीय सिद्धांत मृत पावले आहे त्यांचे पुनर्जीवन होऊ शकत नाही, असा दावा केला. पारंपारिक सिद्धांत हे आदर्शवादी असल्याने नवीन राजकीय प्रश्न सोडविण्यास ते अपुरे आहेत, ते व्यवहारी नाहीत असे म्हटले जाऊ लागले. परंतु १९७० नंतरच्या व्यावहारवादी सिद्धांतातील उणीवा लक्षात येऊ लागल्याने पारंपारिक सिद्धांताची मान्यता पुन्हा एकदा सिध्द होऊ लागली. त्यामुळे पारंपारिक व आधुनिक राजकीय सिद्धांत दोन्हीही महत्वाचे आहेत असा विचारप्रवाह रूढ झाला.

आधुनिक काळात भौतिक शास्त्राप्रमाणेच सर्वच सामाजिक शास्त्रात सिद्धांत निर्मितीवत भर दिला जातो. नवनव्या संशोधन पद्धतीचा अवलंब करून तथ्यसंकलन करायचे आणि नंतर त्या तथ्यामधील आंतरसंबंध शोधून काढणे प्रत्येक शास्त्रामध्ये अभिप्रेत असते.म्हणून राज्यशास्त्रातही सभोवताली घडणा-या घटनाचे यथातथ्य व वस्तुनिष्ठ वर्णन, मानवी क्रिया-प्रतिक्रीयाचे वर्गीकरण करून सामान्य नियम निश्चित करण्याचा प्रयत्न होत असतो. व अशा निश्चित केलेल्या राजकीय व्यवहाराच्या आधारावरच राजकीय सिद्धांताची निर्मिती होत असते. राजकीय सिद्धांताद्वारे राजकीय व्यवहार, वर्तन, संस्था याबद्दल असणारे अनेक प्रश्न सोडवून त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. व त्याद्वारे तथ्यांचा शोध घेणे त्याचा परस्पर संबंध शोधणे त्यातील वास्तविकता तपासून पाहणे, या सर्व बाबींचा ऊहापोह केला जातो. म्हणून राजकीय सिद्धांताना राज्यशास्त्रात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने त्याचा अर्थ स्वरूप व व्याप्ती समजून घेणे आपणास क्रमप्राप्त ठरते.

## १.२ राजकीय सिद्धांताचा अर्थ/ व्याख्या :-

सिद्धांत हा शब्द मुख्यत: दोन गोष्टींचे निर्देशन करतो. एक म्हणजे विविध घटनांमध्ये असलेला कार्यकारण संबंध आणि दुसरी म्हणजे या संबधाचे असे नियम किंवा तत्वे ज्याला शास्त्रीय आधार असतो. Theory चे मराठी भाषांतर म्हणून सिद्धांत हा शब्द वापरला जातो. 'थिआ' या ग्रीक शब्दापासून थिअरी ही संज्ञा अस्तित्वात आली आहे. थिआ चा ग्रीक भाषेत अर्थ होतो चष्मा म्हणून थिअरी म्हणजे वस्तुस्थितीकडे पाहण्याचा चष्मा किंवा दृष्टीकोन होय. आपल्या ज्ञानाची उभारणी ही तथ्यांवर आधारित असावयास पाहिजे. ही शास्त्रीय पद्धतीची पूर्व अट असते. पण त्याच बरोबर आपण हेही लक्षात घ्यायला हवे की तथ्ये कधीच एखाद्या घटनेचे स्पष्टीकरण करण्यास किंवा आकलन करण्यास पुरेशी ठरत नाहीत. त्यासाठी तथ्यांची अशा प्रकारे मांडणी करावी की त्यांच्यातील आंतरसंबंध लक्षात येणे गरजेचे आहे. अशा प्रकारे तथ्यांची मांडणी करणे हीच सिद्ध्नात निर्मितीची प्रकिया होय.

ज्ञान संकलित करणे, त्याची सुरळीत मांडणी, असंबंध तथ्यांना जोडणे, त्यातील प्रस्तुत तथ्ये कोणती ही ठरविणे. संशोधनाला विशिष्ट दिशा देणे, हाती आलेल्या शास्त्र माहितीच्या आधारे काही प्रमाणात राजकीय घडामोडीचे पूर्वकथन करणे हे आपण राजकीय सिद्धांताच्या आधारे करू शकतो. यावरून राजकीय सिद्धांताच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

'राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह्जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणिवपूर्वक संजून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय.'

ॲड्रयू हॅकरच्या च्या मते, ' ज्या तत्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकलनामुळे मग ते केव्हाही आणि कुठेही केलेले असो. आम्ही रहात असलेल्या व उद्याही रहाणार असलेल्या जगाविषयी आमची समजूत वाढते त्याला राजकीय सिद्धांत म्हटले जाते.'

सेबाईनच्या मते, 'राजकारणाविषयीचे किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले सगळेच चिंतन काही राजकीय सिद्धांतात समाविष्ट करता येणार नाही कारण तसे केल्यास त्यात संपूर्ण मानवी चिंतनच अंतर्भूत करावे लागेल. तेव्हा आपण असे म्हणूया की राजकीय प्रश्नांचा शिस्तबध्द शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय.'

कोकरच्या मते, 'जनतेच्या इच्छा आणि गरजा, मते विचारात होऊन शासनसंस्थेचा अभ्यास केला जातो त्यास राजकीय सिद्धांत म्हटले जाते.'

जेकसनच्या मते, 'राजकीय सिद्धांताचा मुळ विषय, राजकीय प्रज्ञा शोधणे, राजकीय विचार, तत्व प्रतिपादन आणि तत्वज्ञान यांचा समावेश राजकीय विचारसरणी, तिच्यातील त्रुटी, नवीन विचारांचा समावेश म्हणजे राजकीय सिद्धांत होय.'

याचा अर्थ असा की, राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नांवर जे विचार त्यांची उत्क्रांती सामावलेली असते. यावरून कोणताही महान राजकीय सिद्धांत समकालीन परिस्थितीचे विश्लेषण देण्याबाबत उपयुक्त असे व त्याचे महत्व हे त्रिकालाबाधित असते.

## १.३ राजकीय सिद्धांताचे स्वरूप/ व्याप्ती :-

प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी मांडलेल्या सिद्धांताचा विचार करता राजकीय सिद्धांताचे स्वरूप तात्विक आणि मूल्याधिष्ठित होते. २० शतकातील राज्यशास्त्रज्ञानी राजकीय घटना व त्याचा परस्पर संबंध निश्चित करून निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली. परिणामता सुरुवातीची सिद्धांत मांडणी पद्धती मागे पडली.आजचे राजकीय सिद्धांत हे मुल्यनिरपेक्ष आहेत. सुरुवातीच्या

काळात सिद्धांताची मांडणी चांगले, वाईट, योग्य, अयोग्य, न्याय, अन्याय अशा मूल्यांच्या आधारावर केली जात असे. आधुनिक राजकीय सिद्धांताची मांडणी अवलोकन निरीक्षण, मुलाखती, सर्वेक्षण मापन आणि गणितीय पद्धतीचा अवलंब अशा शास्त्रीय पद्धतीच्या आधारावर केली जाते. पारंपारिक राजकीय सिद्धांतात तत्वज्ञान आणि सिद्धांत यात फरक केला जात नसे. यामध्ये काही गृहीतके गृहीत धरून विचारांची पद्धतशीर मांडणी केली जात असे. यामुळे सत्य काय आहे, याकडे दुर्लक्ष होत असे, म्हणून सुरुवातीला राजकीय सिद्धांताचे स्वरूप तात्विक दिसून येते.

राजकीय सिद्धांत हे राजकीय व्यवहाराचे गतिशास्त्र आहे. गुंतागुंतीच्या राजकीय प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता विशिष्ट मानवी व्यवहाराची व दृष्टीकोनाची गरज असते. अशा प्रकारचा विशिष्ट दृष्टीकोन मांडण्यासाठी राजकीय व्यवहाराचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो. राजकीय सिद्धांतात काल्पनिकतेला स्थान नसते. कारण त्यास राजकीय जीवनाचे वास्तव स्पष्ट करावयाचे असते. म्हणून राजकीय सिद्धांताचे स्वरूप वास्तविकतेचे अध्ययन करून स्पष्ट केले जाते.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप हे सार्वत्रिक व काळ निरपेक्ष असते.मानवी जीवनातील घटना समजून घेण्यासाठी ज्या ऐतिहासिक घटन होऊन गेलेल्या असतात. त्या घटना त्या काळाची साक्ष देत असतात. परंतु राजकीय सिद्धांत द्वारे त्या घटनांची सत्यता व वस्तुस्थिती याच्या द्वारे अभ्यास करून नियम बनवले जातात ते सार्वत्रिक व काळनिरपेक्ष असतात.

समाजातील व्यक्ती व्यक्तीच्या व्यवहाराचा शोध घेण्याचे कार्य राजकीय सिद्धांत करतात. यामध्ये राजकीय व्यक्ती आणि राजकीय संस्था यांच्यातील संबंध कसे आहेत, यापेक्षा ते कसे असावेत हे सांगण्याचे काम राजकीय सिद्धांतातून केले जाते. म्हणून आदर्श राजकीय जीवनप्रणाली निर्माण करणे हा राजकीय सिद्धांताचा उद्देश असतो.

राजकीय विचारांचा तात्विक पाया, राजकीय व्यवहारातील गतिशीलता, राजकीय विचारातील, वस्तुनिष्ठता, राजकीय घटनातील सार्वत्रिकता यातुन राजकीय सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करता येते. यावरून राजकीय सिद्धांताची व्याप्ती खालीलप्रमाणे दिसून येते –

राजकीय सिद्धांताची मांडणी करताना मानवी व्यवहार केंद्रस्थानी असल्यामुळे त्यात वस्तुनिष्ठता, कार्यकारणभाव आणि एखादी घटना योग्य किंवा अयोग्य यांचे प्रतिपादन या तीन गोष्टी ठळकपणे आढळतात. यावरून राजकीय सिद्धांताचे अभ्यास क्षेत्र हे विस्तृत झालेले दिसून येते.

**१) मानवी व्यवहाराचा अभ्यास** – राजकीय घटनांचा अभ्यास करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या राजकीय परिस्थितीत माणसे कोणत्या प्रकारचे राजकीय वर्तन करतात याचा अभ्यास राजकीय सिद्धांताद्वारे केला जातो.

**२) राजकीय विचारप्रणाली** – कोणत्याही राजकीय व्यवस्थेत स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी काही विचारांचा आधार घ्यावा लागतो. त्यातून त्या व्यवस्थेची एक वेगळी विचारसरणी विकसित होते. उदा. नाझीवाद, उदारमतवाद, साम्यवाद, समाजवाद इ. यांचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

**३) राज्यविषयक अभ्यास** – राजकीय सिद्धांतात राज्य व राजकारण यांच्या संबंधित घटकांचा अभ्यास करण्यात येतो.

**४) शासनसंस्थाविषयक अभ्यास** – जगात अनेक प्रकारच्या शासनसंस्था आहेत. विशिष्ट शासनसंस्था टिकण्यासाठी विशिष्ट प्रकारची सामाजिक रचना का आवश्यक आहे. याचा शोध राजकीय तत्वज्ञ राजकीय सिद्धांताद्वारे करीत असतात.

**५) राज्याचे कार्यक्षेत्र** – हे कार्यक्षेत्र मर्यादित असावे किंवा व्यापक असावे, विस्तृत असावे. व्यक्ती स्वातंत्र्याला वाव द्यावा की ते मर्यादित असावे यावर राजकीय सिद्धांतात विचार केला जातो.

**६) राजकीय संकल्पना** – राजकारणात अनेक संकल्पना आहेत त्यांचा अर्थ वेगवेगळ्या संदर्भात लावला जातो. प्रत्येक संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न अभ्यासक करतात. सत्ता, सरकार, अधीमान्यता, सार्वभौमत्व, स्वातंत्र्य, समता, न्याय यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी राजकीय सिद्धांत उपयुक्त ठरतात.

**७) आंतरराष्ट्रीय राजकारण** – आंतरराष्ट्रीय संबंध हा देखील राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाचा भाग आहे. राज्याराज्यातील तणावपूर्ण संबंधामुळे राजकीय व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असतो. तो होऊ नये म्हणून राजकीय व्यवस्था प्रयत्न करत असते, या सर्व प्रश्नांची सोडवणूक राजकीय सिद्धांताद्वारे केली जाते.

## १.४ राजकीय सिद्धांताचा पारंपारिक/ आदर्शवादी दृष्टीकोन :-

पारंपारिक राजकीय सिद्धांताला अभिजात राजकीय सिद्धांत असेही म्हटले जाते. राज्यशास्त्राचा हा दृष्टीकोन मुल्ये आणि आदर्श यावर आधारलेला आहे. भूतकाळात काय होते आणि आज काय आहे यापेक्षा उद्या काय असावे याचाच विचार या दृष्टीकोनात केला जातो. आदर्श समाजरचनेचे स्वरूप कसे असावे किंवा मानवी जीवनाची उद्दिष्ट्ये कोणती असावीत, अशा प्रश्नांना त्यात स्वाभाविकच अधिक प्राधान्य दिले जाते.

दुस-या महायुद्धानंतर राज्यशास्त्रात नवीन पद्धती विकसित झाली. त्यामुळे यापूर्वीच्या सिद्धांतांना पारंपारिक व समाजाच्या दृष्टीने कोणत्या गोष्टी महत्वाच्या आहेत हे नैतिक निकषावरच ठरत होते. म्हणून हा दृष्टीकोन नितीशास्त्रीय पायावर आधारित होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पारंपारिक राजकीय सिद्धांत हे मूल्याधिष्ठित तर्क आणि तत्वज्ञानाला मध्यवर्ती स्थान देणारे होते, हे ऐतिहासिक पद्धती,

विश्लेषणात्मक, आदर्शवादी, उपदेशात्मक, वर्णनात्मक या घटकांच्या आधारे मांडले जात होते. अनुभवाच्या आधारे विश्लेषण करण्यापेक्षा तत्वनिष्ठ मुल्यमापनावर भर देऊन समाजजीवनातील विविध राजकीय समस्या सोडविण्याचे काम पारंपारिक राजकीय सिद्धांतामुळे शक्य झाले.

प्लेटो ॲरिस्टॉटल यांच्या बरोबरच सामाजिक करार सिद्धांत मांडणारे हॉब्ज लॉक, रुसो आणि हेगेल अशा अनेक राजकीय विचारवंताचे विचार सांगून पारंपारिक दृष्टीकोन स्पष्ट करता येईल. या सर्वांनीच "जे आहे" याबद्दल जेवढे विचार मांडले त्या प्रमाणेच जे असावे याबद्दलही विचार मांडलेले दिसून येतात. ॲरिस्टॉटलने आपल्या विचारात निगमण, निरीक्षण वर्णन व तुलना या गोष्टीचा अवलंब केलेला आहे. प्लेटोने अनेक स्वयंसिद्ध गृहीतकापासून सुरुवात करून त्याच्या आधारे निष्कर्ष काढले. उदा. आदर्श राज्याची संकल्पना साम्यवाद इ. रुसोने सामाजिक कराराचे प्रतिपादन करून सामुहिक ईहेचा सिद्धांत मांडला. हेगल च्या राजकीय विचारातही आपणास राजसंस्थेचे जवळपास दैवतीकरण केलेलं आढळते. तर म. गांधीजींच्या विचारांचा विचार करता त्या प्रत्येक विचाराला तत्वज्ञानाची आदर्श मूल्यांची जोड दिलेली आपणास पहावयास मिळते.

पारंपारिक दृष्टीकोन वास्तवापेक्षा कल्पिताला व्यवहारापेक्षा स्वप्नरंजनाला आणि वर्तमानापेक्षा भविष्याला अधिक प्राधान्य देतो, असे त्याचे टीकाकार म्हणतात या आक्षेपात थोडाफार तथ्यांश असला तरी हा दृष्टीकोन त्यामुळे त्याज्य ठरत नाही. राजकीय तत्वज्ञानाच्या आदर्शाला चिंतनामुळे राज्यशास्त्रीय विचारांना नैतिक प्रतिष्ठा प्राप्त होते व त्याचा नैतिक दर्जा उंचावतो हे नाकारताच येणार नाही. स्वार्थी, संकुचित, व विकारग्रस्त मानवी जीवनाचे उन्नयन व उदात्तीकरण करून समाज जीवनाला परिपूर्णतेच्या दृष्टीने नेण्यास पारंपारिक दृष्टीकोन उपयुक्त ठरू शकतो. मुल्ये, तत्त्वे, आदर्श, यांचा आधार घेतला नाही तर सामाजिक अधपतन झाल्यावाचून राहणार नाही. म्हणून राजकीय सिद्धांताच्या पारंपारिक दृष्टीकोन आजही तेवढाच महत्वाचा आहे.

**<u>राजकीय सिद्धांताचे पारंपारिक अभ्यासाचे दृष्टीकोन</u> –**

**१ ) ऐतिकासिक दृष्टीकोन –** राजकीय संस्था व घटना यांच्या इतिहासाची मीमांसा करून त्या आधारावर विवेचन आणि विश्लेषण करून निष्कर्ष काढणे याला ऐतिहासिक दृष्टीकोन असे म्हणतात. हेनरीमेन फ्रीमन, लास्की, सिली, मॉन्तेस्क्यू, कार्ल मार्क्स इ. राज्यशास्त्रज्ञांच्या विचारांचा प्रामुख्याने हा दृष्टीकोन राहीला आहे. भूतकाळात घडलेल्या घटना किंवा दस्तऐवज, लेख व लिखाण याच्या आधारावर राजकीय विश्लेषण करणे व ऐतिहासिक दस्तावेज जे काही उपलब्ध असेल त्या आधारेच इतिहासाची माहिती मिळू शकते असे हा दृष्टिकोण मानतो. म्हणजे ऐतिहासिक दृष्टीने गोळा केलेली माहिती आणि पुरावा हा दृष्टीकोन स्वीकारणारा आहे. राज्यशास्त्रज्ञ याच्या स्वत:च्या अनुभवाचा व अवलोकनाचा याठिकाणी काही महत्व नसते तर, दुसर्याने जे काही लिहून ठेवलेले असेल ते सत्य असे मानून त्या आधारावर राज्यशास्त्रज्ञ आपले निष्कर्ष मांडीत असतो.

भूतकाळातून वर्तमानकाळ निर्माण होतो आणि वर्तमानकाळ  भविष्यकाळ घडवितो.या दृष्टीने वर्तमानकालीन राजकीय संस्था आणि घटना यांचा अभ्यास करण्याकरिता त्यांचा तत्संबंधीचा इतिहास जाणून घ्यावा लागतो. राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाला इतिहासाची फार मोठी मदत होत असते. इतिहास हा  राज्यशास्त्राचा पाया होय, असे सिली यांनी म्हटले आहे. वर्तमानकाळातील राजकीय संस्था नीट समजून घेण्याकरिता ऐतिहासिक दृष्टीकोन फार उपयुक्त ठरतो.

भूतकालीन राजकीय जीवनात कार्यकारण संबंधाच्या आधारावर राजकीय प्रयोग झालेले असतात, त्याचे फलित म्हणजेच वर्तमान काळातील राजकीय सिद्धांत होय.दैदिप्यमान इतिहासातून अभिमानास्पद वर्तमानकाळ निर्माण होतो. वर्तमानकाळात राजकीय समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आपण जे जे उपाय अमलात आणण्याचा विचार करतो, त्यांच्या समर्थनार्थ  आवश्यक ते पुरावे आपण इतिहासातून शोधून काढतो. ऐतिहासिक कागदपत्रे, डाय-या टाचणे, पत्रव्यवहार इ. आधारे राजकीय संस्थांचा आढावा घेऊन त्यातील घटनांचा अभ्यास करून राजकीय सिद्धांताची मांडणी केली जात असे. म्ह्णून राजकीय सिद्धांतात ऐतिहासिक दृष्टीकोनाला महत्व प्राप्त आहे.

**२) आदर्शवादी दृष्टीकोन –** हा दृष्टीकोन स्वीकारणा-या विचारवंतानी सामान्य गृहीतकाच्या आधारावर राजकीय सिद्धांताची मांडणी केली आहे. यामध्ये निगमन पद्धतीने राजकीय व्यवहारातील आदर्शवादी विचार शोधण्याचा प्रयत्न केला गेला. अशा आदर्शाचा शोध प्लेटोने आपल्या "आदर्श राज्य" या विचारातून घेतला आहे. परंतु या विचारांना शास्त्रीय आदर नसल्यामुळे हे विचार स्वप्नरंजन ठरले. तसेच हॉब्ज, लॉक, रुसो यांनी मानवी स्वभावाविषयी व समाजजीवनाविषयी काही गृहिते कल्पून राज्याच्या उगमा संबंधीचा करार मांडला. परंतु असे व्यवहाराच्या निकषावर न तपासता त्यांनी आपल्या तात्विक विचारातून प्रतिपादन केले होते. म्हणून त्यामध्ये आदर्शवादी दृष्टीकोनाचा स्वीकार केलेला दिसून येतो.

आदर्श हे काल्पनिक व अमूर्त असतात. आदर्श हे बहुतांश दूरच्यादिव्याप्रमाने जीवनास मार्गदर्शक ठरत असले तरी ते पूर्णांशाने कधीच प्राप्त होत नाहीत. जीवनाचा स्तर ठरविताना आपण आदर्शाच्या किती जवळ किंवा दूर आहोत यावरून ठरवावा लागतो. अशी मापके व प्रमाणके निश्चित करणारा दृष्टीकोन म्हणजे आदर्शवादी दृष्टीकोन होय.

आदर्शत्मक दृस्तीकोनातून मूल्यविचार, आदर्शाची संकल्पना, मूल्यमापनाची प्रमाणके किंवा मापदंड, उपलब्ध वास्तवाचे मूल्यमापन, आदर्शप्राप्तीची प्रेरणा व त्याविषयी मार्गदर्शन या घटकांचा आधार घेऊन राजकीय सिद्धांताची मांडणी केलेली असते.

**३) संस्थात्मक कायदेशीर दृष्टीकोन –** राजकीय सिद्धांताची मांडणी करताना राज्संस्था, शासनसंस्था व तत्संबंधी इतर संस्था यांचा अभ्यास कायदेशीर प्रक्रियेतून

करणे ह मुख्य उद्देश असतो. संस्थात्मक दृष्टीकोनात राजकीय संस्थांचा अभ्यास केवळ औपचारिक पद्धतीनेच केला जातो असे नसून अनौपचारिक पद्धतीनेही केला जातो. बेजहॉट याने आपल्या व "ब्रिटीश कॉनस्टीट्युशन" ग्रंथात या दृष्टिकोनाचा वापर केलेला आहे. राजकीय संस्थाची तांत्रिक व व्यावहारिक माहिती निरनिराळ्या ठिकाणाहून प्राप्त करावी लागते. मिळालेल्या माहितीचे व्यवस्थित विश्लेषण करून राजकीय सिद्धांताची मांडणी केली जाते. या अध्ययनामध्ये तत्वज्ञान आणि इतिहास यांचा आधार घेतला जात असला तरी कायदेशीर बाबीवर अधिक भर दिला जात असे. या दृष्टीकोनातून अनौपचारिक प्रक्रियेचा अभ्यास केला जात असे. म्हणून संस्थात्मक कायदेशीर दृष्टीकोनाचे महत्त्व राजकीय सिद्धांताच्या पारंपारिक दृष्टीकोनात महत्त्वाचे आहे.

**<u>पारंपारिक सिद्धांताची वैशिष्ट्ये</u> –**

**१) मूल्यधिष्ठित :-** मानवी मुल्याशिवाय मनुष्य चांगले जीवन जगू शकत नाही. मानवी मुल्याशिवाय मनुष्य चांगले जीवन जगू शकत नाही. मुल्ये ही मानवी कृतीला मार्गदर्शन करीत असतात, राजकीय कृतीला मुल्यांची जोड दिल्याशिवाय राजकीय सिद्धांताची पूर्तता होऊ शकत नाही. राष्ट्रभक्ती, संविधानिकता, लोकाशाही, समता, स्वातंत्र अशा संकल्पना राज्यशास्त्रात मुल्यमुक्त राहू शकत नाहीत. फक्त जे आहे ते आहे. त्यावर लक्ष केंद्रित करून जे असावे त्याकडे संपूर्ण कानाडोळा करून कसे चालेल? तर राजकीय क्षेत्रात मूल्यांच्या आधारावर विश्लेषण करावे लागेल.

**२) तत्त्वज्ञानाला मध्यवर्ती स्थान :-** प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, लॉ.बेंथम मिल, हेगेल या तत्त्वचिंतकांनी तत्त्वज्ञानाचा विकास केला व राजकिय सिद्धांतात महत्वाचे योगदान दिले. यांनी काही मुलभूत प्रश्न जे तात्कालीन समजाला भेडसावत होते ते तत्वज्ञानाच्या आधारावर सोडविण्याचा प्रयत्न केला. फक्त शास्त्राच्या आधारे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही. तर वेगवेगळ्या समस्यातील कार्यकारण संबंध शोधून काढण्यासाठी तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावा लागेल.

**३) नैतिक दृष्टीकोन :-** राज्यशास्त्राला नैतिक भूमिका घ्यावीच लागते.जसे राज्यसंस्थेचे स्वरूप कसे असावे? किंवा नागरिकाशी तिचे संबंध कसे असावेत, अशा प्रश्नांच्या मूळाशी एक नैतिक निवड अभिप्रेत असते. समाजाच्या दृष्टीने कोणती गोष्ट मौल्यवान आहे, हे नैतिक निकषात ठरते. म्हणून कोणताही राजकीय सिद्धांत नैतिक पायावर जन्म घेत असतो. नैतिक दृष्टीकोन असलेल्या राजकीय सिद्धांतामुळे बुद्धीची धार तीक्ष्ण होते. विचारात स्पष्टता व नेमकेपणा येतो. त्यामुळे नैतिक अधिष्ठानाशिवाय राजकीय सिद्धांताची परिपूर्तता होऊ शकत नाही.

**४) राजकीय व सामाजिक आदर्शावर भर :-** काही विचारवंतांनी शासन, संस्था, समाज यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील उणिवा कोणत्या आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केला व त्या कशाप्रकारच्या असाव्यात, याचे कल्पित आदर्श रेखाटले होते : उदा- प्लेटो आणि ॲरिस्टॉटलने तत्कालीन लोकशाही अमान्य करून आदर्श राज्य कसे असावे. हे

सांगण्याचा प्रयत्न केला. म्हणून राजकीय व सामाजिक आदर्शातून राजकीय सिद्धांत निर्मितीला चालना मिळाली.

**५) इतर सामाजिक शास्त्राशी जवळचा संबंध :-** इतिहास, तत्वज्ञान, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इ. शास्त्राचा राजकीय सिद्धांताच्या निकटचा संबंध होता. समाज जीवनातील विविध टप्प्यात निर्माण होणा-या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी इतर सामाजिक शास्त्राचा आधार घेतला जात होता. जसे इतिहास समजून घेतल्याशिवाय राजकीय व्यवहार समजून घेता येणार नाही. याबाबत तत्त्वज्ञांना जाणीव होती. म्हणून इतर सामाजिक शास्त्राचा आधार घेऊनच राजकीय प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जात होता.

## १.५ राजकीय सिद्धांताचा आधुनिक / समकालीन दृष्टीकोन –

आदर्शलक्षी दृष्टीकोन राज्यशास्त्रात प्लेटो ॲरिस्टॉटलपासून एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत मोठ्या प्रमाणावर वापरात होता. त्यांनी ऐतिकासिक व तुलनात्मक अध्ययन पद्धतीचा वापर केलेला असला तरी प्रकाशित झालेले ''ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स'' हे ग्राहम वॅलासचे पुस्तक म्हणजे अनुभववाद किंवा आधुनिकतेच्या दिशेने पडलेले पहिले पाउल होय. त्यात मानसशास्त्रीय अंगाने राजकारणाने अभ्यास केला गेला. त्याच काळात बेन्तलेने ''प्रोसेस ऑफ गव्हरमेंट'' या पुस्तकातून राजकारणाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला गेला. नंतर मॅक्स वेबरने आधुनिक पद्धतीचा उपयोग करून लोकशाहीचे विश्लेषण केले.

पण दुस-या महायुद्धानंतर राज्यशास्त्राच्या अभ्यासपद्धतीमध्ये बदल होऊन त्यांना ख-या अर्थाने चालना मिळाली. यानंतरचे सिद्धांत आधुनिक राजकीय सिद्धांत म्हणून पुढे आले. राज्यशास्त्रज्ञांनी पारंपारिक राजकीय सिद्धांतातील उणिवा शोधून नवनवीन पद्धती विकसित केल्या. आधुनिक दृष्टिकोनाचा वापर जीवनाच्या सर्वच पैलूंचा अभ्यास करण्यासाठी केला. आधुनिक दृष्टीकोनाने अनुभववाद, वर्तनवाद, प्रत्यक्षार्थवाद, व्यवस्था विश्लेषण या सिद्धांताची निर्मिती मुल्यानिर्पेक्ष आधारावर केली. जे ज्ञान प्रयत्न व अनुभवावर आधारित आहे, तेच खरे व सत्य आहे, असे मत मांडले जाऊ लागले. वस्तुस्थितीची यथातथ्य नोंद करावी ती करत असताना मुल्यांची लुडबुड होउ देता कामा नये. आणि अध्ययन वस्तुनिष्ठ असावे. व्यक्तीनिष्ठ नसावे ही अनुभववादाची त्रिसूत्री होती. आधुनिक दृष्टीकोनात जे आहे त्याचाच विचार होउ लागला. जसे हवा, पाणी, स्पर्श, ध्वनी, गंध या सर्वांची प्रत्यक्ष अनुभूती होते. त्या सर्व गोष्टी सत्य आहेत व ज्यांची अनुभूती होत नाही, त्या गोष्टी सर्व असत्य आहेत. असे या दृष्टीकोनाचे प्रतिपादन केले.

**१) राजकीय सिद्धांताचा अनुभववादी दृष्टीकोन –** राज्यशास्त्रीय अध्ययन पूर्णतः मुल्यानिरपेक्ष असणे याला अनुभववादी दृष्टीकोन असे म्हणतात. पूर्वग्रहविरहीत व वस्तुनिष्ठ अध्ययन हीच शास्त्रीय अध्ययनाची खरी कसोटी आहे. तटस्थ राहून प्रत्यक्ष

अनुभवावर तर्कसंगत विचार करून राज्यशास्त्रीय सिद्धांत व तर्क काढावेत हा अनुभववादी विचारवंताचा आग्रह असतो.

अनुभवजन्य पद्धतीचा वापर हासुद्धा प्राचीन काळापासून झालेला आहे. प्राचीन काळातील ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल ज्याला राज्यशास्त्राचा जनक म्हटले जाते त्याने अनुभवजन्य किंवा शास्त्रीय पद्धतीचा वापर करून आपले विचार मांडले आहेत. सिद्धांत मांडताना त्याने अनेक देशांच्या राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास केला आणि त्या आधारे निष्कर्ष काढले. मध्ययुगाच्या अखेरीस मॅकव्हली या इटालियन विचारवंताने मांडलेले विचारही अनुभवजन्य पद्धतीनुसार मांडलेले आहेत. मात्र या पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात आणि सार्वत्रिक वापर आधुनिक काळात झाला तसेच यावेळी शास्त्रशुद्ध संशोधनाची पद्धतीही विकसित झाली. वेगवेगळ्या शास्त्रात तशा पद्धतीने संशोधन करण्यास किंवा सिद्धांत मांडण्यास महत्त्व प्राप्त झाले आणि राजकीय विचारवंतही पुरेसा पुरावा घेऊन तसेच विश्लेषण पद्धतीचा वापर करून आपले सिद्धांत मांडू लागले. मॉटेस्क्यू लॉर्ड ब्राईस, जॉन ऑस्टीन, जेनिंग व ग्रहम वालास इ. अनेक विचारवंतांनी या पद्धतीचा प्रभावीपणे वापर केला.

अनुभवातून प्राप्त होते तेच खरे ज्ञान होय असे अनुभवजन्य सिद्धांत मांडतो. प्रत्येक अनुभव म्हणजे ज्ञान नसते. पण आपण जे अनुभव घेतो त्यांच्या आधारे विचार करून आपल्याला ज्ञान प्राप्त होते हे ज्ञान प्राप्त करण्यासाठी किंवा सिद्धांत मांडण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा वापर केला जातो. त्याला शास्त्रीय पद्धती असे म्हणतात. या शास्त्रीय पद्धतीत सिद्धांत मांडण्याच्या प्रक्रियेचे टप्पे असतात, ते पुढीलप्रमाणे –

अ) गृहीत तत्त्व
ब) माहितीचे संकलन
क) माहितीचे वर्गीकरण
ड) विश्लेषण
इ) निष्कर्ष
ई) सिद्धांत

अनुभवजन्य सिद्धांत विगमन पद्धती वापरली जाते. विशेषाकडून सामन्याकडे तिचे स्वरूप असते. विशिष्ट गोष्टीचे निरीक्षण करून त्या आधारे निष्कर्ष काढला जातो आणि सर्वसामान्य नियम बनवला जातो. उदा. ‘‘अ’’ हे राज्य सार्वभौम आहे. ‘‘ब’’ हे राज्य सार्वभौम आहे. ‘‘क’’ हे राज्य सार्वभौम आहे. म्हणून सर्व राज्ये सार्वभौम असतात. अशा प्रकारे साधारण नियम मांडून सर्व निष्कर्ष काढला जातो.

अनुभवजन्य सिद्धांत वर्णनात्मक नसतात, तर त्यात विश्लेषणावर भर दिलेला असतो. या सिद्धांतात योग्य असे पुरावे देऊन निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न असतो. ऐतिहासिक घटना राजकीय घडामोडींचे प्रत्यक्ष निरीक्षण मुलाखती किंवा राजकीय

घटनांची व संस्थांची तुलना करून हे पुरावे दिले जातात, त्याला वास्तवतेचा आधार असतो.

**२) समकालीन राजकीय सिद्धांताचा वर्तनवादी दृष्टीकोन** – ज्या आधुनिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केला, त्यामध्ये वर्तनवादी विचाराला मध्यवर्ती स्थान आहे. उत्तेजना मिळताच प्राणी प्रतिसाद देतात. या निरीक्षणावर वर्तनवादाची मांडणी केलेली आहे. ‘‘जी तथ्ये पंचेद्रियांनी किंवा तांत्रिक उपकरणाने प्रत्यक्ष ज्ञानाच्या आधारावर मिळवलेली असतात तेवढीच तथ्य प्रमाण मानावीत’’ असे वर्तनवादी दृष्टीकोन मानतो. राजकीय घटनांचे जवळून सूक्ष्म निरीक्षण करणे आणि इतर सामाजिक शास्त्राच्या पद्धती निष्कर्ष व दृष्टीकोन यांच्या निकटाजवळ राज्यशास्त्राला घेऊन जाणे आणि अनुभवनिष्ठ आशय समृद्ध करणे असे प्रयत्न वर्तनवादी दृष्टीकोनातून झालेले आहेत.१९०८ मध्ये प्रकाशित झालेल्या गॅहम वालास याच्या ‘ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स’ या ग्रंथापासून वर्तनवादी विचारप्रणालीला सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. गॅहम वालासने मानवांच्या राजकीय व्यवहाराची मानसशास्त्रीय बैठक शोधण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते राजकीय व्यवहाराचे मोजमाप करता येणे शक्य आहे. त्यातून राज्यशास्त्राला आदर्शाच्या व मूल्यांच्या चर्चेपासून दूर ठेवता येऊ शकते.

वर्तनवाद ही पारंपारिक सिद्धांतातील असंतोषाबाबत निर्माण झालेली चळवळ होय. या चळवळीचा पाया डेव्हीड ईष्टनने घातला असे मानले जाते. या दृष्टीकोपुढील आठ हेतू किंवा गृहीतके सांगितली आहेत.

**वर्तनवादाची मुख्य तत्वे**

**१) वारंवारता / नियमितता** – वर्तनवादा मध्ये असे गृहीत धरले जाते की व्यक्ती जेव्हा राजकारणात भाग घेतात, तेव्हा त्यांच्या वागण्यात सारखेपणा दिसतो. तसेच भविष्यात व्यक्ती कशा प्रकारे वर्तन करू शकतात, याचे भाकीतही करता येते. या सर्व वर्तनातील सारखेपणा शोधून काही नियम किंवा सिद्धांत मांडले जातात.

**२) पडताळा** – संशोधनाच्या संदर्भात करावयाच्या सर्व विधानांना अनुभवसिद्ध पुराव्यांचे आधार असलेच पाहिजेत. प्रत्येक विधानाचा पडताळा अनुभवनिष्ठ निकषांत घेता आला पाहिजे.

**३) अध्ययन तंत्रे** – नैसर्गिक शास्त्रामध्ये प्रचलित असलेल्या अध्ययन तंत्राचा अवलंब करून राज्यशास्त्रीय तथ्याचे संकलन व विश्लेषण केले पाहिजे. यादृष्टीने सर्वेक्षण पद्धती आशय विश्लेषण, नमुनापाहण्या, बहुचलात्मक विश्लेषण अशी तंत्रे वर्तनवादी अभ्यसकांनी हाताळली आहेत.

**४) परिमाणीकरण** – मोजमाप करण्याच्या काटेकोर मार्गे म्हणून संख्याशास्त्रीय परिमाणनाचा अवलंब वर्तनवादी दृष्टिकोनाने केला आहे. म्हणून वर्तनवाद कोणत्याही गुणांचे व मूल्यांचे परिमाणीकरण किंवा मोजमाप करण्यात महत्व देतात.

**५) मुल्यानिरपेक्षता /मुल्यतटस्थता –** कोणतेही निष्कर्ष हे सत्य व वस्तुस्थितीच्या आदरावर मांडावेत. त्यामध्ये मुल्यांचा प्रश्न येऊ नये. चांगले काय? वाईट काय? याबद्दल न बोलता प्रत्यक्ष काय याबद्दल विचार वर्तन्वडत केला जातो.

**६) व्यवस्थितपणा /प्रमेय मांडणी –** वर्तनवाद्यांच्या मते, सिद्धांताची मांडणी तथ्य-संकलन स्पष्टीकरण, भाकीत कथन अशा आवश्यक पाय-यांनी व्यवस्थित केलेली असावी व सर्वांना मान्य असलेल्या संशोधन पद्धतीचा अवलंब करून दोन किंवा अनेक घटकांशी कार्यकारण संबंधाचा शोध घ्यावा. नीट मांडलेल्या व तर्काने परस्पराशी जोडल्या गेलेल्या अशा संकल्पनाच्या आधारे उभी केलेली प्रमेये त्याचे स्वरूप असते.

**७) शास्त्रशुद्धता / विशुद्धशास्त्र –** राज्यशास्त्रातही प्रथमतः शासनसंस्था सत्ता इ. संकल्पनाविषयी निर्भेळ व त्रिकालाबाधित सत्य सांगणारे सिद्धांत शोधून काढले पाहिजे. राज्यशास्त्र या अर्थाने एक प्रकारचे शुध्द शास्त्र होईल. राज्यशास्त्रज्ञाने मग या मुलभूत राजकीय सिद्धांताच्या आधारे वर्तमान काळातील प्रश्न व सामाजिक समस्या सोडविण्याकरिता त्या ज्ञानाचा उपयोग करावा. राज्यशास्त्रात ख-या अर्थाने शुद्ध संशोधन करण्याची फार आवश्यकता आहे, असे वर्तनवादी दृष्टिकोनाचे मत आहे.

**८) आंतरविद्याशाखीय एकत्रीकरण / सर्वसमावेशक दृष्टीकोन –** राजकीय संशोधन ठोस व परिपक्व व्हायचे तर अन्य सामाजिक शस्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी करून घ्यावा. कारण माणूस ह एकाच वेळी सामाजिक, आर्थी, राजकीय, सांस्कृतिक प्राणी असते.

अशा पद्धतीने सामाजिक पर्यावरण व व्यक्तीवर्तन यांना मध्यवर्ती स्थान देऊन वर्तनवाद्यांनी ह दृष्टीकोन स्पष्ट केला म्हणून समकालीन राजकीय सिद्धांतात त्यांचे महत्त्व आहे.

## उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन

**उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन –** वर्तन्वादातील उणिवा शोधून त्यामध्ये असलेल्या जमेच्या बाजू शोधून संशोधन अधिक उपयुक्त व प्रस्तुत कसे करता येईल असा भविष्यलक्षी विचार उत्तरवर्तनवाद्यांनी केला त्यामध्ये डेव्हिड ईष्टनचे स्थान मध्यवर्ती होते. त्याच्या मते, हे जे आत्मपरिक्षण वर्तनवादोत्तर प्रवाहाने केले ते राज्यशास्त्राच्या व्याप्तीत व उद्दिष्टांत क्रांती घडवून आणणारे ठरले. ज्या विचारवंतानी हे विचार मांडले त्या सर्वांच्या दोन प्रमुख मागण्या होत्या. एक प्रस्तुतता व दुसरी प्रत्यक्ष कृती या वर्तनवादोत्तर क्रांतीची मांडणी डेव्हिड ईस्टनने पुढील सात सूत्रात केली.

**१) प्रथम आशय त्यानंतर तंत्र –** संशोधन तंत्रापेक्षा संशोधनाचा हेतू महत्त्वाचा आहे. त्यापुढील तातडीच्या प्रश्नासंदर्भात राज्यशास्त्रीय संशोधन हे अर्थपूर्ण व प्रस्तुत असावयास पाहिजे. संशोधन जर प्रस्तुत असेल तर ते काटेकोर नसले तरी चालेल.

म्हणून वर्तन वाद्यांनी जो तंत्रावर भर दिला होता, त्यापेक्षा उत्तरवर्तनवाद्यांनी संशोधनावर भर दिलेला दिसून येतो.

**२) परिवर्तनावर भर** – वर्तनवादी राजकीय वास्तवाच्या वर्णन विश्लेषणातच व्यस्त राहिल्यामुळे ह दृष्टीकोन स्थितिवाद व परिवर्तनविरोधी ठरला होता. परंतु कोणत्याही स्थितिवादी व परिवर्तनविरोधी ठरलं ठरला होता. परंतु कोणत्याही दृष्टिकोनासाठी सामाजिक संदर्भाची आवश्यकता असते. म्हणून उत्तरवर्तनवादी सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन परिवर्तनवादी भूमिका घेतान दिसून येत.

**३) राजकीय सत्य लक्षात घ्यावे** – वर्तनवादी अभ्यासक अमूर्त विश्लेषणात व्यस्त राहिल्यामुळे त्यांचे तातडीच्या समकालीन पेचप्रसंगाकडे दुर्लक्ष झाले. अशा परिरीस्थितीत उत्तरवाद्यांनी माणसांच्या ख-या गरजाकडे लक्ष देऊन त्यामधील सत्य काय आहे हे जाणून घ्यावे.

**४) मूल्य हीच ज्ञानामागची खरी शक्ती** – मुल्यविहीन ज्ञान विपरीत हेतूसाठी वापरले जाऊ शकते. मुल्ये ही राजकारणाच्या अभ्यासात महत्वाची असतात. शास्त्रवादांच्या आहारी जाऊन वर्तनवाद्यांनी मूल्यांना आपल्या अध्ययनातून हद्दपार केले होते. आता उत्तरवाद्यांनी मूल्यांना पुन्हा संशोधनात स्थान मिळवून दिले.

**५) राज्यशास्त्रज्ञांची सामाजिक भूमिका** – तटस्थ व वस्तुनिष्ठ संशोधक अशी भूमिका स्वतःकडे घेऊन राज्यशास्त्रज्ञांनी आपली सामाजिक जबाबदारी टाळू नये. अशी भूमिका उत्तरवर्तनवादी घेतात.

**६) ज्ञानाचे रुपांतर कृतीत व्हावे** – ज्ञानाचा उपयोग नवसमाजनिर्मितीसाठी झाला आहे. परंतु स्वतःची बांधिलकी ओळखून संशोधकांनी ज्ञानाचे रुपांतर कृतीत करणे गरजेचे आहे, असे उत्तरवर्तनवादी म्हणतात.

**७) व्यवसायाचे राजकीयीकरण** – संशोधन संस्था मांडले विद्यापीठे यांना सामाजिक राजकीय प्रश्नांवर भूमिका घ्यावयाच लागतील. अलिप्त राहून चालणार नाही. तांत्रिक क्षमता त्यांनी मिळवावीच पण समाजाच्या दैनंदिन व्यावहारिक प्रश्नांकडे ही त्यांनी लक्ष देऊन परिवर्तन करावे असे उत्तरवर्तनवादी म्हणतात.

### आधुनिक दृष्टिकोणाची इतर वैशिष्ट्ये

**आंतरशास्त्रीय अभ्यासाचा दृष्टीकोन** – आधुनिक दृष्टीकोनात सिद्धांताची मांडणी करताना इतर सामाजिक शास्त्रांचा आधार घेतला जाऊ लागला. गणिती संख्याशास्त्रीय मापन पद्धती, समाजशास्त्र, मानसशास्त्र,  मानसशास्त्र मनोविकृती शास्त्र इतिहास इ. विषयाद्वारे विभिन्न पद्धतीचा विकास करून राज्यशास्त्र विषयाचे अभ्यास विश्व व्यापक केले. म्हणून या दृष्टीकोनात आंतरशास्त्रीय किंवा आंतरविद्याशाखिय अभ्यास पद्धतीला महत्त्व आले.

**५) प्रत्यक्षार्थवाद** – ऑगस्ट कॉम्त यांनी आधुनिक राजकीय सिद्धांतात तार्किक प्रत्यक्षार्थवादाचा वापर केला. त्यांच्या मते, सर्व व्यक्ती व समूहानी प्रत्याक्षार्थवादाचा वापर केला. त्यांच्या मते सर्व काळात व्यक्ती समाज आणि विचार या तिन्हींची प्रगती होत असते. या टप्प्या पैकी शेवटचा टप्पा वैज्ञानिक पद्धतीचा असतो. या विचाराचे मुख्य सूत्र असे आहे की विज्ञानाची अभ्यास पध्दतीच एकमेव अभ्यास पध्दती आहे. तीच वापरून ज्ञान मिळवता येते.

**६) तुलनात्मक दृष्टीकोन** – याद्वारे आधुनिक दृष्टीकोनात विविध देशांच्या राजकीय व्यवस्था राजकीय,राजकीय व्यवस्था पक्षपद्धती घटना प्रशासन कार्यकारी कायदेविषयक व न्यायविभाग अशा विविध घटकांचा अभ्यासही तुलनात्मक पद्धतीने केला जाऊ लागला. या तुलनात्मक अभ्यास पद्धतीमुळे दुर्लक्षित असणा-या तिस-या जगाकडेही लक्ष देण्यात येऊ लागले. यातून तुलनात्मक राजकारण ह नवीन विषय उदयास आला. म्हणून राजकिय सिद्धांताच्या दृष्टीने तुलनात्मक दृष्टीने समकालीन दृष्टीकोनात महत्त्वाचा समाजाला जाऊ लागला.

## १.६ सारांश -

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासात आपण राजकीय सिद्धांताचा अर्थ व्याख्या,व्याख्या स्वरूप व्याप्ती व त्याचबरोबर राजकीय सिद्धांताच्या पारंपारिक व समकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता असून त्याशिवाय राजकीय व्यवहार व त्यासंबंधित निर्माण होणा-या प्रश्नांची आपणास उकल होणार नाही.

## १.७ प्रश्न -

१) राजकीय सिद्धांत म्हणजे काय त्याचे स्वरूप स्पष्ट करा.
२) राजकीय सिद्धांताचा अर्थ सांगून व्याप्ती स्पष्ट करा.
३) राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये लिहा.
४) राजकीय सिद्धांताचा पारंपारिक दृष्टीकोनाची माहिती लिहा.
५) राजकीय आधुनिक दृष्टीकोन स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २.१

## राज्य, नागरी समाज व बाजारपेठ

### राज्य - संकल्पना व घटक

**घटक रचना**

२.१.१ प्रस्तावना
२.१.२ राज्याचा अर्थ
२.१.३ राज्याची व्याख्या
२.१.४ राष्ट्र

## २.१.१ प्रस्तावना

'राज्य' ही राज्यशास्त्रातील मध्यवर्ती कल्पना आहे. आधुनिक काळात तर राज्य ही एक नैसर्गिक वैश्विक व आवश्यक शक्तिशाली संस्था या रुपात अस्तित्वात आहे. राज्याचा अर्थ अनेक राजकीय विचारवंतांनी स्पष्ट केले आहे. आपल्यातील कुटुंब संस्था, समाज संस्था तशीच ही राज्य संस्था आहे. पण राज्य संस्था ही सर्वोच्च संस्था आहे. समाज व्यवस्थेतील ही शिखर संस्था मानली जाते. राज्याचा विकास ही प्रक्रिया संथगतीने अनेक वर्षे पासून चालू आहे.

## २.१.२ राज्याचा अर्थ

प्राचीन काळात राज्य व समाज या दोन संस्था मध्ये भेद करण्यात येत नसे. परंतु राज्य व समाज हे एक नाहीत. मनुष्याचे राजकीय जीवन हे त्यांच्या समाजजीवनाचे एक अंग आहे.

राज्याचा अर्थ किंवा व्याख्या ही अनेक राजकीय विचारवंतांनी आपल्या विचारातून मांडल्या आहेत. अॅरिस्टॉटल या ग्रीक राजकीय विचारवंतांने केलेली राज्याची व्याख्या पुढील प्रमाणे -

## २.१.३ राज्याची व्याख्या -

१) अॅरिस्टॉटल - " सुखी ,स्वयंपूर्ण जीवन जगण्यासाठी राज्य अस्तित्वात आले आणि त्यासाठीच राज्य अस्तित्वात राहणार आहे. सुखी जीवनासाठी असलेला अनेक

खेड्यांचा आणि कुटुंबाचा समुह म्हणजे राज्य होय. "या व्याख्येतून अँरिस्टॉटलने महत्त्वाच्या दोन मुद्यावर प्रकाश टाकला आहे. एक म्हणजे राज्य हे नैसर्गिक आहे, व दुसरे म्हणजे राज्य ही आवश्यक संस्था आहे.

२) मँकेवली - हा राजकीय विचारवंत म्हणतो की,

"लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्माण झालेली राजकीय संघटना म्हणजे राज्य होय."

३) जर्मन विचारवंत ब्लंटश्लीच्या मते, " निश्चित भूप्रदेशावर राजकीय दृष्टीने संघटित झालेले लोक म्हणजे राज्य होय."

४) प्राध्यापक गार्डनरच्या मते, " राज्य म्हणजे कमी अधिक लोकांचा समूह ,जो निश्चित भूप्रदेशावर राहतो ,बाह्य नियंत्रणापासून स्वतंत्र असतो जिथे संघटित सरकार आहे अशा लोकांच्या समूहाला राज्य म्हणता येईल."

५) हेरॉल्ड लास्की म्हणतात, " शासन आणि लोक यांच्यात विभाजन झालेला, विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा आणि सर्व संस्थांवर सर्वोच्चता प्रस्थापित करणारा गट म्हणजे राज्य होय."

राज्याच्या विकासातील महत्त्वाचे टप्पे पुढील प्रमाणे जाणवतात:-

**१) टोळीचे राज्य :-** आदिमानव शिकारीच्या शोधात रानावनात हिंडत असत. तेव्हा आत्म संरक्षणासाठी ते टोळी करून राहत असत. वयाने, अनुभवाने, पराक्रमाने श्रेष्ठ असणाऱ्या व्यक्तीची टोळी प्रमुख म्हणून निवड केली जात असे. कालांतराने टोळी प्रमुखपद हे वंशपरंपरागत झाले असावे. इतर टोळ्यांपासून आपल्या लोकांचे संरक्षण करणे आणि अंतर्गत शांतता राखणे ही टोळी प्रमुखाची महत्वाची जबाबदारी असे.

**२) ग्रीक नगर राज्य:-** ॲरिस्टॉटलच्या "द पॉलिटिक्स "या ग्रंथात १५८ नगर राज्यांचा उल्लेख आढळतो .युरोप खंडातील ग्रीस देशांत टोळ्यांनी आपली नगर राज्ये प्रस्थापित केली असावी. ही नगर राज्य भूप्रदेश आणि लोकसंख्येने लहान होती. तेथे प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. पुढे मॅसिडोनियाच्या प्रबळ सत्तेपुढे ही नगर राज्ये नामशेष झाली असावी.

**३) रोमन नगर राज्य:-** रोमच्या नेतृत्वाखाली इटलीमधील नगर राज्य संघटित झाली. त्यांच्या सामर्थ्यशाली सैन्याने जुलियस सीझर सारख्या सेनानी च्या आधिपत्याखाली विश्वव्यापी रोमन साम्राज्य प्रस्थापित केले. परंतु पुढे पाचव्या शतकाच्या सुमारास अंतर्गत कलहामुळे रोमन साम्राज्य लयास गेले.

**४) सरंजामशाही राज्य:-** नंतर रोमन साम्राज्याच्या विनाशा नंतर सरंजामशाही पद्धतीची राज्य अस्तित्वात आली. रोमन साम्राज्याने रोमन सम्राट याने मांडलिक राज्यांना सत्ता व अधिकार दिले होते. या मांडलिक राज्याने आपल्या प्रदेशाचे लहान लहान विभाग तयार केले. त्या विभागाच्या प्रमुखाला सरंजामदार असे म्हणत. हे सरंजामदार आपापल्या राजकीय सत्ता गाजवू लागले. मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यामुळे पुढे राज्यांना विस्कळितपणा आला.

या सर्व व्याख्या वरून राज्याचा अर्थ स्पष्ट होतो आणि या व्याख्या राज्याच्या अंगावर प्रकाश टाकतात.

**राज्याचे घटक -**

राज्याचे प्रमुख चार घटक आहेत .या घटकांशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. ते घटक म्हणजे १) लोकसंख्या २) भू प्रदेश ३) शासनसंस्था व ४) सार्वभौम सत्ता होय.

**१) लोकसंख्या -**

राज्य ही एक मानवी संस्था आहे. त्यामुळे लोकसंख्या या घटका शिवाय राज्याची कल्पना करता येत नाही .राज्यांच्या लोकसंख्या या घटकाचा विचार करताना दोन मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकसंख्येचा आकार व लोकांची पात्रता किंवा दर्जा. लोकसंख्या म्हणजे राज्यात किती लोक राहतात असा होतो.

**अ) लोकसंख्या किती असावी ...**

राज्याची लोकसंख्या किती असावी याविषयी राजकीय विचारवंतांनी आपली मते मांडली आहेत .प्लेटो या विचारवंताच्या मते राज्याची लोकसंख्या पाच हजार असावी तर अँरिस्टाँटलच्या मते राज्याची लोकसंख्या इतकी कमी असावी की राज्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल आणि एवढे जास्त सुद्धा नसावी की, त्यांच्या गरजा त्यांना पूर्ण करण्यासाठी परावलंबी रहावे लागेल. राज्य स्वावलंबी असावे. आजच्या काळात राज्याची लोकसंख्या किती असावी हे सांगणे वास्तववादी होणार नाही. कारण भारत व चीन यासारखे अति लोकसंख्येची समस्या असलेली राज्यही अस्तित्वात आहेत तर कमी लोकसंख्या असलेले छोटे देशही सुरक्षित जीवन जगत आहेत. उदा. व्हॅटिकन सिटी, मोन्याको यासारखी कभी लोकसंख्येची समस्या असलेले देशही अस्तित्वात आहेत. त्यामुळे राज्याची लोकसंख्या किती असावी हे त्या देशावर अवलंबून आहे.

**ब) लोकांचा दर्जा ...**

राज्या साठी पुढचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राज्यात असलेल्या लोकांचा दर्जा .लोक कशा दर्जा चे आहेत . योग्यता कशा प्रकारची आहे. राज्यातील लोक उत्साही व परिश्रम करणारे, नैतिक विकास झालेले असतील तर ते राज्य एक प्रगतिशील राज्य

म्हणून उदयाला येते. उदाहरणार्थ जपान या राष्ट्राचा दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्ण विनाश झाला होता. परंतु तेथील लोकांमुळे लोकातील कष्टाळू, चिकाटी व प्रामाणिक -मेहनती वृत्तीमुळे आज पुन्हा तो देश विकसित देश म्हणून ओळखला जातो. तसेच इस्त्राएल देशाचे सुध्दा तसेच उदाहरण देता येते. इंग्लंड अमेरिका राज्यांमध्ये लोकांच्या राजकीय जागरूकतेमुळे येथील राजकीय व्यवस्था यशस्वी म्हणून उदयाला आली आहे.

**२) भूप्रदेश (निश्चित भूप्रदेश)**

भूप्रदेश किंवा जमीन दुसरे म्हणजे राज्याचा दूसरा महत्वाचा घटक. भूप्रदेश सलग असावा विभागलेला भूप्रदेश यामध्ये एकतेची भावना निर्माण होणे कठीण असते. उदाहरणार्थ पूर्व पाकिस्तान पश्चिम पाकिस्तान यांच्यामध्ये एकतेची भावना कधी निर्माण होऊ शकली नाही त्यामुळे बांगलादेश या नवीन राज्याची, देशाची निर्मिती झाली. थोडक्यात एखाद्या राज्याचा भूप्रदेश सलग असणे महत्वाचे आहे.

**अ) राज्याची स्थलाकृति :-**

यात राज्याची जमीन, पाणी व आकाश समावेश होतो. उदाहरणार्थ समुद्रकिनाऱ्यापासून तीन मैला पर्यंतचा समुद्राचा भाग हा त्या राज्याचा असतो. तीन मैल नंतरचा समुद्र आंतरराष्ट्रीय क्षेत्र म्हणून घोषित केलेला असतो. त्याचा उपयोग जगातील कोणताही देश करू शकतो. त्या राज्याच्या भूप्रदेशावरचे आकाश यावरही त्या राज्याचा हक्क असतो.

**ब) राज्याचा भूप्रदेश किती असावा ?**

या बाबतीमध्ये मतभेद आहेत. अर्थातच मोठा भूप्रदेश लाभलेले राज्य असेल तर त्या राज्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीमुळे आज मोठा भूप्रदेश त्यावर्ती नियंत्रण ठेवणे, प्रशासन करणे, कोणत्याही राज्याला सोपे झाले आहे. जेवढा राज्याचा भूप्रदेश लहान असेल अशा राज्याला मोठा राज्यांकडून आक्रमणाची सतत भीती असते. परंतु लहान भूप्रदेश असलेल्या राज्यात त्वरित व चांगले प्रशासन निर्माण करता येते . जन एकतेची भावना विकसित करणे सहजशक्य होते. परंतु अशी छोटी राज्ये संरक्षणाच्या दृष्टीने योग्य नाहीत. क्रमांक तीन शासन संस्था राज्याचा हा महत्त्वाचा घटक आहे राज्य व शासन हे दोन्ही शब्द बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरण्यात येतात परंतु शासन संस्था ही एक राज्याची राज्य चालवण्याची यंत्रणा आहे. यंत्रणे शिवाय राज्य आपले कार्य करू शकत नाही. शासन संस्था ही राज्याची प्रत्यक्ष मूर्त स्वरूपातील बाब आहे. अन्यथा राज्य ही आपली अमूर्त संकल्पना आहे.

**क)** कोणत्याही राज्यात निश्चित भूप्रदेश असणे आवश्यक आहे. तिच्यावर ते आपली सर्वोच्च सत्ता प्रस्थापित करू शकतील. याशिवाय निश्चित भूप्रदेश यामुळे त्या विशिष्ट भूप्रदेशात विषयी लोकांच्या मनात प्रेमाची, एकतेची व आदराची भावना विकसित होत असते. म्हणजेच राज्यासाठी निश्चित भूप्रदेश असावा लागतो. भटकणाऱ्या लोक

समुदायाचे राज्य प्रस्थापित होऊ शकत नाही. भूप्रदेश किंवा जमीन ही आवश्यक बाब आहे.

ड) दुसरे म्हणजे राज्याचा भूप्रदेश सलग असावा. विभागलेला भूप्रदेश यामध्ये एकतेची भावना निर्माण होणे कठीण असते. उदाहरणार्थ पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांच्यामध्ये एकतेची भावना कधी निर्माण होऊ शकली नाही. त्यामुळे १९७१ साली बांगलादेश या नवीन राज्याची (भारतीय लष्कराच्या मदतीने) निर्मिती झाली . थोडक्यात एखाद्या राज्याचा भूप्रदेश सलग असणे महत्वाचे आहे. प्रशासन व नियंत्रण ठेवण्यासाठी सुद्धा सलग भूप्रदेश उपयुक्त ठरतो.

इ) राज्याच्या भूप्रदेशात राज्याची जमीन, पाणी याचाही समावेश होतो.देशातील भूमी पिकाऊ, चांगली व कसदार असल्यास पीक उत्तर व मुबलक येते. काळ्याभोर रंगाची माती उत्तर प्रतीची मानली जाते. तसेच पाणी चांगले, पिण्याच्या साठी उपयुक्त हवे. पाण्याची गुणवत्ता पीक व सजीवांच्या साठी उत्तम हवी. क्षारयुक्त पाणी कमी प्रतिचे मानले जाते. राज्यातील पाणी व समुद्रकिनाऱ्यापासून तीन मैलापर्यतचे पाणी, पर्यंतचा समुद्राचा भाग हा त्या राज्याचा असतो. तीन मैला नंतरचा समुद्र आंतरराष्ट्रीय क्षेत्र म्हणून घोषित केलेला असतो. त्याचा उपयोग जगातील कोणताही देश करू शकतो .त्या राज्याच्या भूप्रदेशावर चे आकाश यावरही त्या राज्याचा हक्क असतो.

राज्याचा भूप्रदेश किती असावा या बाबतीमध्ये मतभेद आहेत . अर्थातच मोठा भूप्रदेशाचे राज्य असेल तर त्या राज्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीमुळे आज मोठा भूप्रदेशावर्ती नियंत्रण ठेवणे प्रशासन करणे कोणत्याही राज्याला सोपे झाले आहे. जेवढा राज्याचा भूप्रदेश लहान असेल अशा राज्याला मोठा राज्यांकडून आक्रमणाची सतत भीती असते. परंतु लहान भूप्रदेश असलेल्या राज्यात त्वरित व चांगले प्रशासन निर्माण करता येते जन एकतेची भावना विकसित करणे सहजशक्य होते. परंतु अशी छोटी राज्ये संरक्षणाच्या दृष्टीने योग्य नाहीत.

**३) शासन संस्था -** शासनसंस्था राज्याचा हा महत्त्वाचा घटक आहे. राज्य व शासन हे दोन्ही शब्द बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरण्यात येतात .परंतु शासन संस्था ही एक राज्याची राज्य चालवण्याची मूर्त यंत्रणा आहे. या यंत्रणेशिवाय राज्य आपले कार्य करू शकत नाही. शासन संस्था ही राज्याची प्रत्यक्ष मूर्त स्वरूपातील बाब आहे.

शासन संस्था राज्याच्या महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक आहे .निश्चित भूप्रदेशावर लोक कायमचे अस्तित्व करून राहतात. परंतु शासनसंस्था नसल्याने त्याला राज्याचे स्वरूप येत नाही. राज्य निर्माण होण्यासाठी जनतेमध्ये संघटन, समाजव्यवस्था निर्माण करणारी यंत्रणा म्हणजेच सरकार आवश्यक असते. शासन संस्था म्हणजे राज्याच्या वतीने काम करणारी राज्याची कार्य करणारी यंत्रणा होय .राज्याचे अस्तित्व शासन संस्थेच्या रूपाने आपल्याला जाणवत असते. शासनामध्ये

कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, सनदी अधिकारी लष्करी व पोलीस यंत्रणा या बाबींचा शासन संस्थेमध्ये समावेश होतो. शासनसंस्थेचे १) संसदीय,२) अध्यक्षीय वगैरे असे प्रकार असतात. देश, राज्यघटना व जनतेच्या अपेक्षा याप्रमाणे शासन संस्थेचा प्रकार अस्तित्वात येतो .

**शासन संस्था किंवा सरकारची भूमिका :-**

कायदे मंडळाने तयार केलेल्या योजना, धोरणे, कार्यक्रम यांचीआखणी करून त्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासन संस्थेवर असते. शासनसंस्था पूर्ण शक्तिनिशी आपले कार्य करत असते. तसेच राज्यात सूव्यवस्था, शांतता प्रस्थापित करणे हे शासन संस्थेचे आद्य कार्य आहे. कायद्याची अंमलबजावणी करत असताना एखाद्या व्यक्ती गट किंवा संघटनांनी कायदा भंग केल्यास त्यांना दंड करण्याचा किंवा शासन करण्याची जबाबदारी सरकारची आहे. एखादे सरकार घटनात्मक जबाबदारी व्यवस्थित व वेळेत पूर्ण करीत नसेल तर अशा सरकारला प्रतिकार किंवा विरोध करण्याचा अधिकार कोणत्याही नागरिकाला प्राप्त आहे.

शासन संस्था देशांतर्गत कार्याबरोबरच देशाबाहेरील कार्य करीत असते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मैत्री करार प्रसंगानुसार करून आंतरराष्ट्रीय संघर्ष कमी करण्याचे कार्य शासनाकडून होत असते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपल्या देशाची प्रतिष्ठा व महत्त्व वाढविण्याचे कार्य नेहमीच केले जाते. थोडक्यात राज्यातील लोकांचा सर्वांगिण विकास व कल्याण करण्याची भूमिका शासन संस्थेकडून होत असते. नागरिकांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शासन संस्था आवश्यक ठरते. अशा रीतीने शासनसंस्था हा घटक राज्य निर्माण होण्यासाठी पोषक आहे .

**४) सार्वभौमत्व:-**

सार्वभौमत्व हा घटक पूर्ण राज्याकरिता महत्त्वाचा आहे. सार्वभौमत्वा शिवाय आधुनिक राज्याची कल्पना करता येत नाही. सार्वभौमत्व साधारणतः दोन प्रकारचे असते अ) अंतर्गत सार्वभौमत्व ब) बाह्य सार्वभौमत्व, सार्वभौमत्व म्हणजे त्या राज्यात स्वतःच्या राज्या संबंधीचे देशाअंतर्गत व देशासंबंधी जागतिक स्तरावरील निर्णय घेण्याची क्षमता किंवा सत्ता असणे म्हणजे सार्वभौमत्व होय. सार्वभौमत्व या संकल्पनेत संबंधि अधिक स्पष्टता आपणास पुढील उदाहरणावरून येऊ शकते. भारत हा देश १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी सार्वभौम नव्हता पण १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री पासून भारत हा देश अंतर्गत व बाह्य स्वरूपात सार्वमत बनला आहे.

याचप्रमाणे भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या देशांतर्गत व्यवहारात स्वतःच्या कायदेमंडळाच्या अधिकाराचा पूर्ण वापर करून देशांतर्गत व्यवस्था विकसित केली. यामध्ये कोणत्याही परकीय देशाच्या नेत्याला किंवा सत्तेला या अंतर्गत व्यवहारांमध्ये ढवळाढवळ करू दिली नाही. तसेच भारताने स्वतः चे परराष्ट्र धोरण ठरविताना आणि विदेश व्यवहार करीत असताना देशाच्या संसदेला स्मरून निर्णय

घेतले. म्हणजेच भारत हा देश अंतर्गत व बाह्य दृष्ट्या सार्वभौम आहे हे निदर्शनास येते. यासंबंधी महत्त्वाचे उदाहरण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर अण्वस्त्र निर्मिती व प्रसार याबाबतीत जे धोरण अमेरिकेच्या माध्यमातून बनविण्यात आले. त्या करारावर भारताने स्वाक्षरी केली नाही. जर अमेरिकेने या करारावर स्वाक्षरी केली तरच भारत हा देश या करारावर स्वाक्षरी करू शकतो. अशा पद्धतीची कडक, स्वाभिमानी व सार्वभौमत्व सिद्ध करणारी भूमिका भारताने घेतली.

भारतातील कायदे मंडळ किंवा सत्ताधारी पक्ष, नेते जरी आपणास सार्वभौम वाटत असले तरी अंतिमतः राज्याची सार्वभौम सत्ता ही जनतेकडे असते. कारण जनताच मतदानाच्या माध्यमातून कायदे मंडळातील सदस्य व सत्ताधारी पक्ष प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निर्धारित करीत असतात. त्याचप्रमाणे सार्वभौम सत्तेवर ती राज्यघटना प्रथा परंपरा रूढी यांचेही नियंत्रण जाणवते. त्याचबरोबर बाह्य सार्वभौमत्वावर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा, आंतरराष्ट्रीय संघटना व आंतरराष्ट्रीय करार यांचाही प्रभाव असू शकतो.अशाप्रकारे राज्याच्या महत्त्वाच्या घटकांविषयी आपण माहिती घेतली.

अशाप्रकारे राज्य या संकल्पनेच्या अंतर्गत लोकसंख्या, भूप्रदेश, शासन संस्था व सार्वभौमत्व हे चार घटक महत्त्वपूर्ण आहेत.

## २.१.४ राष्ट्र:-

राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्र हा शब्द इंग्रजी मधील नेशन ह्या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. इंग्रजी मधील नेशन हा शब्द, नेशीओ, ह्या शब्दापासून तयार झाला आहे. नेशीओ या शब्दाचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो. याचा अर्थ असा की राष्ट्र संकल्पनेचा संबंध वंशाशी व जन्माशी असतो. राष्ट्र संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्या अभ्यासणे गरजेचे आहे.

राष्ट्र निर्माण होण्यासाठी एकतेची भावना किंवा राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये निर्माण होण्याची गरज असते. म्हणजेच राष्ट्रीयता या घटकाची राष्ट्रनिर्माण होण्यासाठी आवश्यकता असते. राष्ट्रीयता म्हणजे एकतेची भावना ज्या भावनेमुळे लोक आपल्या देशासाठी बलीदान करायला तयार असतात. आपल्या देशावर जन्मभूमी वर अत्यंत प्रेम करतात.

**अशा या राष्ट्राची व्याख्या :**

काही विचारवंतांच्या १) मते," जेव्हा एखादा लोकसमुदाय स्वतःला राष्ट्र म्हणून संबोधतो तेव्हा त्याचे राष्ट्र बनते".

राष्ट्र या संकल्पनेची व्याख्या

२) प्रा. हाब्ज या विचारवंतांच्या मते," जेव्हा राष्ट्रवादाच्या भावनेने लोकांमध्ये राजकीय एकता निर्माण होते आणि त्यांना सार्वभौम सत्ता प्राप्त होते तेव्हा राष्ट्र निर्माण होते ."

३) लॉर्ड ब्राईस  या विचारवंतांच्या मते," राजकीय संघामध्ये संघटित करून स्वतंत्र झालेले अगर स्वतंत्र होऊ इच्छिणारे राष्ट्र म्हणजे राष्ट्र होय."

थोडक्यात वरील व्याख्यान वरून असे स्पष्ट होते की, राष्ट्र निर्माण होण्यासाठी एकतेची भावना आवश्यक असते . राष्ट्रीय आणि राष्ट्रीयत्व या राष्ट्रीय संकल्पनेशी संबंधित संज्ञा आहेत. एकूणच एकतेची भावना असलेला समाज आणि एकत्वाची भावना म्हणजे राष्ट्र होय.

राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया घडवणारे घटक म्हणजेच राष्ट्राचे आधारभूत घटक:-

**१) समान भूप्रदेश:-**

एकाच प्रदेशावर बराच काळ वास्तव्य केल्यामुळे तेथील लोकांमध्ये आत्मीयतेची भावना निर्माण होते. एकसंघ उपप्रदेशामुळे समाजातील वांशिक, धार्मिक भाषिक  भेद बाजूला सारले जातात. आणि लोकांना आपल्या देशा विषयी प्रेमाची भावना निर्माण होते. आपल्या मातृभूमीच्या संरक्षणार्थ आत्मसमर्पण करण्यास लोक तयार होता. भूप्रदेशा शिवाय राष्ट्र ही संकल्पनाच उभी करता येत नाही. त्यातही सलग भूप्रदेश असल्यास एकतेची भावना निर्माण होण्यास मदतच होते. याउलट खंडित भूप्रदेश असल्यास विविध भागातील लोकांमध्ये स्वतंत्र अस्तित्वाची भावना वाढीस लागते. उदाहरणार्थ पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान यांच्यामध्ये अंतर असल्यामुळे दोन्हींमध्ये समान हितसंबंध आणि एकता निर्माण झाली नाही. परिणामतः पूर्व पाकिस्तानचे बांगलादेश हे स्वतंत्र राष्ट्र उदयास आले. अर्थात सलग भूप्रदेश हा एकमेव घटक नाही. राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्यासाठी सहाय्यक ठरणारा आणखी एक घटक आहे.

**२) धार्मिक एकता:-**

समाजाला संघटित करण्याचे कार्य धर्म जास्त प्रखरतेने करतो. एकाच धर्मातील लोकांमध्ये ईश्वरी कल्पना, उपासनापद्धती, प्रथा-परंपरा व धार्मिक तत्त्वज्ञान याबाबतीत एकता असते. त्यामुळे एकच धर्म असलेल्या लोकांमध्ये भावनिक ऐक्य निर्माण होते. उदाहरणार्थ युरोपात प्रारंभी राष्ट्रवादाच्या निर्मितीस ख्रिश्चन धर्म प्रेरक ठरला.

अर्थात एकतेची भावना निर्माण होण्यास धर्म हा घटक सहाय्य करीत असल्या तरी धर्म हा एक एकमेव घटक नाही.

उदाहरणार्थ भारतात विविध धर्माचे लोक असूनही लोकांमध्ये एकतेची भावना आहे. तसेच विविध धर्मीयांमध्ये एकतेची भावना निर्माण होण्याच्या दृष्टीने भारताने धर्मनिरपेक्ष राज्याचा स्विकार केला आहे.

**राष्ट्रीयत्वाची भावना:-** राष्ट्रीयत्वाची भावना निर्मितीमध्ये समान भाषा समान धर्म समान इतिहास समान संस्कृती समान भूप्रदेश समान आर्थिक हितसंबंध समान राजकीय व्यवस्था आणि देशातील जनतेची तीव्र इच्छा म्हणजे एकत्वा संबंधीची इच्छा असे विविध घटक राष्ट्रीय राष्ट्रीयत्वाची भावना निर्मितीस मदत करतात. अशाप्रकारे वरील घटक राष्ट्रीयत्वाच्या भावना विकासामधील महत्त्वाची साधने आहेत. लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली की राष्ट्र निर्माण होते. उदाहरणार्थ स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक, अगरकर, परांजपे, आचार्य अत्रे वगैरे यांनी आपल्या वृत्तपत्रांतून लेखन करून लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण केली. जनतेत हि भावना निर्माण झाल्यानंतर स्वातंत्र्य चळवळीला वेग आला व दिशा मिळाली आणि १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला सार्वभौमत्व राज्य प्राप्त झाले.

**राष्ट्राचे बदलते दृष्टिकोन:-**

राष्ट्रीय संकल्पना आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय घटकांमध्ये एक भाषा, वंश, जात, संस्कृती, इतिहास, समान दुःख - सुख वगैरे विषय अंतर्भूत आहेत. परंतु एकविसाव्या शतकामध्ये वरील प्रकारचे घटक राष्ट्र या संकल्पनेमध्ये असलीच पाहिजे असे राहिलेले नाही. उदाहरणार्थ भारतामध्ये विविध धर्म, प्रांत, भाषा, संस्कृती, वंश अशा वेगवेगळ्या प्रकारच्या लोकसंस्कृती असूनही भारतामध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागत आहे. दहशतवादाच्या विरुद्ध, पाकिस्तानच्या कुरापती विरुद्ध, अमेरिकेची दादागिरी विरुद्ध, बांगलादेशींच्या घुसखोरां विरुद्ध,चीनच्या साम्राज्यवादाला विरोध तसेच मानवी हक्क संरक्षणासाठी संपूर्ण भारतीय जनमानस एक होताना दिसते. दिल्लीमधील निर्भया बलात्कार प्रकरण, पर्यावरणवादी चिपको आंदोलन, अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधातील आंदोलन व सध्याच्या काळातील कोरोना विरोधातील भारत सरकारचा लढा अशा प्रसंगांमध्ये संपूर्ण भारतीय जनता एक राष्ट्र म्हणून या वेगवेगळ्या चळवळीमध्ये तसेच भारत सरकारच्या मोहिमेमध्ये " एक देश - एक राष्ट्र " या भावनेने एकरूप झालेले दिसतात.

❖❖❖❖

# २.२

## नागरी समाज व बाजार

**घटक रचना**

२.२.१ प्रस्तावना
२.२.२ संकल्पना
२.२.३ नागरी समाजाचे स्वरूप
२.२.४ नागरी समाज उद्याची कारणे
२.२.५ नागरी समाजाची भूमिका
**२.२.६ बाजार**

### २.२.१ प्रस्तावना

नागरी समाज (समुदाय) ही संकल्पना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक शास्त्राच्या अध्ययनात व्यापक प्रमाणात अभ्यासली जाणारी आहे. सतराव्या शतकातील जॉन लॉक या ब्रिटिश विचारवंताने, समाजाने राज्याचे विभाग विशद करण्यासाठी व समाजाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी "नागरी समाज", समुदाय या संकल्पनेचा उपयोग केला आहे असे आपल्या राजकीय विवेचनामध्ये सांगितले आहे.

नागरी समुदायाला सुसंस्कृत समुदाय असेही म्हटले जाते कारण, असा समुदाय शोषण मुक्त, समाज धिष्टीत व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना करणारा असतो. निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा समावेश किंवा सहभागाची समानसंधी असते .या संकल्पनेचे मूर्त स्वरूप म्हणजे बिगर शासकीय संस्था म्हणजे एन.जी.ओ. (अशासकीय संघटना) किंवा स्वंसेवी संस्था .या संस्था स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक पातळीवर समाजोपयोगी उपक्रम राबवतात.

शासकीय उपक्रमांना समांतर आणि पूरक असे नागरी समाजाचे उपक्रम असतात .कल्याणकारी उपक्रमात विशेषतः शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात त्याचा कार्यभाग उत्तरोत्तर विस्तारित होतो आहे. पर्यावरण संवर्धन, दुर्बल समाज घटकांच्या अधिकारांसाठी, शासकीय व्यवहारात पारदर्शकता व उत्तरदायित्व, भ्रष्टाचारास विरोध या क्षेत्रात भारतात अशा प्रकारच्या संघटना क्रियाशील असलेल्या दिसून येतात.

१९७० च्या शतकापासून भारतात त्यांच्या कार्यभागात शासकीय स्वीकृती मिळाली आहे. विशेषता: ग्रामीण विकासाचे शासकीय उपक्रम राबविण्यास त्यांचा सहभाग असावा आणि शासनाशी त्याने सहकार्य करावे अशी भूमिका सरकारने स्वीकारली आहे.

## २.२.२ नागरी समाज संकल्पना

नागरी समाजाची संकल्पना तशी बरीच जुनी आहे. गरजेनुसार नागरी समाज विकसित झाला आहे. विविध ठिकाणी व पातळीवर काम करणार्या अशासकीय संघटना, संस्था विविध प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींनी स्वतः चे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

सध्या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकारणात या संकल्पनांची नव्याने चर्चा सुरु झाली आहे. अनेक राजकीय विचारवंतांनी या संकल्पनेचा संदर्भ घेऊन आपल्या सैद्धांतिक मंडणीचा विकास केला आहे.

जाँन लाँक या विचारवंतांच्या मते, " नागरी व राजकीय समाज हा एकच असतो. नागरी समाजा मध्येच राज्य संस्था निर्माण होऊ शकते. नागरी समाजात शिस्त, सुरक्षा व सुव्यवस्था या बाबी शक्य आहे. "

जर्मन विचारवंत हेगेल यांच्या मते," राज्य व नागरी समाज या दोन वेगवेगळ्या प्रकारच्या स्वतंत्र संस्था आहेत, नागरी समाज ही कुटुंब संस्था व राज्य संस्था यांच्या मधील अवस्था आहे. राज्य ही सर्वोच्च सामाजिक संस्था आहे . "

## २.२.३ नागरी समाजाचे स्वरूप

१) नागरी समाज कायद्यावर आधारित असल्याने त्यामध्ये सहमतीला जास्त महत्व असते. नागरी समाज म्हणजेच समान उद्दिष्ट प्राप्तीसाठीचे मुक्त संघटन होय. तसेच त्याचे सदस्यत्व सहमतीनेच स्वीकारलेले असते. शक्तीने नव्हे.

२) नागरी समाज या व्यवस्थेचा राजकीय व्यवस्था व राजकारण यांच्याशी थेट संबंध नसतो. राजकीय क्रिया-प्रक्रिया पासून हे वेगळे असते.

३) नागरी समाजाचे क्षेत्र बाजारपेठे पासून अलिप्त आहे. बाजारपेठे मध्ये नफा मिळवणे हे सर्वस्व उद्दिष्ट असते. परंतु नागरी समाजातील घटक फक्त फायदा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम न करता जनसेवा, समाजाचा विकास हे ही उद्दिष्ट असते.

४) नागरी समाज व्यवस्था लोकशाही तत्त्वांना मान्यता देते. तसेच लोकशाही व्यवस्थेविरुद्ध असणाऱ्या क्रिया -प्रक्रिया, व्यवस्था यांना विरोध करते. (उदा. देशांतर्गत असलेली बंडखोरी, दहशतवाद, गुन्हेगारी वृत्ती व कृती)

## २.२.४ नागरी समाजाच्या उदयाची कारणे

वैश्विक पातळीवरील जनतेने मानवाशी निगडित असलेल्या विविध प्रश्न संबंधित देश जात या पलीकडे जाऊन एकत्रित आवाज उठविण्याचा प्रयत्न नेहमीच केला आहे या पद्धतीनेच जागतिक स्तरावरील नागरी समाजाच्या उदयायाला कारणीभूत घटक बनले आहेत.

**उदाहरणार्थ :-**

अ) मानवी हक्काबाबत उठलेला जागतिक आवाज.

ब) लोकशाही समर्थनार्थ वैश्विक पातळीवर झालेले विचारमंथन व आंदोलने.

क) दहशतवाद विरोधी उठलेले आवाज, जगाच्या कानाकोपऱ्यातून झालेला उठाव.

१) राष्ट्रीय पातळीवर नागरी समाजाची संकल्पना पुन्हा नव्याने मांडण्यात आली. शांतता आणि मानवी हक्क हे जागतिक विषय असल्याने या विषयावर आधारित नागरी संघटनांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले. शीत युद्ध संपल्यानंतर संक्रमण अवस्थेत असलेल्या नागरी समाजाची आर्थिक आणि राजकीय पुनर्रचनेच्या कार्यात महत्त्वाची भूमिका होती. हे संघटन योग्य दिशा दाखवेल असा विश्वास जनतेला आहे.

२) दिवसेंदिवस राज्याचे स्वरूप बदलत आहे. कल्याणकारी राज्याची जागा नवउदारमतवादी राज्याने घेतलेली आहे. याचा परिणाम म्हणजे विकसित जगात नागरिकांचे कल्याणकारी कार्यक्रम हिरावून घेण्यात आले. त्यांना मिळणाऱ्या सवलती आणि अनुदाने बंद झाली. विकसनशील देशांमध्ये नवउदारमतवादी धोरणामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना असलेले राज्याचे संरक्षण नष्ट झाले. त्यामुळे नागरी समाजाने विविध संस्था - संघटनांच्या मार्फत या घटकाच्या विकासासाठी पुढाकार घेतला. यातूनच नागरी समाजाचा उदय व विकास होत गेला.

३) दरम्यानच्या कालखंडात उत्तम आणि आदर्श प्रशासनाची संकल्पना म्हणजे सुशासन ही मांडली जाऊ लागली. या संकल्पनेच्या चर्चेमुळे नागरिकांना सरकारी संस्थांच्या मर्यादांची जाणीव झाली. सरकारी सेवांच्या कार्य क्षमतेबद्दल आणि योग्यतेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाली . त्यामुळे सरकारी सेवे विरुद्ध दाद मागण्यासाठी जनता संघटित होऊ लागली . शासनाच्या कार्यातील सहभागामुळे प्रशासनातील पारदर्शकता व अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढीस लागली या माध्यमातून नागरी समाजाचा नव्याने विकास होत आहे.

## २.२.५ नागरी समाजाची भूमिका

समकालीन समाजात नागरी समाजाचा कार्यभाग दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. जगातील प्रत्येक देशातील सरकार व त्याची यंत्रणा जनतेच्या उंचावलेल्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यात कमी पडत आहे. सरकारी यंत्रणेच्या काही मर्यादा सुद्धा आहेत. सरकारने कोणतीही विचारसरणी स्वीकारलेली असली तरी सध्याच्या जागृत जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे व नागरिकांना उच्च प्रतीच्या सुविधा देणे हे कोणत्याही स्तरावरील शासकीय यंत्रणेच्या कक्षेच्या बाहेरील विषय होत आहे. त्यामुळेच जागृत समाज एकत्रित येऊन आपले प्रश्न आपल्या पातळीवर आपणच सोडवावेत या भूमिका घेत आहे. यातूनच नागरी समाजाचा उदय, विकास व कार्यभाग म्हणजेच भूमिका विस्तारल्या जात आहेत.

**१) लोकतंत्राचा विस्तार :-** समाजामध्ये असे काही गट आहेत की ज्यांना लोकशाही व्यवस्थेत सुद्धा जमेस धरले जात नाही किंवा त्यांचे मत किंवा भूमिका मांडता येत नाही, बजावता येत नाही असा गट नागरी समाजाच्या माध्यमातून आपल्या आचार व विचारांचा आविष्कार करीत आहे. यातूनच लोकशाहीच्या वाढीस हातभार लागत आहे. जागतिक स्तरावरील संस्थानच्या व्यवहारांमध्ये ही लोकशाही तत्त्वांच्या माध्यमातून सुधारणा करण्यासाठी नागरी समुदाय आंदोलने करीत आहे. उदाहरणार्थ युनो, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वगैरे.

**२) विकासासाठी पर्यायी व्यवस्था:-** देशातील सरकारे व त्यांची यंत्रणा विकासाचे सर्व प्रकल्प राबविण्यात कमी पडताना दिसत आहे. गेल्या शतकात सामाजिक न्याय, साक्षरता, समाजाचे राजकीय समाजीकरण, विविध प्रश्नांची जाण असे काही विषय पुढे आले. समाजाच्या वाढत्या आकांक्षाच्या आधारे देशांतर्गत राजकीय संस्था व त्यांच्या कार्यपद्धती मर्यादित दिसु लागल्या. काळानुसार काही विषय हाताळणे, स्थाई प्रकल्प राबवणे आणि त्यासाठी जनजागृती करणे गरजेचे होते . त्यानुसार शिक्षणाचा प्रसार, आरोग्य सुविधा,पर्यावरण विकास या क्षेत्रामध्ये शासकीय कार्याच्या बरोबरच नागरी समुदायांनी स्वतःला झोकून दिले व आरोग्य - शिक्षण या क्षेत्रात विकासाचे प्रकल्प विस्तारत गेले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा पाणी, पर्यावरण, लोकशाहीकरण अशा विषयांची मोठ्या प्रमाणात जनजागृती होऊन लोकसहभागाच्या माध्यमातून विकास प्रकल्प साकारताहेत. उदाहरणार्थ पर्यावरणवादी नर्मदा बचाव आंदोलन, चिपको आंदोलन , वर्ल्ड सोशल फोरम, वसुंधरा परिषद व ग्रीन सोसायटी वगैरे.

**३) मार्गदर्शकाची भूमिका:-** मानवी हक्काचे उल्लंघन, पर्यावरणाचा ऱ्हास, पाण्याचा अपव्यय, स्त्रिया व मुलांचे शोषण अशा क्षेत्रात स्थानिक देश व आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय संस्थांना स्वयंसेवी नागरी संघटनांमध्ये सहभागी असलेल्या याविषयीच्या जाणकारांनी, नेतृत्वाने मार्गदर्शकाची भूमिका बजावल्याचे दिसते. त्यांच्या प्रयत्नामुळे जागतिक अर्थकारण, राजकारण यामध्येही बदल होत आहे. बालमजुरीच्या विरुद्ध स्त्रियांच्या शोषणाच्या विरुद्ध अनेक देशांमधून आवाज उठल्यामुळे कायदे निर्माण होत

आहेत. एच आय व्ही एड्स बाधित रुग्णांना योग्य वागणूक व रास्त दरात औषधे मिळावी त्याकरिता नागरी संघटनांनी जगभर आवाज उठविला. याचे नेतृत्व ही मार्गदर्शकाच्या भूमिकेतून नागरी संघटन करीत आहेत.

**४) आवश्यक माहितीचा प्रचार व प्रसार:-** समाजातील जागृत व उत्साही स्वयंसेवकांनी समाजातील वेगवेगळ्या घटकांच्या प्रबोधनाची जबाबदारी घेतल्याचे दिसते. नागरी संघटना स्वतंत्ररित्या या बाबतीमध्ये काम करताना पाहायला मिळते. स्त्रीवादी चळवळी, पुरुष मुक्ती आंदोलन, मुलांच्या शिक्षणाचा हक्क, पर्यावरण, पाण्याची बचत - वापर व मृदुसंधारण अशा अनेक विषयांवर जनजागृतीचे वेगवेगळ्या माध्यमातून विषय हाताळले जातात. अलीकडच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरी संघटन पाहिजे तसे जनमत तयार करताना दिसते.

थोडक्यात प्रत्येक क्षेत्रात शासनाची जबाबदारी आहे. असे म्हणून आता चालणार नाही. याआधीच्या शतकामध्ये या भूमिकेच्या माध्यमातून काम झाले. परंतु लोकसंख्या विस्तार आणि समाजाच्या आशा-आकांक्षा चा विकास झाल्याने केवळ सरकारकडे पाहून किंवा बोट दाखवून चालणार नाही. म्हणून स्वयंपूर्ण खेडी हे जसे महात्मा गांधींचे स्वप्न होते तसेच अलीकडच्या काळामध्ये स्वयंपूर्ण गृहनिर्माण सोसायटी याची ही गरज बनली आहे. याच बरोबर स्थानिक शासन, राज्य शासन, केंद्र शासन व वैश्विक संस्था या सर्वांनीच जगाच्या समोरील प्रश्न ओळखून मानवाच्या बरोबरच संपूर्ण सजीव सृष्टी यांचे जतन व्हावे, निसर्गाचा स्थायी विकास व्हावा यादृष्टीने अभ्यास करून प्रकल्प राबवण्याची गरज आहे . यामध्ये राजकीय संस्थांच्या बरोबरच सामाजिक म्हणजेच नागरी समाजाची भूमिका अत्यंत महत्वाची असेल . म्हणूनच रोटरी क्लब, रोटरी क्लब , स्थानिक स्तरावरील विविध ट्रस्ट, प्रतिष्ठान, टाटा ट्रस्ट व रिलायन्सच्या सेवाभावी उपक्रम यांच्याकडून सामान्यांच्याच नव्हे तर शासनाच्या ही अपेक्षा वाढलेल्या दिसतात.

## २.२.६ बाजार

### बाजार संकल्पना

### परिचय

आधुनिक काळात आर्थिक क्रिया जगभरात घडतात . ज्यामध्ये बाजारपेठे सारख्या क्रिया समाविष्ट असतात. बाजारपेठेत मध्ये खरेदी, विक्री, तारण, साठा आणि संग्रहित असंख्य पद्धती असू शकतात.भांडवलशाही ही मुख्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण पद्धत बनली आहे. ज्या संस्थांच्या माध्यमातून या गोष्टी घडतात त्यांना बाजारपेठ म्हणतात. पैसा हे साधन आहे. वस्तू आणि सेवांच्या देवाणघेवाण आणि व्यवहारासाठी बाजापेठेचा वापर केला जाते.

**बाजारपेठा:-**

आर्थिक बाजारपेठा, गृहनिर्माण बाजार, कामगार बाजार किंवा शेती माल बाजार यासारखे भिन्न प्रकार आहेत. बाजार त्याचप्रमाणे बऱ्याचदा आपण स्थानिक बाजार, प्रादेशिक बाजार, राष्ट्रीय बाजार आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजार याबद्दल चर्चा करतो.

आंतरराष्ट्रीय बाजार. राजकीय सिद्धांताच्या दृष्टीकोनातून बाजारपेठ दोन आहेत.

१) पहिला अनुभवजन्य आणि

२) दुसरा आदर्शवादी आहे.

तत्पूर्वी राजकीय सिद्धांत समजून घेणे गरजेचे आहे.

राज्य आणि बाजारातील भूमिकेचे विश्लेषण करून बाजार, समाज आणि राज्य यांच्यातील संबंधांचे विश्लेषण करावे लागते. राजकीय मूल्यांच्या दृष्टीने बाजारावरील परिणाम समजून घेणे हे त्याचे उद्दीष्ट आहे. जसे की न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि हक्क.

**बाजारपेठेची व्याख्या:-**

चॅपमन बाजारपेठेची व्याख्या अशी करतात, 'एखाद्या ठिकाणी वस्तू, खरेदीदार आणि विक्रेते जे एकमेकांशी भिन्न स्पर्धेत आहेत'.

अर्थशास्त्रज्ञ बाजारपेठेला अर्थव्यवस्थेचा प्रकार म्हणून परिभाषित करतात जे उत्पादन आणि विक्रीला प्रोत्साहन देतात.

**बाजाराचे वैशिष्ट्य:**

१. बाजारपेठा निसर्गाच्या स्वरुपाच्या असतात. हे कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या किंवा विशिष्ठतेच्या मालकीच्या नाही. उदारमतवाद बाजाराच्या समर्थकांच्या मते, कृत्रिमरित्या डिझाइन केलेला व्यवसाय नाही तर मानवी कृतीचा परिणाम म्हणून उद्भवणारी बाजारपेठ आहे. बाजारात विकत घेतलेल्या आणि विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमती उत्पादक, विक्रेते आणि खरेदीदार अशा विविध घटकांच्या जटिल व्यवहारात आधारित आहेत.

२. मागणी व पुरवठ्याची प्रक्रिया ही बाजाराची मध्यवर्ती यंत्रणा आहे. बाजारपेठ म्हणजे चलन आणि वस्तूंचा प्रवाह असतो. उत्पादक, घाऊक विक्रेते, एजंट्स, पुरवठा करणारे आणि खरेदीदार यासारख्या प्रक्रियेत बऱ्याच घटकांचा, कलाकारांचा सहभाग असतो. प्रत्येक व्यवसायी एखाद्या प्रकारे बाजाराच्या कामकाजावर परिणाम करतो. बाजारात कार्यरत असलेले संपूर्ण पुरवठा आणि मागणीचे जाळे कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. बाजारपेठा ही स्थानिक आणि व्यापक देखील असतात. वस्तू आणि सेवांच्या किंमती वेगवेगळ्या बाजारात भिन्न असतात आणि कालांतराने त्या बदलू

शकतात. या सर्व गोष्टी अगदी नैसर्गिक म्हणून समजल्या जातात. कारण वेळ आणि स्थानानुसार बदलणाऱ्या समाजाच्या मागणी आणि वस्तू ची किंमत ठरवित नाही. बाजारात काम करणारे व्यापारी स्वार्थाच्या हेतूने चालविले जातात. बाजारात खरेदीदार स्वस्त दरात वस्तू खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. दुसरीकडे उद्योजक त्यांच्या व्यवसायासाठी जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न करतील. कारखाने व उद्योगातील कामगार जास्त नफा आणि वेतनासाठी काम करतात. स्पर्धा ही बाजारपेठेची महत्त्वाची ओळख आहे. जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी बाजारातील प्रत्येक घटकाने एकमेकांशी जोडून काम केले पाहिजे. आदर्शपणे असे मानले जाते की, बाजारपेठ स्पर्धा मुक्त आणि न्याय्य नियमांवर आधारित असावी. अशा स्पर्धेच्या अंतिम परिणामावर काहींनी नफा कमावला आहे आणि इतर काही गमावले आहे. विचारवंतांच्या मते बाजार स्वयं-नियमनाच्या तत्त्वावर आधारित असतात. दीर्घ काळामध्ये बाजार संतुलनाकडे वाटचाल करतात. म्हणूनच राज्यासारख्या बाहेरील बाबींनी प्रक्रियेत हस्तक्षेप करू नये. जेणेकरून ते बाजारात विकृती आणेल. बाजाराच्या नियमांनुसार बाजारावर नियामक एजन्सीचे पालन करणाऱ्या नियामक एजन्सीची राज्याने कमीतकमी भूमिका निभावली पाहिजे.

**बाजाराचे सिद्धांत:-**

मर्कैंटिलिझम हा बाजारपेठेचा प्रमुख सिद्धांत आहे. याने राष्ट्र-राज्य प्रणालीच्या स्थापनेदरम्यान युरोपमध्ये विकसित झालेल्या नव्या राज्यांनी आपापसांत स्पर्धात्मक नातेसंबंध जोडले. मर्कैंटिझलिझम हा शब्द स्कॉटिश राजनैतिक अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी तयार केला होता. मर्कैंटिझलिझम ही कल्पना आहे की जगामध्ये संसाधने मर्यादित आहेत आणि संसाधनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रत्येक राज्याने इतर राज्यांसह संघर्ष केला आहे. एका राज्यासाठी झालेला तोटा म्हणजे तोटा . मर्कैंटिलिस्ट हे राज्य समाज, अर्थव्यवस्था आणि व्यक्तींपेक्षा प्रमुख घटक म्हणून ओळखले जाते. त्यांच्या दृष्टीकोनातून, बाजार हे राज्याचे घटक आहे आणि राज्यात स्वतंत्रपणे अस्तित्त्वात नाही. त्याची शक्ती वाढविण्यासाठी उत्पादन, वापर, विनिमय आणि गुंतवणूक हे राज्य शासित असले पाहिजे. देशांतर्गत व आंतरराष्ट्रिय राजकारणामध्ये राज्याचा उद्देश पूर्ण होईपर्यंत बाजारपेठेला महत्त्व आहे. राज्याची आत्मनिर्भरता वाढविण्यासाठी बाजाराने आपली कृती करणे आवश्यक आहे. बाजारपेठेतून निर्माण होणारी अतिरिक्त संपत्ती राज्य द्वेषबुद्धीने युद्ध करण्यासाठी वापरु शकते. १५-१८ व्या शतकापर्यंत मर्कैंटिलिझम हे अतिशय लोकप्रिय होते व मोठ्या प्रमाणावर त्याचा विस्तार देखील होत होता. स्पेन, इंग्लंड, हॉलंड आणि फ्रान्स सारखे देश आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील वसाहती हस्तगत करण्यासाठी तीव्र स्पर्धा करीत होते. आणि काही प्रमाणात ते युरोपियन राज्यांची राष्ट्रीय शक्ती वाढविण्याच्या प्रयत्नात देखील होते. मर्कन्टिलिझम स्थानिक बाजारपेठेला चालना देण्यावर विश्वास ठेवते. राज्यातील आर्थिक आणि लष्करी सामर्थ्य वाढविणाऱ्या उद्योग, कंपन्या आणि महामंडळ यांना जोरदार पाठबळ दिले जाते. मर्कैंटिलिस्टची धोरणे

संरक्षक आहेत. जे राज्य आयात वस्तूंवर जास्त दर लावतात. यामुळे ग्राहकांना आयातित वस्तू खरेदीपासून रोखता येईल आणि परिणामी त्याचा फायदा देशांतर्गत बाजारपेठेला होईल. अधिक श्रम करून, असे मानले जाते की, बाजाराची उत्पादकता आणि नफा मिळू शकते. याचा शेवटी राज्याला फायदा होईल.

**बाजारपेठेसंबंधी अभिजात उदार दृष्टीकोन: -**

उदारमतवादी सिद्धांत किंवा शास्त्रीय राजकीय आर्थिक सिद्धांत एक सिध्दांत म्हणून उदयास आला. त्यांना आर्थिकदृष्ट्या मागास राज्यातील हस्तक्षेप न करण्यावर ठाम विश्वास होता. मुळात राजकारणाने कृषी बाजारात हस्तक्षेप करू नये असा युक्तिवाद करत होते. जे विचारवंत अहस्तक्षेपा चा पुरस्कार करत होते त्यांचे नाव ॲडम स्मिथ होते, ज्यांनी बाजारातील अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने लायसन्स ची कल्पना दिली. स्मिथने नमूद केले की 'आर्थिक माणूस' एक स्वारस्यपूर्ण आणि तर्कशुद्ध घटक आहे. जो नफा मिळविण्याच्या उद्देशाने बाजारात प्रवेश करतो. स्पर्धा ही बाजाराची स्वयं-नियंत्रित यंत्रणा बनते. दीर्घकाळात बाजार हा मुक्त सर्वांसाठी समृद्धी आणतो. डेव्हिड रिकार्डो आणखी एक विचारवंत होते ज्यांनी मुक्त बाजाराच्या भूमिकेची वकिली केली. तुलनात्मक फायद्याचे सिद्धांत देशांतर्गत स्तरावर कार्यक्षम बाजाराच्या परिस्थितीत वाढ करण्यासाठी युक्तिवाद करतात. याचा अर्थ असा आहे की, एखाद्या देशाने केवळ त्या वस्तू व सेवांचे उत्पादन केले पाहिजे जे किमान उत्पादन खर्च आणि गुणवत्ता युक्त असेल. हे इतर देशांमधून उर्वरित वस्तू आयात करू शकते. जर सर्व देश या तत्त्वाचे पालन करतात तर हे संपूर्ण जगात समृद्धी आणेली. युरोपबाहेर युनायटेड स्टेट्स हा बाजारातील अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा विजेता बनला. जागतिक युद्धानंतरही बाजारावरील विश्वास दृढ राहिला. दुसऱ्या महायुद्धानंतर १९३० च्या दशकात झालेल्या मोठ्या नैराश्याने मुक्त बाजारपेठेच्या मॉडेलवर प्रश्न उपस्थित केला.

**बाजाराविषयी मार्क्सवादी दृष्टिकोन : -**

१९ व्या शतकात भांडवलशाहीची भरभराट झाली आणि भांडवलशाही समाजाच्या संघटनेत बाजाराचे मुख्य सिद्धांत बनले आणि त्यामुळे नवीन संकट ओढवले. भांडवलशाही आणि बुर्जुआ वर्गातील कामगार वर्गाचे शोषण होते जे बाजार अर्थव्यवस्थेचे मुख्य लाभार्थी होते. कार्लमार्क्स हा पहिला विचारवंत होता ज्यांनी बाजाराच्या अर्थव्यवस्थेवर पद्धतशीर टीका केली. भांडवलशाहीचे वैशिष्ट्य समजावून सांगण्यासाठी आर्थिक वाढीचा अर्थसंकल्प, त्यानुसार कोणत्याही समाजात आर्थिक आणि भौतिक घटकांची मुख्य भूमिका असते त्याबद्दल त्यांनी भौतिक बाबींचा आधार आणि राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींना अंधश्रद्धा म्हणून संबोधले. भांडवलशाहीमध्ये बाजारपेठ हा समाजातील इतर घटक ठरविणारा आधार आहे. मार्क्स असा तर्क करीत होते की, बाजारपेठ ही भास आहे. ज्यात भांडवलशाही वर्गाकडून कामगार वर्गाचे शोषण केले जाते. कामगारांना बाजारात वास्तविक स्वातंत्र्य नसते. कारण मजुरीची रचना ही नेहमीच वर्किंग क्लासच्या हिताच्या विरोधात असते. मार्क्स

असा तर्क करीत होते की केवळ कामगार वर्गाने आणि कम्युनिझमच्या स्थापनेनंतर जागतिक स्तरावरील क्रांती झाल्यास वर्गहीन समाज निर्माण होईल. मार्क्सच्या साम्यवादा नुसार खाजगी मालमत्ता संपविली जाईल आणि भौतिक संसाधने एकत्रितपणे समाजाच्या मालकीची असतील आणि सर्वांमध्ये समान वाटल्या जातील. विसाव्या शतकातील कम्युनिस्ट क्रांतीने खाजगी मालमत्ता आणि राज्य नियामक मंडळे रद्द करून मार्क्सियन धोरणाचा प्रयोग केला.

**बाजारपेठेबाबत आधुनिक उदारमतवादी दृष्टीकोन: -**

विसाव्या शतकाच्या मध्यवर्ती कालखंडातील विचारवंतांनी 'अहस्तक्षेपी ' 'लैसेझ-फेअर' या सिद्धांतावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यास सुरुवात केली. जॉन मेनान्ड केन्स यांनी 'दि जर्नल थ्योरी ऑफ एम्प्लॉयमेंट इंटरेस्ट अँड मनी' या पुस्तकात एकत्रीकरणाच्या पातळीवर परिणाम घडवून स्व-नियमन बाजाराच्या विश्वासावर विश्वास ठेवला. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की राज्याने वाढीव सार्वजनिक खर्च वाढवून किंवा कर कमी करून बेरोजगारी कमी केली पाहिजे. केन्सचा असा तर्क होता की नियमन नसलेले बाजारपेठ केवळ एक आदर्श आहे. वास्तविक जगात म्हणजे जटिल औद्योगिक समाजात काम करणे शक्य नाही. नागरी समाजात समृद्धी आणि सुसंवाद वाढविण्यासाठी बाजारात राज्य हस्तक्षेप आवश्यक होता. औद्योगिक-पश्चिमी जग आणि नंतरच्या वसाहतींच्या राज्यांनी कल्याणकारी राज्ये म्हणून प्रसिद्ध असलेल्या विनियमित बाजारपेठेच्या केनेशियन कल्पनांची अंमलबजावणी केली. कमीतकमी पाश्चिमात्य देशात १९५० आणि १९६० च्या दशकात अभूतपूर्व आर्थिक वाढ आणण्याचे श्रेय केनेसियन पॉलिसींना देण्यात आले.

**नवीन उदारमतवाद आणि बाजारपेठ: -**

१९७० च्या दशकात पाश्चात्य जगात आर्थिक पेच होता. काही विचारवंतांनी कल्याणकारी मॉडेलवर टीका करण्यास सुरवात केली आणि मुक्त बाजार अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाचे समर्थन केले. निओ उदारमतवादी विचार म्हणून हा सिद्धांत ज्ञात झाला. फ्रेडरिक ऑगस्ट फॉन हायक हा एक मुक्त समर्थक होता. हायक यांनी अर्थव्यवस्थेतील बहुतेक प्रकारच्या हस्तक्षेपाला सरकारी अभियंत्याधिकारवादाचा मार्ग मानले. मिल्टनफ्राइडमॅनने आपल्या नावेनिधीच्या सिद्धांतामध्ये म्हटले आहे की, केवळ स्व-नियमन मुक्त बाजारपेठेमुळे उत्पादन योग्य प्रमाणात आणि कामगारांना पुरेसे वेतन यांच्यात असंतुलन मिळू शकते. रॉबर्टनोजिकने बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेचा नैसर्गिक हक्कांच्या आधारावर बचाव केला. एखाद्या व्यक्तीने त्याच्या आयुष्यावर आणि त्याच्या स्वत: च्या कौशल्याद्वारे त्याने तयार केलेल्या संसाधनांवर अधिग्रहण करण्याचा युक्तिवाद केला. बाजार ही अशी संस्था अशी आहे, जी एखाद्या व्यक्तीच्या मालमत्तेच्या हक्काची हमी देते. बौद्धिक युक्तिवादाने नव-उदारमतवादी धोरणे वाढविण्याचा मार्ग मोकळा झाला. ज्याने बाजाराच्या भूमिकेला प्राथमिकता दिली. १९८० च्या दशकात अमेरिकेत रोनाल्ड रीगन आणि युनायटेड किंगडममधील मार्गारेट थॅचर यांनी नव उदारमतवादी धोरणे राबविली. नंतर जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने

विकसनशील जगासाठी निओ उदारमतवादी धोरणे तयार केली. नंतर १९९० च्या दशकात जागतिकीकरणाचे मूलभूत ॲसप निओ उदारमतवादी विकसित होत गेले.

**प्रश्न**

१. राज्य म्हणजे काय? राज्याच्या विविध घटकांची चर्चा कर

२. राज्याची व्याख्या कर व राज्याच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घ्या

३. राष्ट्र ह्या संकल्पनेची व्याख्या करा आणि राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया घडवणारे घटक कोणते ही विस्तारीतपणे लिहा

४. नागरी समाजाचा अर्थ लिहा व त्याची भूमिका लिहा

५. नागरी समाज व बाजारपेठ यांमधील अंतरसंबंधांचे वर्णन करा

❖❖❖❖

# ३

# सत्ता अधिसत्ता व अधिमान्यता

**घटक रचना**

३.१ सत्ता
संकल्पना, स्त्रोत आणि प्रकार
३.२ अधिसत्ता
व्याख्या, स्त्रोत व विविध प्रकार
३.३ अधिमान्यता
अर्थ, स्त्रोत, आणि अधिमान्यतेची वैशिष्ट्ये

## ३.१ सत्ता

### संकल्पना, स्त्रोत आणि प्रकार

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासामध्ये सत्तेची संकल्पना सर्वात महत्त्वपूर्ण संकल्पना म्हणून ओळखली जाते. सत्ता हि संकल्पना राज्यशास्त्राच्या अभ्यासात मध्यवर्ती असल्यामुळे या संकल्पनेला राजकीय सिद्धांत व राजकीय विश्लेषणात अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यशास्त्राच्या अध्यापनाचा अभ्यासबिंदू 'राज्य व शासनाच्या अभ्यासापासून ते 'सत्तेच्या विवेचना पर्यंत' विकसित व परिवर्तीत झाल्यामुळे सत्तेची अभ्यास कक्षा अधिक वृद्धिंगत झाली आहे. सर्वसाधारणपणे सत्तेचा अर्थ इतरांच्या वर्तनावर प्रभाव पाडण्याची क्षमता असा होतो. सामाजिक परस्पर क्रियेमध्ये सत्ताधारी बिगर सत्ताधार्यांसाठी नको असलेले किवा प्रतिकूल परिणाम घडवून आणू शकतो. थोडक्यात सत्ता म्हणजे एक प्रकारचे वर्तन आहे ज्याची उत्पत्ती सामाजिक वर्तनातून झाली आहे. सत्ता हि अशी संज्ञा आहे जिचा संबंध इतरांच्या वर्तनावर अंकुश ठेवण्यासंदर्भाशी आहे व बिगर सत्ताधारी यांना आपल्या मर्जी प्रमाणे सत्ताधार्यांबरोबर वागता येत नाही व स्वत्ताची इच्चा नसताना सुद्धा सत्ताधाऱ्या इशाऱ्या नुसार वागावे लागते. सत्ताधार्यांकडे कोणतेही परिणाम घडवून आणण्याची क्षमता असल्यामुळेच त्यांचे इतरांना ऐकावे लागते.

### ३.३.१ सत्तेचा अर्थ व व्याख्या

प्रत्यक्ष राजकारण व राज्यकीय प्रक्रियेचे ताणेबाणे समजून घेण्यास सत्ता संकल्पना महत्वपूर्ण ठरते.विविध मापदंड लावून अनेक विचारवंतानी सत्तेसंदर्भात अनेक व्याख्या सांगितल्या आहेत. सर्वसाधारणपणे प्रभाव,बलप्रयोग व संसाधनांवरील नियंत्रण यांच्याशी सत्तेचा संबंध आहे. सत्ता हि संकल्पना म्हणूनच अधिसत्ता, एकाधिकारशाही किवा निग्रह इ संज्ञांच्या समानार्थी रूपाने व्यवहारात वापरली जाते. त्यामुळे सत्ता ह्या संकल्पनेचा

अर्थ अत्यंत किचकट होतो व म्हणून तिची व्याख्या देखील अत्यंत गुंतागुंतीची होते. खालील विचारवंतानी सत्तेच्या काही महत्वपूर्ण व्याख्या दिल्या आहेत. ह्या व्याख्यांमधून सत्तेचा आकृतिबंध बोध व्हायला मदत होते.

१. **रॉबर्ट दहाल-** त्याने सत्तेची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे:- '**अ**' कडे सत्ता असल्या कारणाने तो '**ब**' वर सत्ता गाजवतो. म्हणजेच '**ब**' हा '**अ**' ने सांगितलेले सर्व काही करतो किवा करावयास परावृत्त होतो. या ठिकाणी आपली इच्छा नसताना '**ब**' ला '**अ**' चा हुकुम/ आदेश मानवा लागतो कारण तसे न केल्यास '**अ**' कडे '**ब**' ला नको असलेले परिणाम घडवून आणण्याची क्षमता असते. ह्या व्याखेतून सत्तेसंदर्भात दोन निकष काढता येतील.

    अ) "सत्ता म्हणजे व्यक्तींकडे असलेले असे गुण-वैशिष्ट्ये ज्याचा उपयोग ती व्यक्ती इतर व्यक्तींवर करते व त्या व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणते".

    ब) सत्ता म्हणजे इतरांवरील वर्चस्व

२. **बर्ट्रांड रसेल-** "अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची क्षमता".

३. **डेव्हिड इस्टन –**"एक व्यक्ती व गट जेव्हा स्वताःच्या इच्छेनुसार इतरांच्या कृती निर्धारित करतो तेव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय".

४. **इ.एम.कोल्टर –** "सत्ता म्हणजे एखादी घटना घडवून आणण्याची क्षमता तसेच अशी घटना त्या क्षमते शिवाय घडू शकत नाही ह्या वस्तुस्थितीला सत्ता असे म्हणतात."

५. **कोसर व रोसेन्बेरी –** सत्ता म्हणजे स्वताच्या सहानुभूतिपूर्ण इच्छेशी सुसंगत असे इतरांचे वर्तन सिमाबद्ध करणे.

६. **मॅक्स वेबर-** कोणत्याही घडामोडी, प्रसंग किंवा स्त्रोतांवर नियंत्रण मिळविण्याची क्षमता व त्याचबरोबर कितीही अडथळे, प्रतिकार व विरोध झाल्यावर देखील स्वतःला हवे असलेल्या गोष्टी घडवून आणणे म्हणजे सत्ता होय.

### ३.१.२. सत्तेचे विविध पैलू /प्रकार

**१. पहिला पैलू –निर्णय-क्षमतेच्या माध्यमातून सत्ता:-** प्रख्यात अभासक व विचारवंत स्टीवन ल्युक्स याने सत्तेच्या विविध पैलू संदर्भात आपले विचार मांडले आहेत. राज्याशास्त्राचे प्रख्यात अभ्यासक रॉबर्ट डहाल यांच्या विचारांशी ल्युक्स यांचे विचार खूपच मिळतेजुळते आहेत.डहाल हे जसे सत्ता हि संकल्पना विविध सबंधांच्या परीपेक्ष्यातून पाहतात तसेच ल्युक्स देखील समकालीन सामाजिक व्यवस्थे मध्ये प्रचलित असलेल्या विविध विषयांच्या अनुषंगाने सत्ता ह्या संकल्पनेकडे पाहतात. समाजातील विविध सक्रीयकांच्या (Actors) वर्तनाचा विशेषतः त्यांच्या निर्णय क्षमतेच्या माध्यमातून ल्युक्स सत्तेकडे पाहतात. ह्या प्रसंगी जो सक्रीयक निर्णय क्षमते मध्ये सरस ठरतो व त्याकडे सत्ता असते असे समजावे. एखाद्या विषयाबाबत अनेक पर्यायांमधून कोणता पर्याय निवडायचा ते ठरवणे आणि त्यानुसार कृती करणे उदा.

एखाद्या राजकीय व्यवस्थेमध्ये शासन किंवा राज्य आपल्या लोक्प्रतीनिद्धी द्वारे सर्व प्रकारचे निर्णय घेते, तेव्हा राज्याकडे सत्ता असते असे आपण म्हणतो.

**२. दुसरा पैलू - कार्यसूचीचे समायोजन:** ल्युक्स याने सत्तेच्या दुसऱ्या पैलूबद्दल सांगताना कार्यसुचीच्या संदर्भात विवेचन केले आहे. हा पैलू निर्णय क्षमतेपेक्षा वेगळा आहे. चर्चेला येणाऱ्या विषया संदर्भात आधीच आपल्याला हवे असलेले वातावरण तयार करून काही निर्णायक विषयच चर्चेला येवू द्यायचे नाहीत. निर्णय प्रक्रियेपर्यंत हे विषय येवू न देता त्या विषयांचे आधीच परिमार्जन करून टाकण्याच्या क्षमतेला कार्यसूची समायोजन असे म्हणतात. बाचराच आणि बरात्झ यांनी आपल्या Two Faces of Power ह्या पुस्तकामध्ये बिगर निर्णय क्षमता म्हणजे कार्यसूची समायोजन याच्या माध्यमातून सत्ता कशी वापरता येते याचे विवेचन केले आहे. चर्चेला येणाऱ्या कोणत्याही मुद्द्यावर प्रभाव पडणे हे कार्यसूची समायोजन मध्ये अपेक्षित असते. विशिष्ट मुद्धे चर्चा विश्वाच्या मध्यावर्ती कधीच येवू नये यासाठी सत्तेचा वापर केला जातो. उदा. एखाद्या महत्वपूर्ण बैठकीचे अध्यक्ष बैठक सुरु होण्यापूर्वीच, पटलावरील असे मुद्धे गाळतात ज्याची उत्तरे त्यांना देता येत नसेल. म्हणजेच अत्यंत गंभीर विषयांना या ठिकाणी बगल देण्यात येते. ह्यामुळे अप्रत्यक्षपणे सत्ता वापरली जाते असे ल्युक्स म्हणतो. तौलनिक दृष्ट्या दुसऱ्या पैलूचे स्वरूप जास्त संरक्षित व बाह्या रुपी तो धोरणी आहे कारण सत्तेचे निर्गमन बंदिस्त स्वरुपात होते.

**३. तिसरा पैलू – इतरांच्या मतांचे प्रहस्तन (manipulation):** एक स्पर्धात्मक संकल्पना म्हणून ल्युक्स जेव्हा सत्तेचे विवेचन करतो तेव्हा तो सत्तेचे सर्वात जहाल स्वरूप मांडतो. हे स्वरूप म्हणजे इतर लोकांच्या मानसिकतेवर आपला प्रभाव पडून त्यांच्या विचारांचे, दृष्टीचे व मतांचे प्रहस्तन करणे. इतरांच्या निर्णय क्षमतेचा प्राधान्यक्रम प्रभावित करणे यामध्ये अपेक्षित असते. कार्ल मार्क्स ने विचारप्रणाली संदर्भात जे मांडले आहे त्या विवेचानाशी हा पैलू मिळताजुळता आहे. ह्यामध्ये सत्ताधार्यांचे अभिनत किवा पक्षपाती निर्णय कोणत्याही प्रश्नांशिवाय किवा प्रश्नार्थक विरोधाशिवाय सर्वांनी ऐकले पाहिजे असे अपेक्षित असते. साहजिकच आपल्याला मान्य नसतानाही लोक सत्ता असलेल्यांचे सर्व निर्णय ऐकण्यास तयार होतात. परिणामी यामुळे खोटा आणि भ्रामक आत्मभान निर्माण होवू शकते. भांडवलशाही मध्ये कामगारवर्ग मध्ये असे भ्रामक आत्मभात निर्माण होवू शकते असे ल्युक्स म्हणतो कारण भांडवलदार वर्गाला जे हवे आहे ते खरे आहे व ते जे काही व्यवहार आपल्याबरोबर करत आहे ते योग्यच आहे अशा समजुतीला कामगारवर्गामध्ये मान्यता मिळते. त्यामुळे सत्तेचा हा पैलू त भ्रामक मुखाकृति तयार करण्यात यशस्वी होतो.

### ३.१.३ सत्तेचे विविध स्त्रोत

**१. मालमत्ता व धनसंपत्ती :-** व्यवसाय किंवा व्यक्ती कडे असणाऱ्या रोख रकमेला अथवा रोख रकमेमध्ये रुपांतरीत करता येणाऱ्या मौल्यवान गुंतवणुकीला तसेच उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या भांडवली गोष्टीना संपत्ती असे वाणिज्यिक भाषेत संबोधले जाते. सत्तेचा सर्वात लोकप्रिय व महत्वाचा गुणधर्म किवा स्त्रोत म्हणजे

धनसंपत्ती. कोणत्याही व्यवस्थेत संसाधनं हि मर्यादित स्वरुपाची असतात व ह्या संसाधनांपैकी मालमत्ता सारखे संसाधन हे सर्वात महत्वाचे असते. त्यामुळे मालमत्ता व धनसंपत्ती हा सत्तेचा सर्वात महत्वाचा गुणविशेष (Attribute) मानला जातो. वर्षानुवर्षे धनसंपत्ती सत्तेच्या मुळाशी राहिलेले आहे व सत्तेचा प्रमुख स्त्रोत म्हणुन त्याकडे बघितले जाते. मालमत्तेच्या व धनसंपत्तीच्या उपलब्धतेमुळे व्यक्तीला कोणत्याही गोष्टीचे अभिग्रहण करता येत आल्यामुळे धनसंपत्ती त्या व्यक्तीला सत्तेचे स्तान प्राप्त करून देऊ शकते व इतरजण त्यांना सहज शरण जाऊ शकतात. समकालीन व वर्तमान युगातची संपत्ती हे इतरांवर प्रभाव पाडण्याचे मध्यम म्हणून ओळखले जाते.

**२. वलयांकित व्यक्तिमत्व :-** एखाद्या व्यक्तीची नैतिक क्षमता, शारीरिक नैसार्गीत ठेवण, आणि एकूणच क्षमता म्हणजे व्यक्तिमत्व होय. इतरांचे मन वळवणे किवा त्यांच्यावर प्रभाव पाडणे ह्या हि प्रभावी व्यक्तिमत्वाची खासियत असते. वलयांकित व्यक्तिमत्व म्हणजे असे व्यक्तिमत्व जे काही नैसर्गिक व्यक्ती वैशिस्ट्यांनी संपन्न असते. थोडक्यात सांगायचे झाल्यास व्यक्तीला लाभलेले वलय म्हणजे उत्कृष्ट संप्रेषण आणि परस्पर कौशल्यांचा संगम होय. इतरांना आपल्याकडे आकर्षित करून त्यांची बांधिलकी व निष्ठा मिळवण्याची क्षमता वलयांकित व्यक्तिमत्वावर आधारलेली सत्ता दर्शविते. सत्ताधार्याच्या परस्पारिक व अंतरव्यक्तीत्व (interpersonal) कौशल्यावर सत्तेचे हे स्त्रोत आधारलेले आहे. एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा  विशेष गुणधर्म लोकांना जास्त आकर्षित करतो व त्या गुणधर्माच्या आकर्षणातून आणि त्यातून निर्माण झालेल्या बांधिलकी आणि आदरातून अंतरव्यक्तीत्वा वर आधारलेला प्रभाव निर्माण होईन त्या व्यक्तीला सत्ता प्राप्ती होऊ शकते.

**३. बक्षीस व इनाम** :-  अधिकृत देय, नुकसान भरपाई किंवा देणगी म्हणून (काहीतरी) देण्याची पद्धत म्हणजे बक्षीस. बक्षीस सामान्यत: वैयक्तिक कामगिरीसाठी प्रदान केले जाते. काहीतरी चांगले किवा वाईट केल्याच्या मोबदल्यात बक्षीस दिले जाते. तर पुरस्कार वैयक्तिकरित्या दिलेल्या योगदानाच्या घटकांवर केंद्रित असतो.  बक्षीस व पुरस्कार हे दोन्ही सत्तेचे महत्वाचे स्त्रोत मानले जातात. एखाद व्यक्ती आपले इप्सित ध्येय गाठण्यासाठी इतरांना विविध प्रकारचे आमिष दाखविते उदा. भेटवस्तू देणे, कामात बढती देणे, वेतनात वृद्धी करणे, नवी जबाबदारी सोपवणे, इत्यादी. अशा बक्षिसांमुळे लाभार्थ्यांमध्ये एक प्रकारची अंतर्गत बांधिलकी निर्माण होते व बक्षीस किवा इनाम देणार्याप्रती अपोआप उत्तरदायित्वाची भावना तयार होते.

**४. बलपूर्वक शक्तीचा वापर:-** स्वत्ताच्या इच्छेप्रमाणे इतरांनी वागण्यासाठी कधी कधी सत्ताधारी व्यक्ती किवा विशिष्ट समूह, बळाचा वापर करताना दिसतात. बलाचा प्रयोक हा शारीरिक किवा मानसिक स्वरूपाचा असतो. म्हणजे शारीरिक इजा पोहचवणे किवा मानसिक खच्चीकरण करणे यासारख्या कृती यामध्ये समाविष्ट असतात. सामान्य लोक सत्ताधार्यापुढे संपूर्णपणे शरणागती पत्करतात व त्यांना शरण जातात. स्वताचे स्वातंत्र्य अबाधित राहावे तसेच स्वतःचे अस्तित्व टिकून राहावे म्हणून सत्ताधार्याच्या जुलूमशाहीला अनेक लोक बळी पडतात. बलपूर्वक शक्तीचा वापर आपल्या आज्ञांचे

पालन होण्यासाठी केला जातो. भीती वर आधारित आल्यामुळे सत्तेच्या ह्या स्तोत्राला प्रभावाचे नकारात्मक प्रतिमान असे म्हणतात.

**५. सांस्कृतिक धुरीणत्व (cultural Hegemony) :-** सांस्कृतिक धुरीणत्व याला वैचारिक धुरिणत्व असेही म्हणतात व सत्तेचा हा सर्वात महत्वाचा स्त्रोत मानला जातो. प्रख्यात इटालियन तत्ववेत्ता अंतनिओ ग्राम्शी याने सांस्कृतिक धुरीणत्वाचा सिद्धांत मांडला. विचारप्रणाली किंवा संस्कृतीच्या मदतीने जेव्हा वर्चास्वशील वर्ग आपली सत्ता प्रस्थापित करून ती टिकावीतो तेव्हा त्या सत्ता-प्रभुत्वाला धुरीणत्व असे म्हणतात. त्याच्या मते एखाद वर्ग ज्यावेळी आपले वर्चस्व प्रस्थापित करतो त्यावेळी ते प्रभुत्व बाळाच्या जोरावर प्रस्थापित झालेले नसते, तर त्या मागे वैचारिक, प्रभुत्व असते. हे वैचारिक प्रभुत्व तत्वज्ञान, धर्म, विचारप्रणाली किंवा सांस्कृतिच्या आधारावर प्रस्थापित झालेले असते. धुरीणत्वाची निर्मिती करण्यात विचारप्रणाली बरोबरच विविध वर्गांची मध्ये झालेली आघाडी महत्वाची असते. हि आघाडी वर्गीय सांस्कृतिक व सामाजिक उद्धिष्टासाठी केलेली असते. सांस्कृतिक धुरीणत्वाचे सर्वात महत्वाचे उद्धिष्टय म्हणजे , एकदा वर्चस्व म्हणजे धुरीणत्व प्रस्थापित झाले कि आज्ञा पालनासाठी राज्याला बळाचा वापर करावा लागत नाही. सामान्य लोक स्वःताहून सत्ताधारी वर्गाला वर्चस्व गाजवाण्यासंदर्भात आपली संमती देतात. वैचारिक किंवा सांस्कृतिक धुरीणत्व यासाठी महत्वाचे असते कि एकदा ते प्रस्थापित झाले कि आज्ञापालनासाठी राज्याला बळाचा वापर करावा लागत नाही.

**६. राजकीय पक्ष:** लोकशाही हा शासनाचा सर्वोत्तम प्रकार आहे हे सर्वश्रुत आहे. लोकशाहीच्या मुलभूत स्वरूपाच्या केंद्रस्थानी राजकीय पक्षांचे स्थान असते. सामान्य जनता व शासन यांच्यामधील एक महत्वपूर्ण दुवा म्हणून राजकीय पक्षांकडे बघितले जाते. सार्वत्रिक निवडणुकांनंतर सर्वाद्धिक मते मिळालेला राजकीय पक्ष हा आपली सत्ता स्थापन करतो. सत्ताधारी वर्ग सार्वत्रिक निवडणुकांनंतर मिळालेली सत्ता कशी अधिमान्य आहे व लोकांच्या फायद्याची आहे हे नेहमी सांगत असतो. आधुनिक कालखंडात राजकीय पक्षांकडून तयार झालेल्या सत्तेला आता सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. त्यामुळे सत्तेचा हा सर्वात महत्वाचा व लोकप्रिय स्त्रोत आहे.

## ३.२ अधिसत्ता :-

अधिसत्ता म्हणजे अशी सत्ता जी अधिमान्य स्वरुपाची असते. सत्ता म्हणजे इतरांच्या वर्तनावर प्रभाव पाडण्याची क्षमता व अधिसत्ता म्हणजे इतरांच्या वर्तनावर प्रभाव पडण्याचा अधिकार. अगदी सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास अधिसत्तेचे वर्णन अशा पद्धतीने करता येईल :- **सत्ता + अधिमान्यता =अधिसत्ता**. सत्ताधार्यांनी सत्ता टिकविण्यासाठी कोणत्याही पद्धतीचा वापर केला तरीही त्या सर्व सत्ता आदेशाचे पालन करणे हे आपले उत्तरदायित्व आहे अशा तत्वावर अधिसत्ता हि संकल्पना आधारलेली आहे. प्रख्यात जर्मन तत्ववेत्ता मॅक्स वेबर याने अधिसत्ता ह्या संकल्पनेवर विपुल लेखन केले आहे व ह्या संकल्पनेचा सर्वात महत्वाचा पुरस्कर्ता म्हणून ओळखला जातो.

सर्वसाधारणपणे सामान्य लोक सत्तेला कोणत्या पार्श्वभूमीवर व कोणत्या परिस्थितीत मान्यता देतात या संदर्भाचे विवेचन त्याने केले आहे.

### ३.२.१ अधिसत्तेचा अर्थ व व्याख्या :

जेव्हा सत्ताधारकांच्या आज्ञांचे पालन त्या अज्ञांच्या मुळाशी असलेल्या बलामुळे नाही तर त्या आज्ञा योग्य असून सर्वांना मान्य आहेत ह्या हेतूनी जेव्हा बहुसंख्य लोग वागतात तेव्हा त्या सत्तेचे रुपांतर अधिसत्तेत होते. अधिसत्ता हि संज्ञा इंग्रजी शब्द Authority चे मराठी रुपांतर आहे. इंग्रजी मधील Authority हा शब्द लॅटिन भाषेतील *ऑक्टोरीटास* (***auctōritās)*** ह्या शब्दापासून तयार झाला आहे, ज्याचा अर्थ आहे सल्ला, शोध, किंवा मत (opinion). जनतेच्या मातांना वानिर्णयांना स्वीकृत किंवा अस्वीकृत करणे असा ढोबळ मानाने *ऑक्टोरीटास* मधून आपल्याला अर्थ काढता येतो. ह्या दृष्टीने अधिसत्ता हि संकल्पना विविकाचे मूर्तस्वरूप असून तिच्या अंगी बुद्धीसंगत विस्तार्पूर्ण मांडणी करण्याची क्षमता असणे अभिप्रेत असते. सत्ताधार्काजवळ हि क्षमता असली म्हणजे मग त्याच्या आज्ञांचे आपोआप पालन होते. हे आज्ञा पालन प्रामुख्याने राज्याची सत्ता दर्शविते. पण टी जर नसेल तर तिथे बळाचा वापर करूनच आज्ञापालन मिळविणे भाग पडते. अधिसत्तेची संकल्पना अधिसत्तेच्या दोन दृष्टिकोनाचा अर्थ स्पष्ट केल्यावर अधिक चांगल्या पद्धतीने समजू शकते. हे दृष्टीकोन म्हणजे अधिसत्तेचा मुल्यालक्षी (Normative) दृष्टीकोन व वर्णनात्मक दृष्टीकोन (descriptive ) त्यामुळेच आधीसत्तेचे दोन पद्धतीने अर्थ सांगता येतील.

**अ) अधिसत्तेचा मुल्यलक्षी (Normative) दृष्टीकोन :-** अनेक राजकीय तत्ववेत्यांनी अधिसत्तेच्या मूल्यात्मक किंवा मुल्यलक्षी दृष्टीकोनाची चिकित्सा केली आहे. प्रामुख्याने तत्ववेत्त्यानी ह्या दृष्टिकोनाचा उपयोग आपल्या विवेचनामध्ये केलेला आहे. ह्या दृष्टीकोनाप्रमाणे अधिसत्ता म्हणजे सत्ता गाजविण्याचा हक्क होय. कालांतराने सत्ता गाजविण्याचा हक्क हि एक परंपरा होउन जाते व सत्ताधारी जे असतील त्यांची अधीसत्ता स्वीकार करणे हे आपले नैतिक व मूल्यात्मक उत्तरदायित्व आहे अशी लोकांची भावना होऊन जाते. ह्या पार्श्वभूमीवर राजकीय नेते लोकांवर राज्य करण्याचा आपला हक्क निवडणुकांमधील यशाच्या आधारावर, घटनात्मक नियमांच्या आधारावर किंवा इतर कारणांच्या आधारावर अधिमान्य आहे असा दावा करतात. त्यामुळे नैतिक दृष्ट्या व वैधानिक दृष्ट्या सत्ताधारी आपल्या सत्तेला मिळालेल्या मान्यतेच्या बळावर सत्ता टिकवून ठेवण्याचा दावा करतो.

**अ) अधिसत्तेचा वर्णनात्मक** (descriptive) **दृष्टीकोन :-** राज्यशास्त्रज्ञ (Political scientist) व समाजशास्त्रज्ञ सत्ता ह्या संकल्पनेचा उपयोग प्रामुख्याने वर्णनात्मक पद्धतीने करतात. जर्मन तत्ववेत्ता मॅक्स वेबर याने वर्णनात्मक दृष्टिकोनाचा वापर करून आपले समाजशास्त्रातील विविध निष्कर्ष मांडले. अधिसत्तेच्या न्याय्यपूर्णते संदर्भातील व्यक्तीचा विश्वास संपादन करण्याची क्षमता असलेल्या संकल्पनेला वेबर अधिसत्ता म्हणतो. हा विश्वास कोठून आला व तो समर्थनीय आहे कि नाही हा मुद्दा या ठिकाणी

जास्त महत्वाचा ठरत नाही. त्यामुळे अधिसत्ता हि संकल्पना या वेळी अधिमान्य सत्ता ठरते.

**अधिसत्तेच्या व्याख्या:**

**मिशेल्स:** " अधिसत्ता म्हणजे व्यक्तीची, व संस्थेची किंवा कोणाच्याही अंगभूत अगर बाह्यरित्या संपादित केलेले प्राबल्य, ज्याचा उपयोग इतर गटावर वर्चस्व गाजविण्यासाठी होतो".

**मॅक्स वेबर: "** अधिसत्ता म्हणजे अशी संभवनीयता ज्यामध्ये सर्वांच्या संमतीने दिलेला आदेश एखाद्या गटातील लोक सहज पाळतात".

### ३.२.२. अधिसत्तेचे विविध स्त्रोत / मॅक्स वेबरचे अधिसत्तेसंदार्भातील वर्गीकरण

मॅक्सिमिलियन कार्ल एमिल वेबर हा एक जर्मन समाजशास्त्रज्ञ, तत्वज्ञ, न्यायशास्त्रज्ञ आणि राजकीय अर्थशास्त्रज्ञ होता, ज्याला आज एक महान तत्ववेत्ता म्हणूनही ओळखले जाते. वेबर हा त्याच्या प्रोटेस्टन्ट एथिक्स आणि भांडवलशाही या सिद्धांतासाठी प्रसिद्ध आहे. त्याने अधिसत्ते संदर्भात बुद्धिप्राधान्यवाद व तर्कशुद्ध विवेचन केले आहे व अधिसत्तेचे तर्कसंगत वर्गीकरण केले आहे.

**त्रीस्थरीय वर्गीकरण**

वेबरने अधिसत्तेचे वर्गीकरण तीन प्रकारात केले आहे ते म्हणजे पारंपारिक, दिव्यवलयी व विवेकी-विधीजन्य.

अ) **पारंपारिक अधिसत्ता:-** अधिसात्तेचा हा पहिला प्रकार वेबरने सांगितला आहे . वहिवाटीवर पिढ्यानपिढ्या जेव्हा मान्यता मिळणारी लोकांकडून धार्यालासत्ता विबारच्या अधिसत्तेला होणाऱ्या निर्माण त्यातून तेव्हा असते आधारलेली मानवी आदिम प्राचीन .आहे म्हटले असे अधिसत्ता पारंपारिक वर्गीकरणात संस्कृतीच्या कालखंडातील विविध टोळीप्रमुखांची अधिसत्ता हि अशाच प्रकारची होती. दीर्घकालीन रूढी- परम्पारांवरच्या विश्वासावर हि अधिमान्यता आधारित असते. याठिकाणी निष्ठांचे स्वरूप हे व्यक्तिगत असते. धर्म, पवित्र चाली रिती, अध्यात्मिक संरचना, संस्कृती, इ. घटक सत्ताधाऱ्याप्रती बांधिलकी निर्माण करण्यास महत्वाची भूमिका बजावतात. पारंपारिक अधिसत्तेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

- पुरातन परंपरांना महत्व
- दैनंदिन नित्यकर्माच्या पवित्र्यावर विश्वास.
- पारंपारिक अधिसत्तेचे दोन प्रकार
- असामानतेला चालना

**ब) दिव्यवलयी अधिसत्ता:-** वेबर ने अधिसत्तेसंदर्भात सांगितलेला हा दुसरा प्रकार. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वा भोवती असलेल्या वलयावार ह्या प्रकारची अधिसत्ता आधारित असते. जेव्हा सत्ताधारकाजवळ विशेष दिव्य शक्ती व अलौकिक गुण आहेत शी सर्वसामान्य लोकांची खात्री पटते, तेव्हा लोक सत्ताधाराकाच्या दिव्या गुणांवर म्हणजेच वलयावर विश्वास ठेवून त्याच्या आज्ञांचे पालन करतात, तेव्हा दिव्यवलयी अधिसत्ता अस्तित्वात आली आहे असे समजावे. हि अधिसत्ता अलौकिक मानल्या गेलेल्या सत्ताधारकाची व्यक्तिगत सत्ता असते. "**कोणत्याही व्यक्ती च्या व्यक्तीमत्वातील अपवादात्मक पावित्र्य** (exceptional sanctity), **निर्भयता, पराक्रम, किंवा आदर्श नमुनेदार वर्तन इ. गुणांप्रती असलेली लोकांची एकनिष्ठ भक्ती म्हणजे दिव्यवलयी अधिसत्ता"** असे वेबर सांगतो.

ह्या अधिसत्तेमध्ये सत्ताधारकाकडे कोणतेही निर्णय घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य असते. त्याच्या अधिसत्तेचा गाभा त्याच्या व्यक्तीमत्वामधील वलयात (Charisma) असल्यामुळे, सत्ता वापरताना, सत्ताधारी निरंकुश व अमर्याद पद्धतीने व्यवहार करू शकते. अशा अवस्थेत व्यक्ती स्वत्ता ठरवतील तेवढ्याच मर्यादा त्याच्या अधिसात्तेवर पडतात. पण हेही तितकेच खरे कि अधिसात्तेचा मुलस्त्रोत आणि तिचा अभिकर्ताही तीच व्यक्ती असल्यामुळे, ती व्यक्ती जो पर्यंत यशस्वी होत राहते तोपर्यंत त्याच्या अलौकिक शक्तींवरचा लोकांचा विश्वास टिकून राहू शकतो. पण जर व्यक्ती अपयशी झाली तर मात्र तिची अधिसत्ता कोलमडू शकते, कारण दिव्यवलयी अधिसत्ता फक्त सत्ताधार्याच्या यशावरच अवलंबून असते. दिव्यवलयी अधिसत्तेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

- सर्वसाधारण जनतेची स्वीकृती आणि परम श्रद्धा
- समग्र सत्तेचे सावट तयार करण्यात यश
- एकनिष्ठ समर्पणावर आधारलेली सत्ता

**क) विधीजन्य किंवा विवेकी अधिसत्ता:-** हा अधिसत्तेचा प्रकार सर्वात महत्वाचा प्रकार आहे असे वेबर सांगतो. आधुनिक औद्योगिक समाजामधील संघटन व्यवस्थेच्या पातळीवर सर्वात जास्त ज्या अधिसत्तेला महत्व प्राप्त झाले आहे ती अधिसत्ता म्हणजे विधीजन्य –विवेकी अधिसत्ता. राज्यकर्ते जेव्हा विवेकाला पटणाऱ्या निकषांवर सत्तेवर येतात, तेव्हा त्यांच्या सत्तेला वैधानिक अधिष्ठान प्राप्त होते. ह्यातूनच विधीजन्य- विवेकी सत्ता निर्माण होते. या ठिकाणी व्यक्तिमत्वा पेक्षा, व्यक्ती जे पद ग्रहण करते त्या पदाला जास्त महत्व प्राप्त होते. आज्ञापालन होते ते व्यक्तीच्या वैयक्तिक आज्ञांचे नसून ठराविक कार्यपद्धतीद्वारे मंजूर केलेल्या कायद्यांचे व वेळोवेळी घेण्यात आलेल्या निर्णयांचे. अधिनियमित नियमांच्या, कायदे, किंवा वैधता यावर कमालीचा विश्वास असणाऱ्या भावनेतून ह्या अधिसात्तेचा विकास होतो. या अधिसात्तेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

- नोकरशाहीयुक्त संघटन
- कायद्याच्या अधिराज्याप्रती आदर.
- विवेकी राज्यसंस्था तयार करण्यात महत्वाची भूमिका

## ३.३ अधिमान्यता :-

अधिमान्यता हा शब्द इंग्रजी शब्द legitimacy ह्या शब्दाचे मराठी रुपांतर आहे. इंग्रजीतील legitimacy हा शब्द लॅटिन भाषेतील *लेजीटीमेयर* ह्या शब्दापासून तयार झाला आहे ज्याचा अर्थ आहे 'कायदेशीर म्हणून घोषित करणे'. व्यापक अर्थाने अधिमान्यता म्हणजे रास्तपणा, न्य्यायपणा किंवा कायदेशीरपणा, व हा रास्तपणा किंवा हा कायदेशीरपणा सत्तेचे परिवर्तन अधिसत्तेमध्ये करतो. थोडक्यात सत्तेचे अधिसत्तेत परिवर्तन होण्यासाठी अधिमान्यता आवश्यक असते. अधिमान्यतेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. शासनाच्या संरचना, कार्यपद्धती, कृती, धोरणे,निर्णय, अधिकारी, वा पुढारी यांच्या ठिकाणी अचूकपणा, औचित्य, नैतिक चांगुलपणा हे गुण आहेत, आणि त्यामुळे आपण त्याचां स्वीकार केला पाहिजे असा जो विश्वास लोकांना वाटतो त्यालाच आपण अधिमान्यता असे म्हणतो, अशी व्याख्या प्रख्यात अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ रॉबर्ट दहाल याने केली आहे.

### ३.३.१ अधिमान्यतेची काही महत्वाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील:-

**अ) आत्मनिष्ठ व मुल्यलक्षी गर्भितार्थ** (connotation):- व्यापक पद्धतीने विचार करता असे दिसते कि अधिमान्यता हि संकल्पना आत्मनिष्ठ व मुल्यलक्षी स्वरुपाची आहे. अधिमान्यता व्यक्ती व्यक्ती मधील राज्यकर्त्यांच्या याथोचीक न्यायपूर्ण वैधतेसंदर्भातील प्रामाणिक आस्था आहे. अशी श्रद्धा आहे नागरिकांच्या आपल्या राज्यकर्त्यांच्या अधिमान्यते संदर्भात भावनांच्या स्थूल सामाजिक परिणामान संदर्भात वेबर याने अधिमान्यतेच्या आत्मनिष्ठ दृष्टीकोनाची चर्चा केली आहे.

**ब) अधिसत्तेचे समर्थन:-** मागे उल्लेख केल्याप्रमाणे, अधिमान्यता हि सत्तेचे परिवर्तन अधिसत्तेमध्ये करते. राजकीय अधिमान्यता ह्या संकल्पनेकडे नेहमी अधिसत्तेचे समर्थन करणारी संकल्पना म्हणून बगीतले जाते. अधिसत्तेचे समर्थन करताना अधिमान्यता नेहमी वास्तविक अधिसत्ता व अधिमान्य अधिसत्ता यांतील फरक स्पष्ट करते. प्रख्यात तत्ववेत्ता जॉन लॉक याने अधिमाण्यातेचे विवेचन याच माध्यमातून केले आहे.

**क) राजकीय अबंधनाशी तर्कसंगत :-** ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता, अधिमान्यता हि संकल्पना राजकीय आबंधान ह्या संज्ञेशी साधर्म्य साधते किंबहुना ती राजकीय अबंधानाशी तर्कसंगत आहे असे आपल्याला सांगावे लागेल. प्रख्यात तत्ववेत्ता लॉक याला असे वाटते कि प्रत्येक व्यक्ती, सार्वभौम सत्ता अस्तित्वात येण्यासाठी आपली सहमती देतो व स्वेच्छापूर्वक स्वःता, बहुसंख्याकांनी घेतलेल्या निर्णयाला उत्तरदायी होतो.

### ३.३.२ अधिमान्यतेचे विविध स्त्रोत

**अ) सहमती:-** सतराव्या शतकादरम्यान अधिमान्यता ह्या संकल्पनेचे सर्वात महत्वाचा स्त्रोत म्हणून सहमती हि संज्ञा उदयाला आली. ह्यूगो ग्रूटियस, हॉब्ज आणि सॅम्युअल पुफेनडोर्फ यांच्यासारख्या तत्ववेत्यांनी त्यांच्या विवेचनामध्ये संहमती ही अधिमान्यतेचे

सर्वात महत्वाचे स्त्रोत असल्याचे मत मांडले आहे. सहमतीवर आधारित अधिमान्यतेचा तात्विक आधार तीन मार्गांनी आपल्याला समजू शकतो. i) राजकीय अधिसत्तेला सर्वसामान्य जनतेवर आपली अधिमान्य सत्ता प्रस्थापित करण्यासाठी सर्व नागरिकांची किंवा रहिवाशांची संमती घेणे आवश्यक आहे. ii) वैध अधिसत्तेचे वैशिष्ट्ये असे आहे की ज्यांचे दमन केले गेले आहे किंवा ज्यांच्यावर सत्ता प्रस्थापित केली आहे त्या जनतेला सुरक्षित जीवन जगण्यासाठी आपली संमती देण्याचे नेहमी बंधन असते. iii) संमती म्हणजे अधिमान्यतेसाठी थेट वातावरण तयार करने नाही, तर अधिसत्तेच्या वैधतेसाठीचे वातावरण तयार करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची सहमती अत्यंत आवश्यक असते.

**ब) लाभकारी परिणाम:-** लाभकारी परिणाम म्हणजे एखाद्या गोष्टीची उपयुक्तता त्याच्या निष्कर्ष किंवा त्याच्या परिणामावर अवलंबून असते. मुल्यलक्षी राजकीय सिद्धांताच्या विविध स्तरांची समीक्षा करताना ह्या सिद्धांताचा सर्वसाधारण वापर करण्यात येतो. ह्या सिद्धांताचे सर्वात उल्लेखानिय उदाहरण म्हणजे, राज्यकर्त्याला, राज्या करण्याचा नैतिक अधिकार आहे का. ह्या सिद्धांताचा जास्तीत जास्त पुरस्कार उपयुक्ततावाद्यानी केला आहे. उपयुक्ततावादी विचार प्रवाहाने असे सांगितले आहे कि अधिमान्य राजकीय अधिसत्तेचा पाया हा उपयुक्ततेच्या तत्वावर आधारलेला आहे. अधिमान्यातेचा हा स्त्रोत मूल्य लक्षी स्वरूपाचा आहे.

**क) सार्वजनिक विवेक:-** सार्वजनिक विवेक हे स्त्रोत सहमती व उपायुक्ततावादी तत्त्वांपेक्षा वेगळे आहे. आपली राजकीय तत्वे हि न्याय्य व सर्वस्वीकृत असली पाहिजे ह्या तत्वावर हे स्त्रोत आधारलेले आहे. हॉब्स, कांट, व रुसो या तत्ववेत्त्यानी ह्या सिद्धांताचे सविस्तरपणे विश्लेषण केले आहे. राजकीय अधिमान्यातेच्या विविध आधारांचे विश्लेषण करताना समकालीन राजकीय विचारवंत जॉन रॉल्स व युर्गेन हाबर्मास यांनी सार्वजनिक विवेक ह्या तत्वाचा वापर आपले विचार मांडताना केला आहे.

**प्रश्न**

१. सत्ता संकल्पनेचा अर्थ सांगा व तिचे प्रकार विषाद कर

२. सत्तेचे विविध स्त्रोत कोणते आहे ?

३. आधीसत्ता म्हणजे काय? आधीसत्तेचे विविध प्रकार स्पष्ट करा.

४. अधिमान्यता म्हणजे काय? आधीमान्यतेची वैशिष्ट्ये सविस्तरपणे लिहा

❖❖❖❖

# ४

# संकल्पना :- कायदा आणि राजकीय आबंधन
# (Concept of Law and Political obligation)

**घटक रचना**

४.१ प्रस्तावना
४.२ कायद्याची वैशिष्ट्ये
४.३ कायद्याची उत्पत्तीस्थाने
४.४ राजकीय आबंधन
४.५ प्रतिकाराचा हक्क
४.६ निष्कर्ष
४.७ सारांश

- **कायदा (Law)** – अर्थ, स्वरूप, वैशिष्ट्ये, उगमस्थाने, प्रकार, महत्व
- **राजकीय आबंधन (Political Obligation)** – अर्थ, स्वरूप, आबंधनाचे प्रकार
- **प्रतिकाराचा अधिकार (Right to resist)** – जॉन लॉक, टी. एच. ग्रीन, हेरॉल्ड लास्की व उदारमतवादी आणि आदर्शवादी विचारवंतांनी केलेलं समर्थन
  प्रतिकाराची साधने किंवा मार्ग (Forms and Resistance)
  राजकीय प्रतिकाराचे गांधीवादी तंत्र (Gandhian Techniques of Resistance to Authority)

## ४.१ प्रस्तावना :-

मनुष्याच्या वर्तणूकीसंबंधी काही सर्वमान्य नियम आहेत. म्हणूनच मनुष्य इतरांशी समंजसपणे वागतो. ॲरिस्टॉटलच्या मते, न्याय व कायद्याशिवाय वागणारी व्यक्ती निकृष्ट दर्जाचा प्राणी होय. कोणताही समाज नियामाशिवाय आपले कार्य करू शकत नाही. हे नियम कधी आपोआप तयार झालेले असतात तर कधी हेतुपुरस्सर निर्माण केलेलं असतात. नियामाशिवाय राज्यकारभार म्हणजे अराजकता होय. कायद्याशिवाय मनुष्याचे जीवन पशुवत होईल. म्हणूनच हॉब्बस म्हणतो प्रत्येक राज्याला आपल्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करायची असते. नियमांशिवाय राज्यकारभार चालूच शकत नाही. कायद्यामुळे मनुष्याची बाह्य वर्तणूक नियमित होते आणि समाजविघातक कृत्यांना आळा बसतो. कायद्यामुळेच समाजातील

प्रत्येक व्यक्तीला कोणाचीही भीती न बाळगता आपला विकास करता येतो. कायद्यामुळेच मनुष्याची सर्व क्षेत्रात प्रगती झाली व आजही होत आहे.

**कायदा म्हणजे काय ?**

कायदा ही संज्ञा म्हणजे इंग्रजी मधील लॉ ह्या शब्दाचे मराठी रूपांतर होय. इंग्रजी मधील Law हा शब्द ट्यूटोनीक शब्द आहे व तो Lag पासून तयार झाला आहे Lag चा अर्थ सर्वमान्य 'Which is Fixed' असा होतो. इंग्रजीमध्ये याचा अर्थ सर्वांना सारख असणारा 'Which is Uniform' असा होतो. अनेक विचारवंतांनी कायदा ह्या संज्ञेच्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्याची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.

१) **मॅकआयव्हर -** ' कायदा म्हणजे प्रत्येक क्षेत्रात चालणारी राज्याची सत्ता होय.'

२) **डॉ. आशीर्वादन** – 'कायदा म्हणजे राज्यातील नागरिकांच्या वर्तणूकीसंबंधी नियम होय, कायद्याला विरोध करणाऱ्याला शिक्षा होते. अशी शिक्षा राज्यातील शक्तीच्या द्वारे आमलात आणली जाते.'

३) **जॉन ऑस्टीन-**'राज्याच्या सर्वभौमाने (सर्वोच्च अशा निश्चित मानवाने) आपल्यापेक्षा कनिष्ठ व्यक्तींना दिलेली आज्ञा म्हणजे कायदा होय.'

४) **एचा. इ.हौलांरू** - 'मानवाची बाह्य वर्तणूक ठरविणारे सर्वसामान्य नियम जे सार्वभौम सत्ता आमलात आणते त्या नियमांना कायदा म्हणतात.

५) **ऑक्सफोर्ड इंग्लिश डिक्शनरी-** 'सत्तेने लादलेले वर्तनाचे नियम म्हणजे कायदा होय.'

६) **जॉन सालमंड-**'न्यायाच्या स्थापनेसाठी राज्याने केलेल्या आणि अमलात आणलेल्या नियमांचा संच म्हणजे कायदा होय.'

७) **प्रे. वुड्रो विलसन-**'शासनाकडून समान नियमांच्या स्वरुपात ज्यांना स्पष्ट व औपचारिक मान्यता मिळते आणि ज्यांना दंडशक्तीचा आधार असतो असे समाजात प्रस्थापित झालेले आधार, विचार व सवयी म्हणजे कायदा होय.'

वरील व्याख्यांवरून आपल्याला कायद्याची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील .

## ४.२ कायद्याची वैशिष्ट्ये :-

१) **कायद्यातून राज्याची इच्छा व्यक्त होते (Law is the Expression of the will of the state)** – प्रत्येक राज्याला आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करावयाची असते. त्यासाठी राज्यांना नियम करावे लागतात. त्या नियमांनाच कायदा म्हणतात. त्या कायद्यातून राज्याची इच्छा व्यक्त होते.

२) **कायदेमंडळाद्वारे कायदा केला जातो (Enforced by the state)** – राज्य सर्वोच्च संस्था आहे.राज्याच्या वतीने कायदे करण्याचे काम शासनसंस्था करीत असते. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या शासनाच्या तीन शाखा असून यापैकी कायदेमंडळ ही शाखा कायदे करण्याचे कार्य करीत असते.

३) **कायदा लोकांचे बाह्यवर्तन आणि कृती यावर नियंत्रण ठेवते (Concerned only with the external behavior)** - लोकांच्या भावना, विचार, मतं इत्यादींवर कायदा नियंत्रण ठेऊ शकत नाही, तर लोकांचे बाह्यवर्तन आणि कृती यावर कायदा नियंत्रण ठेवतो. उदा. लिंगभेद करू नये, स्त्रियांना समाजात समान वागणूक द्यावी, समाजातील लोकांनी काय करावे, कसे करावे, कसे वागावे यावर कायदा नियंत्रण ठेऊ शकतो.

४) **कायदा सर्वांना समान लागू होतो (Law is equal for all)** – कायदा सर्व लोकांना सारखाच लागू होतो. कायद्यासमोर सर्वांना समान वागणूक व संधी मिळते. कायद्याचे सर्वांना समान संरक्षण मिळते, कायद्यापुढे भेदभाव नाही. कायदा सर्वांना सारखा लागू होणारा असतो.

५) **कायद्याच्या मागे दंडशक्ती असते (Violation of Law invites Punishments)-** कायद्याचा भंग केल्यास राज्याकडून शिक्षा मिळते, दंड होतो, कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यामध्ये पोलीस व्यवस्था असते. कायदेभंग करणाऱ्यास पोलीस योग्य ती कारवाई करून दंड देतात. म्हणजेच कायद्याच्या मागे दंडशक्ती असते.

६) **लोकांचे कल्याण हे कायद्याचे उद्दिष्ट असते (Purpose of law is welfare of people)** – समाजात शांतता आणि सुव्यवस्था स्थापन करणे हे राज्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. राज्य कायद्याद्वारे लोकहित, लोकांचे कल्याण, लोकांना सुरक्षा, शांतता, स्वतंत्र, समता, न्याय मिळवून देण्याचे कार्य करीत असते.

७) **कायद्याचे पालन करणे सक्तीचे असते** – राज्याच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व संस्था, संघटना आणि नागरिकांना कायद्याचे पालन करावे लागते. प्रत्येकाला राज्याचा कायदा माहित असावा लागतो. कायदेभंग करणाऱ्यास शिक्षा होते. कायदा पाळणे ऐच्छिक नसून सक्तीचे आहे.

८) **कायदा लिखित स्वरूपाचा असतो (Laws are preciously written down)** – कायदा निश्चित व लिखित स्वरूपाचा असतो. लिखित व स्पष्ट स्वरूपाच्या कायद्याद्वारेच समाजात न्याय प्रस्थापित केला जातो. अलिखित कायदा म्हणजे रूढी, प्रथा, संकेत होय.

९) विधीनियमांचे पालन करावे आणि त्याबाबत व्यक्तीला स्वातंत्र्य असते पण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला कायद्यात सांगितलेली शिक्षा भोगावी लागते.

१०) कायदा निर्मितीचा उद्देश सूडबुद्धी नसावा. व्यक्तीला सदाचारी बनविणे आणि सामाजिक हिताचे संवर्धन करणे हाच कायद्याचा उद्देश असला पाहिजे.

११) कायद्याची अमलबजावणीशासकीय यंत्रणेकडून होते. कायद्याची तर्कशुद्धता व कायद्याचा अन्वयार्थ स्वतंत्र न्यायमंडळाकडून लावला जातो.

१२) कायद्यात सूत्रबद्धता असली पाहिजे. एकाच राज्यात परस्पर विरोधी कायदे असतील तर त्यांचा काहीच उपयोग होणार नाही. उलट त्यामुळे गोंधळ माजेल.

१३) कायदा वर्तमानकाळ व भविष्यकाळाशी संबंधित असतो. भूतकाळात घडलेल्या वर्तनाशी कायद्याचा संबंध नसतो.

## ४.३ कायद्याची उत्पत्तीस्थाने (Sources of Law)

ज्याप्रमाणे वर्तमान काळातील राज्यसंस्था ही तिच्या विकसनशील प्रवृत्तीचे द्योतक आहे. त्याप्रमाणे वर्तमान कायदा ह विकसित प्रवृत्तीचाच परिणाम आहे. ऐतिहासिक कालखंडामध्ये कायद्याच्या व्यवस्थेत बदल झाले. कायद्याच्या निर्मितीसाठी कायदा तयार करणारी मंडळीही जरी अधिकृत साधन म्हणून कारणीभूत ठरत असली तरीही रूढी, प्रथा,संकेत, धर्म, नीतीनियम, न्यायालयीन निर्णय ही कायद्याची उत्पत्तीसाधने अनधिकृत असली तरी त्यांची उपेक्षा करणे योग्य ठरत नाही. त्या अनधिकृत व अधिकृत साधनांचा विचार पुढीलप्रमाणे केला आहे.

**<u>कायद्याची उत्पत्ती साधने :</u>**

**१) सामाजिक चालीरीती, रूढी, प्रथा वगैरे (Custom and usages)** :

सामाजिक चालीरीती, प्रथा हे कायद्याच्या निर्मितीचे प्राचीन आणि पहिले उगमस्थान आहे. एकच गोष्ट व्यक्तीने वारंवार करणे, इतरांनी त्या गोष्टीचे अनुकरण करणे ह्यामुळे चालीरीती, रूढी आणि प्रथा निर्माण होतात. ह्या चालीरीतीची निर्मिती सामाजिक जीवनाच्या गरजेनुसार तसेच न्यायनितीच्या कल्पनेनुसार झाली.

ह्या सामाजिक चालीरीती अस्तित्वात येण्यापूर्वी समाजाचे सर्व व्यवहार, रूढी, प्रथा, संकेत ह्यांना अनुसरून होत असत. अशा रूढी, प्रथा, संकेत हे लौकिक अर्थाने समाजजीवनाचे अतिरिक्त विधीनियमच होते. अशा रूढी, प्रथा, संकेतांना त्यांच्या सामाजिक उपयोगीतेमुळे राज्याची मान्यता मिळते, म्हणजेच त्यांचे कायद्यात रुपांतर होते. उदा. चोरी करू नये ह्या सामाजिक कृतीला राज्याची मान्यता मिळताच चोरी करू नये असा कायदा निर्माण झाला. राज्य प्रत्येक रूढी, प्रथा आणि संकेतांना मान्यता देते असे नाही. ज्या चालीरीती बदलत्या काळानुसार समाजाला आवश्यक नाहीत, त्या आपोआपच नष्ट होतात. समाजप्रिय रुढींचे कायद्यात रुपांतर झाल्याची अनेक उदाहरणे आहेत, त्यामध्ये बॅबिलोनियातील हमराबी कोर्ट, ग्रीसमधील ड्राको व सोलन कोड, रोम मधील लॉज ऑफ दि ट्वेल्व्ह टेम्पल, भारतातील मनू आणि याज्ञवल्यय स्मृती, इंग्लंडमधील सामान्य कायदे, भारतातील विवाह, वारसाहक्क कायदा इत्यादी.

प्रा. मॅकआयव्हर असे म्हणतात की, समाजातील प्रत्येक रुढींचे कायद्यात रुपांतर होते असे म्हणणे योग्य नाही. बदलत्या परिस्थितीनुसार त्याज्य ठरणाऱ्या रूढींना शासन मान्यता देत नाही. उदा. लॉर्ड बेंटिंगने भारतात कायद्याद्वारे सतीची पद्धत बंद केली. भारताच्या संविधानाने अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला.

**२) धर्म (Religion) –**

धर्मातील अस्पृश्यता हे विधीनियमांचे  आणखी एक जुने उगमस्थान आहे. प्राचीन काळी राज्यसत्तेला कायद्याचा जन्मदाता ईश्वर आहे असे लोक मानीत होते. ईश्वराची ओळख  धर्माद्वारे होई. धर्मगुरूंनी केलेली आज्ञा म्हणजे 'ईश्वरी कायदा' असे लोक  समजत असत. प्राचीन काळी व्यक्तीच्या जीवनात धर्माला फार महत्वाचे स्थान होते. धार्मिक नियम, रूढी, विधीनियम, ईश्वरी नियम ह्या गोष्टीना एकच आदेश असे मानण्यात येत होते. धर्मबाह्य वर्तन करणारी व्यक्ती समाजद्रोही व राज्यद्रोही ठरत असे. न्यायदानाचे कार्य धर्मगुरूंच्या सल्ल्यानुसार होत असे. धर्मामध्ये राज्यव्यवस्थेसंबंधीचे सिद्धांत अंतर्भूत करण्यात आले होते.

धार्मिक नियमांचे सामाजिक व राजकीय महत्व लक्षात घेऊनच त्यांना कायद्याचे रूप देण्यात आल्याची अनेक उदाहरणे आपणांस सांगता येतील. त्यामध्ये प्राचीन हिंदू कायदे, 'मनुस्मृती', मुस्लीम कायदे 'शरीयत ' या ग्रंथावर आधारित आहेत. हिंदू कोड बिल हे दायभाग ग्रंथावर आधारित आहे. चोरी, खून इ. गोष्टी अधार्मिक असल्यामुळे बेकायदेशीर ठरविण्यात आल्या.

**३) न्यायपंडितांची चर्चा (Judicial Discussion) –**

न्यायाधीश समाजातील प्रचलित विधीनियमासंबंधीच्या मूल्यतत्वांची उपयुक्त अशी चर्चा करताना, कायद्याचा अर्थ लावताना, विशिष्ट परिस्थितीचा अभ्यास करतात. कायद्याला अधिक स्पष्ट व तर्कशुद्ध स्वरूप प्राप्त करून देतात. न्यायाधीशांच्या तर्कशुद्ध आणि सांगोपांग चर्चेमुळे कायद्यातील संदिग्धता व उणिवा नष्ट होतात. त्यामुळे विधीनियमांना नवीन स्वरूप मिळते तर कधी जुन्या विधीनियमात दुरुस्ती होते. वकील व न्यायाधीशांसाठी न्यायपंडिताची चर्चा व त्यांची मते, अतिशय उपयुक्त ठरतात. उदा. इंग्लंडमधील क्लोक, बेंथम ब्लॅकस्टोन ह्या कायदेपंडितांनी लिहिलेल्या ग्रंथात वैधानिक तत्त्वे व सिद्धांत आढळतात. अमेरिकेत केंद्र आणि स्टोरी ह्या कायदेपंडीतांच्या भाष्यामुळे तर भारतात वारसा हक्काचा कायदा विज्ञानेश्वर व जीमूत वाहनाने लिहिलेल्या ग्रंथामुळे आणि मुस्लीम कायदा फतवा आलमगिरीह्या ग्रंथामुळे प्रभावित झाली.

**४) न्यायालयीन निर्णय (Judicial Decision) –**

प्राचीन काळी व्यक्ती-व्यक्तीमधील संघर्षाचा निर्णय समाजातील अनुभवी व ज्ञानी व्यक्ती देत असत. त्या व्यक्तींनी दिलेला निर्णय सामान्य बुद्धीवर आधारित असे. असा निर्णय देताना प्रचलित रूढी, प्रथा आणि संकेत त्यानुसार प्रस्थापित झालेले नियम त्यावेळी विवेकबुद्धीनुसार निर्णय दिले.

आजही प्रस्थापित नियमांनुसार न्यायाधीश न्यायदानाचे कार्य करतात. बऱ्याच वेळेस जुन्या चालीरीती, रूढी व विधीनियम एखाद्या प्रश्नांचा निकाल लावण्यास असमर्थ ठरतात. अशावेळेस न्यायाधीश तात्विक विचार करून व्यवहार बुद्धीचे निर्णय देतात. भविष्यकाळात अशाच तर्हेच्या प्रश्नांचा निकाल लावताना असा निर्णय प्रमाणभूत मानण्यात येतो. उदा. अमेरिकेचे सरन्यायाधीश हक असे म्हणतात की ''आम्ही संविधान बंधनात आहोत. पण संविधान नऊपैकी पाच न्यायाधीशांनी दिलेला निर्णय होय.

**५) न्यायबुद्धी (Equity) –**

न्यायबुद्धीचा अर्थ असा होतो की, न्यायाची समानता व शुद्धता राखण्यासाठी जुन्या कायद्यामध्ये स्वतः सदसद्विवेकबुद्धीनुसार न्यायाधीशांनी केलेले बदल होतात.

प्रचलित कायद्यानुसार न्यायाधीश न्याय देतात.पण प्रत्येक कायदा परिपूर्ण व परिपक्व असतोच असे नाही. अशावेळी सारासार विवेकबुद्धी आणि प्रस्थापित न्याय्तात्वानुसार न्यायाधीश न्याय देतात. ह्या निर्णयातून पुढे कायदे आकारास येतात. न्यायाधीशांनी कायद्यातील उणिवा, दोष, ताठरता परिस्थिती नुसार नष्ट केलेली असते म्हणूनच कायदेमंडळ या निर्णयांना मान्यता देऊनच कायद्यात रुपांतर करते. इंग्लंडमध्ये चान्सेरी कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार काही कायद्यांची निर्मिती झाली आहे.

**६) विधिमंडळ –**

आधुनिक काळात विधिमंडळ हेच कायद्याचे मुख्य व अधिकृत उगमस्थान आहे. विधिमंडळात लोकांचे प्रतिनिधी नसतात. असे प्रतिनिधी समाजाच्या गरजा जनतेच्या गरजा आशा आकांक्षा व हितसंबंधाचे रक्षण करतात. त्यानुसार कायदेमंडळात ते विधेयके मांडतात. त्यांना कायदेमंडळाची मान्यता मिळाली पाहिजे, ह्या विधेयकांचे कायद्यात रुपांतर होते. कायदेमंडळाने केलेला कायदा म्हणजे अप्रत्यक्षपणे जनतेला कायदा होय.


कायदेमंडळाने केलेल्या कायद्यात निश्चितता असते. कायदेमंडळात घटनेशी कटिबद्ध राहून स्वत:च्या अधिकार क्षेत्रात कायदे निर्माण करते. अशा कायद्यांना विरोध कमी असतो. कायदेमंडळ नवीन कायदे निर्माण करते, त्या जुन्या कायद्यात परिवर्तन करते किंवा पूर्णपणे रद्द करू शकते.

वरीलप्रमाणे कायद्याची उगमस्थाने अनेक आहेत. कायदेमंडळ कायदे करताना कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेद्वारे कायदा प्राप्त करीत असते. त्या कायद्याचे स्वरूप वरीलप्रमाणे असते. केलेल्या विविध धात्कांतून ठरत असते. त्यामुळेच या सर्व घटकांना कायद्याची उगमस्थाने म्हटले जाते.

**<u>कायद्याचे प्रकार (Classification of Law) –</u>**

कायद्याची उगमस्थाने, स्वरूप, उपयोग आणि कार्य या आधारावर कायद्याचे विविध प्रकारात विभाजन करण्यात येते. ॲरिस्टॉटल, जॉन लॉक आणि थॉमस हॉब्ज, या विचारवंतांनी नैसर्गिक कायदा व त्याचे त्यामधील कार्य आणि उल्लेख केला आहे. नैसर्गिक कायदा निसर्गत:च निर्माण होतो. तो राज्याच्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ असतो. या

प्रकरणात राजकीय कायद्याचा आपण अभ्यास करणार आहोत. राजकीय कायदा राज्यांर्गत असतो. राजकीय कायद्याचे मुख्यत: राष्ट्रीय कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायदा असे दोन प्रकारात विभाजन करता येते . ते विभाजन पुढीलप्रमाणे आहे.




**राष्ट्रीय कायदा (National Law) –**

राज्यांतर्गत असणाऱ्या सर्व व्यक्ती, संस्था, विविध समुदाय ह्यांच्यावर चालणाऱ्या व तेथील सार्वभौम सत्तेने निर्माण केलेल्या कायद्यास राष्ट्रीय कायदा असे म्हणतात. ह्या कायद्याचे अंमल राज्याने व्यापलेल्या भौगोलिक क्षेत्रापुरताच मर्यादित असते. राष्ट्रीय कायद्याला दंडशक्तीचा आधार असतो. या कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षा होते. ह्या राष्ट्रीय कायद्याचा अंमल परकीय राजदूत, परकीय दुतवास व परकीय कर्मचारी ह्यांच्यावर राहू शकत नाही. राष्ट्रीय कायद्याचे सवैधानिक व साधारण कायदा असे दोन उपप्रकार पडतात.

**संविधानिक किंवा घटनात्मक कायदा** (Constitutional Law) –

ज्या कायद्याने राज्यसंस्थेचे स्वरूप, राज्याचे विविध विभाग, त्यांची रचना, अधिकार व कार्ये, त्यांचे परस्पर संबंध, नागरिकांचे मुलभूत अधिकार इ. निश्चित केले

जातात, त्यांना घटनात्मक किंवा संवैधानिक कायदा असे म्हणतात. घटनात्मक कायद्याद्वारे राज्यघटनेसंबंधीचे निश्चित नियम सांगण्यात येतात. त्या घटनात्मक कायद्यामध्ये शासनाचा मुलभूत तत्वांचा समावेश केलेला असतो.

असा घटनात्मक कायदा लिखित किंवा अलिखित स्वरूपाचा असतो. अलीकडे घटनात्मक कायदा निश्चित स्वरूपाचा असावा, यावरच बहुतांश भर आहे. घटनात्मक कायदे विशेष प्रक्रियेद्वारे दुरुस्त करण्यात येतात. उदा. भारत, अमेरिका, इंग्लंडमध्ये मात्र घटनात्मक कायदा व सामान्य कायदा असा भेद केलेला नाही.

**सर्व साधारण कायदा (Ordinary Law) –**

ज्या कायद्याचा संबंध घटनेशी नसतो व ज्या कायद्याद्वारे नागरिकांचे परस्पर संबंध तसेच नागरिक व सरकार ह्यांचे संबंध स्पष्ट केलेले असतात, त्यांना सर्व साधारण कायदे असे म्हणतात. सर्वसाधारण किंवा सामान्य कायद्याचे सार्वजनिक व व्यक्तिगत असे दोन प्रकार पडतात.

**सार्वजनिक कायदा (Private Law)** – व्यक्ती व व्यक्ती आणि व्यक्ती व राज्य यातील संबंध निश्चित करण्याचा कायद्याला सार्वजनिक कायदा असे म्हणतात.

**व्यक्तिगत कायदा (Private Law)** – ज्या कायद्याद्वारे व्यक्तीतील संबंधाचे नियमन होते, त्याला व्यक्तिगत किंवा खाजगी कायदा असे म्हणतात.

उदा. विवाह, घटस्फोट यासंबंधीचे कायदे.

**प्रशासकीय कायदा (Administrative Law)** – ज्या नियमांद्वारे विधिमंडळ व न्यायमंडळ यांना वगळून शासनयंत्रणेचे संघटन, कार्यपद्धती, अशा आणि कर्तव्य स्पष्ट केली जातात. ह्यांना प्रशासकीय कायदा म्हणतात.

अलीकडे राज्यांनी कार्ये वाढवली आहेत. राज्याची कार्ये प्रशासकीय नोकरवर्गाकडून केली जातात, त्यांना ही कार्ये पार पाडण्यासाठी काही प्रमाणात सत्ता प्राप्त होते. नोकरवर्गाने स्वतःच्या लहरीप्रमाणे कार्य केले तर नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात येईल. तसे होऊ नये म्हणून प्रशासकीय कायदा अस्तित्वात आला. प्रशासकीय कायद्यांमुळे सरकारी अधिकारी व सामान्य नागरिक यांचे संबंध आणि परस्पर जबाबदारी निश्चित करण्यात येते.

फ्रान्समध्ये प्रशासकीय न्यायनिवाडा करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय न्यायालये आहेत.

**सर्वसामान्य कायदे (General Law) –**

देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राज्यसंस्थेचे प्रमुख कार्य आहे. त्यासाठी सार्वजनिक हित आणि कल्याण लक्षात घेऊन राज्याने तयार केलेल्या विधीनियमांना सामान्य कायदे असे म्हणतात. प्रशासकीय कायदे सामान्य कायद्यात समाविष्ट होतात. सर्वसामान्य कायदा तेथील कायदेमंडळामार्फत तयार होतो. असा

कायदा लिखित स्वरूपाचा असतो. हा  कायदा घटनात्मक कायद्यापेक्षा श्रेष्ठ असतो. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा होते.

सामान्य कायद्याचे अध्यादेश, दिवाणी व फौजदारी असे भाग पडतात.
**अध्यादेश (Ordinary)  -** आधुनिक राज्यामध्ये कायदा तयार करण्याचे कार्य कायदेमंडळाचे आहे. परंतु कायदेमंडळाचे अधिवेशन नेहमीच भरत नाही. कायदेमंडळाच्या विश्रांतीकाळामध्ये उद्भवलेल्या आकस्मित परिस्थितीत तोंड देण्यासाठी राज्याला सर्वोच्च शासनाला हुकुम काढण्याचा अधिकार असतो. त्या वरहुकुमाची वा अध्यादेशाची अमलबजावणी कायद्याप्रमाणेच होते. असे वरहुकुम विशिष्ट काळापुरतेच काढलेले असतात. कायदेमंडळाला अधिवेशनात संमत्ती मिळत असते. कायदेमंडळाची संमत्ती मिळाल्यानंतर त्याचे रुपांतर कायद्यात रुपांतर होते. अन्यथा तो वरहुकुम रद्द होतो.

**दिवाणी कायदा  (Civil Law) –** नागरिकांच्या मालमत्तेसंबंधी व नागरिकांच्या हक्कसंबंधीचे नियमन करणाऱ्या कायद्याला दिवाणी कायदा असे म्हणतात. त्याची अमलबजावणी राज्याद्वारे दंडशक्तीच्या आधारावरच करण्यात येते.

**फौजदारी कायदा (Criminal Law)** – राज्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी व राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी तयार केलेल्या कायद्याला फौजदारी कायदा असे म्हणतात. त्याची अमलबजावणी दंडशक्तीच्या आधारेच करण्यात येते.

याशिवाय राज्याच्या कायद्याचे इतरही काही प्रकार पडतात, ते पुढीलप्रमाणे –
**१) सैनिकी कायदा  (Martial Law) –** राज्यातील सैन्य प्रमुखाने सैन्यात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी केलेला कायदा म्हणजे सैनिकी कायदा होय. राज्यात अशांतता निर्माण झाली तर या कायद्याचा उपयोग होतो. त्या कायद्याची अमलबजावणी सैनिकांकडून अत्यंत काटेकोरपणे करण्यात येते. अशा कायद्याविरुद्ध कोणालाही कोर्टात जाता येत नाही.

**२) न्यायाद्वारे निर्मिती कायदा** – परंपरागत प्रथा व न्यायबुद्धी यास अनुसरून कधीकधी न्यायाधीश निर्णय देतात. प्रचलित कायदा अपूरा ठरण्यास न्यायाधीश सदसदविवेकबुद्धीला अनुसरु निर्णय देतात व प्रचलित कायद्यातील उणिवा दूर करतात. सदरचा निर्णय भविष्यकाळातील खाटल्यासाठी प्रमाणभूत मानला जातो.

**३) निर्वाचन मंडळाद्वारे निर्मित कायदा** – स्वित्झर्लंड व अमेरिका येथील काही घटकराज्यात कायद्याविषयी पुढाकार घेण्याचा व कायदेमंडळाने केलेल्या कायद्यावर अनुकूल व प्रतिकूल मत व्यक्त करण्याचा अधिकार जनतेला आहे. त्यानुसार तयार होणारे कायदे ‘‘निर्वाचन मंडळाद्वारे निर्मित” ह्या प्रकारात मोडतात.

**४) परराष्ट्र करार** — संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार व कायदेमंडळाद्वारेप्राप्त झालेल्या प्रदत्त विधेयक शक्तीनुसार राष्ट्राध्यक्ष आणि त्याच्या हाताखाली असलेल्या उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यातर्फे प्रदेशाशी जे करार करण्यात येतात, त्यांना परराष्ट्रकरार असे म्हणतात. कायदेमंडळाने अशा करारांना संमत्ती दिली की त्याचे कायद्यात रुपांतर होते.

**आंतरराष्ट्रीय कायदा (International Law)**

सुसंस्कृत राष्ट्रांना आपल्या परस्पर व्यवहारासाठी कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक म्हणून समजला गेलेला ‘‘सांकेतिक नियमांचा संच म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा आहे. अशी व्याख्या ऑपेन्होमने केलेली आहे.

अलीकडे राष्ट्राराष्ट्राचे संबंध सुरळीत व्हावेत व मैत्रीपूर्ण व्यवहार निर्माण व्हावेत म्हणूनच आंतरराष्ट्रीय संघटना आपल्या सभासद राष्ट्रांवर काही बंधने घालते, त्या बंधनांना व नियमांना आंतरराष्ट्रीय कायदा असे म्हणतात. काही विचारवंत आंतरराष्ट्रीय कायद्याला कायदा मानत नाहीत कारण या कायद्याचे उल्लंघन करण्याला राष्ट्रात शिक्षा करण्यासाठी प्रबळ आंतरराष्ट्रीय सत्ता नसते. तसेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय उल्लंघन करण्याचा राष्ट्रांवर बंधनकारक नसते.

राष्ट्राराष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन न केल्यास अराजकता माजेल म्हणूनच या कायद्याचे पालन होणे आवश्यक आहे. राज्याचे निरंकुश सार्वभौमत्व हाच या कायद्याच्या विकासातील अडथळा आहे. असा कायदा आंतरराष्ट्रीय ठराव, करारनामे, आंतरराष्ट्रीय परिषदा, राष्ट्राराष्ट्रांनी मान्य केलेली आचारसंहिता याद्वारे निर्माण होरो. सुसंस्कृत राज्य या कायद्याचे पालन करताना दिसतात .

**कायद्याचे महत्व**

कायद्याचा हेतू आणि कायदेपालनाची गरज म्हणजेच कायद्याचे महत्व होय राज्यातील प्रत्येक व्यक्तीने कायद्याचे पालन करण्याची गरज असते. त्याची करणे पुढिलप्रमाणे —

**१) राज्याचे सार्वभौमत्व कायद्यातून व्यक्त होते -**

एखादे राज्य सार्वभौम आहे, हे त्या राज्याच्या कायद्यातून लक्षात येते. कारण प्रत्येक राज्यामध्ये त्या देशाची शासनपद्धती यशस्वी होण्यास कायद्याची गरज असते. बार्कर या विचारवंताच्या मते, शासनाचे खरे यश कायदापालनात, कायद्याचा आदर व अंगीकार करण्यात आहे.

**२) शांतता व सुव्यवस्था —**

मानवी वर्तन नियंत्रित करण्याचे, समाजातील व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध प्रस्थापित करण्याचे साधन म्हणजे कायदा होय. कायदा समाजाच्या हितसंरक्षणाचे साधन आहे. समाजातील सर्वावर नियंत्रण ठेऊन शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य कायदा करीत असतो.

**३) दुर्बलांचे रक्षण करणे –**

कायदा समाजविरोधी कृतींना निर्बंध घालतो, भीतीयुक्त वातावरण निर्माण करणे हा कायद्याचा उद्देश असतो. कायद्यामुळे दुर्बल, गरीब, मागासलेले या सर्वांना न्याय मिळतो. कायद्यामुळे गरीब व श्रीमंत या सर्वांना न्याय मिळतो. लोकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचे रक्षण होते.

**४) मानवी संस्कृतीची प्रगती –**

समाजाचा सामाजिक, आर्थिक,राजकीय , सांस्कृतिक प्रगतीचा आधार कायदाच आहे. सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्याचे काम कायदा करीत असल्यामुळे विकास व शांतता प्रस्थापित होत असते. समाजात स्वतंत्र, समता व न्याय कायद्याद्वारेच प्रस्थापित होतो.

**५) राष्ट्रीय विकास –**

राष्ट्राची सर्वांगीण प्रगती कायद्याच्या अस्तित्वामुळेच झाली आहे. कायदा नसेल तर अराजक निर्माण होईल. कायद्यामुळेच कल्याणकारी राज्याची निर्मिती व सामाजिक न्याय ही राज्याची उद्दिष्ट्ये साध्य होण्यास मदत होते.

**निष्कर्ष**

संपूर्ण जगात व समाजात कायदा आहे. कायदा समाजाला एक वैधानिक व न्याय्य चौकट प्रदान करतो ज्या आधारे संबंध मानव समूहाचे नियमन होते कायद्याशिवाय मानवाचे व मानवी संस्कृतीचे अस्तित्वच शक्य नाही.

## ४.४ राजकीय आबंधन (Political Obligation)

**प्रस्तावना :-**

राज्याच्या नागरिक या नात्याने प्रत्येक व्यक्तीवर राजकीय आबंधनाची जबाबदारी असते. प्रत्येक देशाचे नागरिक राज्याच्या आज्ञा पाळतात. आणि शासनात सहकार्य करतात.

राजकीय तत्वज्ञानातील राजकीय आबंधन ही मध्यवर्ती संकल्पना आहे. एखादी राजकीय व्यवस्था टिकणे व अस्तित्वात राहणे हे राजकीय आबंधनावर आधारित आहे. जेव्हा लोक राजकीय व्यवस्थेशी एकनिष्ठ राहून राज्याचे आज्ञापालन करतात, तेव्हा ती व्यवस्था टिकून राहते. यावरून दोन महत्वाचे प्रश्न निर्माण होतात. १) लोक राज्याच्या आज्ञा का पाळतात ? २) लोक राज्याच्या आज्ञा का पाळत नाहीत? किंवा लोक राज्याला प्रतिकार का करतात?

**राजकीय आबंधनाचा अर्थ आणि स्वरूप –**

'ऑब्लीगेशन' ही संज्ञा रोमन कायद्यातून आलेली आहे. काही लोक यासाठी 'आज्ञापालन' किंवा 'आज्ञा पालनाची जबाबदारी' असे मराठी पर्याय वापरतात. आबंधन म्हणजे कर्तव्य करणे किंवा एखादी कृती करणे किंवा न करणे होय,

स्वेच्छेने, स्वविवेकाने, अंतर्गत, प्रेरणेतून नागरिक जेव्हा राजकीय आज्ञापालन करतात तेव्हा त्यांना राजकीय आबंधन असे म्हणतात. प्रो.अरनेस्ट बार्कर यांनी 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशल अँड पोलीटीकल थेअरी' या ग्रंथात असे म्हटले आहे की "एखादी गोष्ट करण्याच्या आवश्यकतेपोटी आपणास साध्य करणारा कायदेशीर बंध म्हणजे आबंधन होय." राज्याकडे सर्वोच्च सत्ता असते, त्यामुळे राज्याने नागरिकांना आज्ञा देणे आणि त्या आज्ञा नागरिकांनी पाळणे अपेक्षित असत. नागरिकांनी काय करावे व काय करू नये हे सांगण्याचा अधिकार राज्यास असतो. राजकीय आबंधनातच राजकीय उत्तरदायीत्व असेही म्हटले जाते.

राजकीय आबंधनाचे स्वरूप –

१) नैतिक आणि कायदेशीर आबंधन

२) सकारात्मक आणि नकारात्मक आबंधन

**नैतिक आबंधन –**

अनेक वर्षापासून समाजात प्रथा, परंपरा, रूढी या स्वरुपात जी नैतिक कर्तव्य पार पाडावी लागतात त्यास नैतिक आबंधन म्हणतात. नैतिक कर्तव्यदेश, काळ व समाज याप्रमाणे भिन्नभिन्न असतात. त्यामुळे नैतिक आबंधन ऐच्छिक आहे. उदा. समाजातील गरजूंना मदत करते. मोठे किंवा वरिष्ठ यांचा आदर राखणे इ.

**कायदेशीर आबंधन** –

राज्याने मान्य केलेले, कायद्याने प्रस्थापित केलेले नियम पाळणे म्हणजे कायदेशीर आबंधन होय. कायद्याला राज्याचे पाठबळ असलेले नागरिक राजकीय आबंधन करतात. राजकीय आबंधन केले नाही तर व्यक्तीला दंड होतो. उदा. भारतीय नागरिकांची राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राज्यघटना यांचा आदर करावा लागतो. हे राजकीय आबंधन आहे. जर लोकांनी हे केले नाही तर दंड होतो.

**सकारात्मक आबंधन** –

राष्ट्रपती लोकांनी काय करावे हे सांगणारे राज्याचे कायदे म्हणजे सकारात्मक आबंधन होय. उदा. कर भरणे, मतदान करणे इ.

**नकारात्मक आबंधन –**

राज्याने मनाई केलेल्या गोष्टी न करणे हे सांगणारे राज्याचे कायदे म्हणजेच आबंधन होय. उदा. चोरी करू नये, खून करू नये. इ.

**महत्वाची राजकीय आबंधने**

**१) राज्याशी सहकार्य करणे –**

लोकांच्या सहकार्यानेच राज्यव्यवस्था आणि शासनव्यवस्था कार्य करीत असते. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने राज्याचे शत्रूपासून संरक्षण करणे, आपल्या राज्याला संकटापासून वाचवणे, राज्याला सेवा देणे, राज्याप्रती प्रामाणिक असणे, राज्याला एकात्मतेचे रक्षण करणे इ. स्वरुपाची भूमिका बजावावी लागते.

**२) राज्याच्या कायद्याचा आदर करणे आणि कायदे पाळणे -**

लोकांच्या कल्याणासाठी हितासाठी कायदे असतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने राज्याच्या कायद्याचे पालन करणे व आदर करणे आवश्यक आहे.

**३) नियमित आणि वेळेवर कर भरणे -**

राज्याची शासकीय यंत्रणा, सैन्यव्यवस्था , पोलीसयंत्रणा, कल्याणकारी योजना इ. खर्च राज्य करीत असते. ह पैसा राज्यात करातून मिळतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे कर भरणे हे कर्तव्य आहे.

**४) मतदान करणे -**


नागरिकांचा मतदानाचा हक्क ह केवळ एक अधिकार नसून ते एक महत्वाचे आबंधन आहे. स्थिर, यशस्वी आणि लोकशाही स्वरूपाचे शासन निर्माण होण्यासाठी सदसद्विवेकबुद्धीने मतदान करावे. सार्वजनिक पद निष्ठेने व सेवाभावीवृत्तीने धारण करावे हे सुद्धा एक आबंधक आहे.

**५) शासनाशी सहकार्य करावे -**

शांतता, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी नागरिकांनी शासनाला मदत करावी. भ्रष्टाचार निर्मुलन, आणीबाणीच्या काळात सेवा देणे, अंधाधुंदिस आळा घालणे इ. कार्य करताना नागरिकांनी शासनाला मदत करावी.

**राजकीय आबंधनाचे प्रकार (Grounds of Political Obligation)**

राज्याच्या आज्ञा किंवा कायदे लोकांनी का पाळावेत? या प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी राजकीय आबंधनाचे आधार किंवा कारणे कोणती आहेत, त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. खालील घटक राजकीय आबंधनाचा आधार आहेत. किंवा लोक राज्याच्या आज्ञांचे पालन का करतात याची करणे पुढीलप्रमाणे आहेत –




**१) कायदेशीर आधार – (Legal Ground) –**

राज्याकडे सार्वभौम सत्ता असते त्यामुळे राज्य सर्व संस्था , संघ, नागरिक यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. राज्य त्यासाठी कायदे तयार करते. ते कायदे पाळणे प्रत्येकाचे राजकीय आबंधन आहे. राज्यघटना, राज्याचे कायदे पाळणे लोकांना आणि शासनाला बंधनकारक आहे.

**२) लॉर्ड ब्राईस च्या मते, अबंधनाचे आधार (According to Brice) -**

लॉर्ड ब्राईस यांनी राजकीय आबंधनाचे पुढील आधार सांगितले आहेत.

**अ) मानवी स्वभाव –** कोणत्याही प्रकारच्या त्रासापासून मुक्त राहणे हा मानवी स्वभाव आहे. त्यामुळेच राज्याला विरोध करण्याचा कोणी सहसा प्रयत्न करत नाही. राज्याचे कायदे लोक पाळतात, कारण कायदे पाळले नाहीत, तर जो त्रास सहन करावा लागतो व दंड होतो, तो होऊ नये या विचाराने लोक कायदे पाळतात.

**ब) आदर –** राज्याप्रती व शासनप्रती आदर राखणे या कारणापुढे लोक राज्याचे कायदे पाळतात.

**क) सहानुभूती -** राज्यातील घटकांबद्दल मानसिक दृष्टीने सहानुभूतीचे भाव असते, त्यामुळे लोक राजकीय आज्ञापालन करतात.

**ड) भीती – दंडाविना** शिक्षेची भीती लोकांच्या मनात असते. राज्याचे कायदे मानले नाहीत तर राज्याच्या दंडशक्तीकडून शिक्षा होईल, असे लोकांना वाटते, त्यामुळे भीतीने लोक कायदेपालन करतात.

**इ) विवेक –** संपूर्ण समाजाचे आणि लोकांचे हित कायदे पाळण्यातच आहे. या विचाराने लोक राज्याचे आज्ञापालन करतात.

### राजकीय आबंधनाचे विविध सिद्धांत (The Theoretical Justification of Political Obligation) –

राजकीय विचारवंतांनी राजकीय आबंधनाला समर्थनार्थ विविध सिद्धांत मांडले आहेत. त्यामध्ये काही महत्वाचे सिद्धांत खालीलप्रमाणे आहेत.

### १) दैवी सिद्धांत ; दैवी हक्कांचा आधार (Divine Will)

सर्व धर्मग्रंथात राज्याचे आज्ञापालन दैवी कारणामुळे होते असे प्रतीपादन केले आहे, राजा आणि राज्य हे दैवी अधिकार आहे. राजा देवाचा किंवा ईश्वराचा अवतार आहे. त्यामुळे राजाच्या आज्ञा पाळणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. राजाला विरोध म्हणजेच देवाला विरोध होय आणि असे केल्यास पाप होईल असा समज असल्यामुळे लोक राजकीय आज्ञापालन करतात. राजेशाहीत हा सिद्धांत लोकप्रिय आहे. परंतु आधुनिक काळात हा सिद्धांत अशास्त्रीय समजण्यात योतो. तसेच या सिद्धांताला ऐतिहासिक आधार नाही. प्राचीन काळी आणि मध्ययुगीन काळी राजकीय आबंधनाचा आधार धार्मिक होता.

### २) सामाजिक करार सिद्धांत ;लोकांची संमत्ती (Consent of the people) –

युरोपात १७ व्या व १८ व्या शतकात हॉब्ज , लॉक आणि रुसो यांनी सामाजिक करार सिद्धांत मांडले. त्यांच्या मते, निसर्गावस्थेत माणूस असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. म्हणूनच त्या अवस्थेत कंटाळून लोकांना सामाजिक करार करून राज्य निर्माण केले. राज्याच्या आज्ञा लोक स्वेच्छेने पाळायला लागले , म्हणूनच 'लोकसमत्ती', 'लोकांची इच्छा' हेच राजकीय आबंधनाचे मुख्य कारण आहे. थॉमस हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेत राज्य नव्हते, त्यामुळे निसर्गावस्थेत अंदाधुंदी व अव्यवस्था होती. भीतीयुक्त वातावरण होते. अशा या हीन वातावरणातून लोकांनी

सामाजिक करार  केला राज्य निर्माण केले. संपूर्ण सत्ता असलेल्या व्यक्तीला आपले हक्क अर्पण केले. आपल्या हक्क रक्षणाची जबाबदारी लोकांनी त्या व्यक्तीवर टाकली. शांतता, सुव्यवस्था व संरक्षणाची जबाबदारी लोकांनी राज्यावर टाकली आणि स्वेच्छेने राज्याच्या आज्ञा पाळायचे ठरविले.

जॉन लॉक यांच्या मते, निसर्गावस्थेतून बाहेर पडण्यासाठी लोकांनी करार केला व त्यातून राज्य निर्माण केले. या करारामध्ये राज्याच्या वतीने काम करणारे शासन घटनात्मक आणि  मर्यादित असेल असे ठरविले, लोक शासनाच्या आशा तोपर्यंत पाळतील जोपर्यंत शासन लोकहितासाठी काम करेल. परंतु शासन दडपशाही करणारे असेल तर अशा शासनाच्या आज्ञा लोक पळणार नाहीत व अशा शासनाला प्रतिकार करतील.

रुसो या विचारवंताच्या मते, राज्य  लोकांनी केलेल्या कराराचा परिणाम आहे. राज्य लोकसंपत्तीवर आधारलेले आहे. सर्वोच्च सत्ता लोकांच्या सामुहिक इच्छेमध्ये राहील. अशा राज्यात लोक राज्याच्या आज्ञा पाळण्यास बांधील राहतील. शासन सत्तेचा दुरुपयोग करत असेल तर अशा राज्याविरुद्ध क्रांती करण्याचा लोकांना हक्क राहील. एकूण शांततेने सुरक्षिततेने जगता यावे म्हणून लोकांनी सामाजिक करार केला आणि राज्याची निर्मिती केली. राज्याचा आधार लोकांनी इच्छा व संमत्ती आहे. म्हणजेच राज्याच्या नियमांचे पालन लोक इच्छेने करतात. असे या सिद्धांताच्या  समर्थकांचे मत आहे.

**३) उपयोगितावादी सिद्धांत –**

'अधिकतम लोकांचे अधिकतम हित' साध्य करण्यासाठी राज्य निर्माण झाले आहे. राज्याची उपयोगिता लक्षात घेऊन लोक राज्याच्या आज्ञांचे पालन करतात. राज्य हे एक साधन आहे आणि सर्वसामान्यांचे हित व कल्याण करणे हे राज्याचे साध्य आहे. राज्य लोकांसाठी स्थापन झाले आहे, एक उपयोगी संस्था आहे हे पटल्यामुळे लोक राज्याचे आज्ञापालन करतात. बेंथेमच्या मते, राज्य जास्तीत जास्त लोकांच्या जास्तीत जास्त सुखासाठी निर्माण झाले आहे. राज्य कायदे, दंडशक्ती, न्याय याद्वारे लोकहिताचे साध्य पूर्ण करते.

**४) आदर्शवादी सिद्धांत : मानवी विवेक -**

विवेक हा राजकीय आबंधनाचा मुख्य आधार आहे. मानवाला आपले बल आणि दुर्बलता या दोन्हींची जाणीव आहे. प्रत्येक व्यक्ती आपले बल वाढविण्याचा आणि दुर्बलता कमी करण्याचा सतत प्रयत्न करत असते. प्रत्येक व्यक्तीचे जीवनाचे ध्येय स्वत:चा जास्तीत जास्त विकास करणे हे आहे. हे ध्येय प्रत्येक व्यक्ती समाज आणि राज्यात राहूनच पूर्ण करते. व्यक्तीला व्यक्तीत्वांचा विकास समाज आणि राज्यात राहूनच शक्य आहे. हेगेल, टी.एच..ग्रीन यांच्या मते, राज्यात राहूनच व्यक्ती आपल्या व्यक्तित्वाचा विकास करू शकतो. त्यासाठी व्यक्तीला राज्याच्या आज्ञा नियम व कायदे पाळावे लागतील.

हेगेल या आदर्शवादी विचारवंताच्या मते, राज्य हे मानवी विवेकांचे मूर्त स्वरूप होय. राज्य हे पृथ्वीवरील देवाचे संचालन होय. तर टी.एच.ग्रीन यांच्या मते, राज्याचा आधार ताकद किंवा बळ नसून लोकांची इच्छा आहे.

**५) मार्क्सवादी सिद्धांत –**

मार्क्सवादी राज्याला शोषण करणारे संच समजतात. त्याच्या मते भांडवलशाही व्यवस्थेमध्ये राज्य भांडवलाच्या हितांचे रक्षण करणारी व भांडवलदारांच्या वर्चस्वासाठी काम करणारी संस्था आहे. यामध्ये विशिष्ट वर्गाचे हितसंबंध सुरक्षित ठेवणारी संस्था म्हणजे राज्य असे मार्क्स मानतो. या व्यवस्थेत राज्यात प्रतिकार करण्याचा, क्रांती करण्याचा लोकांना हक्क आहे. भांडवलशाही नष्ट झाली व साम्यवादी व्यवस्था प्रस्थापित झाली की शोषण संपेल व राज्य ही सर्वांचे जीत साधणारी संस्था असेल असे या सिद्धांताद्वारे राज्याच्या आज्ञापालनेसाठी मत व्यक्त केले आहे.

**६) परंपरावादी सिद्धांत ; रूढी, परंपरा, वहिवाट –**

सर हेन्री मेन यांच्या मते लोकांना रूढी परंपरेप्रमाणे राजाज्ञा पालन करण्याची सवय लागलेली असते. लोक अनेक वर्षापासून इच्छेने सवयीने राजकीय आज्ञा पाळत असतात. लोकांची हीच सवय कायम राहते. एडमंड बर्क या परंपरावादी विचारवंताने असे म्हटले आहे की, राज्यसंस्था ही उत्क्रांतीतून निर्माण झालेली असते. अनेक सामुहिक शहाणपणा , अनुभव यातून राज्य निर्माण झालेले असते.

**७) शक्ती सिद्धांत -**

शारीरिक बळ , युध्द, वर्चस्व प्रस्थापित करणे यातून राज्य उदयास आलेले आहे. राज्य निर्माण झाल्यानंतर सुद्धा टिकून राहते, ते राज्याकडे असलेल्या दंडशक्तीमुळेच होय. राज्यात शांतता, सुव्यवस्था ठेवण्याचे काम परकीय आक्रमणापासून राज्याचे संरक्षण करण्याचे काम फक्त पोलीसयंत्रणेत असते. त्यांच्या भीतीमुळेच लोक राजकीय आबंधन करतात. कायदेभंग करण्यातच दंड करण्याचा आणि शिक्षा देण्याचा अधिकार राज्यात आहे. म्हणजेच राज्याकडे असलेली दंडशक्ती म्हणजे राजकीय आबंधनाचा आधार आहे.

**८) राजकीय आबंधनाचे इतर आधार**

**१) व्यक्तीची सामाजिक आणि राजकीय गरज –** मनुष्य सामाजिक आणि राजकीय प्राणी आहे. तो एकाकी राहू शकत नाही. मनुष्याच्या सामाजिक गरजातूनच समाजाची स्थापना झाली आणि राजकीय गरजातून राज्याची स्थापना झाली. समाज आणि राज्य दोन्ही संस्था मानवी हितासाठी निर्माण करण्यात आल्यामुळे मानव या दोन्ही संस्थांच्या नियमांचे पालन करतो.


**२) शासनाची अधिमान्यता –** सुशिक्षित आणि राजकीय दुष्ट्या जागरूक नागरिक राज्याचे नियम पाळतात, कारण शासन राज्याच्या वतीने काम करणारी संस्था आहे व शासनाला अधिमान्यता असते. उदा. भारतीय संसदेने केलेले कायदे सर्व नागरिक

पाळतात कारण संसदे मधील  सर्व सद्द्यांची निवड मुक्त व खुल्या पद्धतीने झालेली असते. जेव्हा शासनाला अशी अधिमान्यता असते, तेव्हा राजकीय आबंधन करणे आपले कर्तव्य आहे, यावर लोकांचा विश्वास असतो.

**३) अंदाधुंदीची भीती –** समाजात सर्वसामान्यपणे बहुतेक शांतताप्रिय असतात. त्यांना सुरक्षित जीवन हवे असते, असे जीवन राज्य व कायद्याअभावी शक्य नसते. जर सुरक्षित व शांतताप्रिय जीवन हवे असेल तर राजकीय आबंधन करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन लोक आपली कर्तव्य पाळतात.

**४) राजकीय आबंधनाच्या मर्यादा –** राजकीय आबंधन करणे गरजेचे आहे. परंतु ते निरपेक्ष (Absolute) नाही, ते मर्यादित आहे. काही विशिष्ट परिस्थितीत राज्याला कायद्याला विरोध करावा. उदा. अन्यायी व समाजहिताच्या विरोधी कायदे. अशावेळी शासनाशी सहकार्य न करता आणि राजकीय आज्ञापालन डोळसपणे करावे. दडपशाही व जुलमी कायद्याला लोकांनी प्रतिकार करावा.

**तक्ता**



## ४.५ प्रतिकाराचा हक्क (Right to Restistance)

**प्रस्तावना**

राजकीय अधिकाराचा एक महत्वाचा अधिकार विशिष्ट परिस्थितीत या अधिकाराचे समर्थन करता येते. टी.एच.ग्रीन, प्रा.लास्की या विचारवंतानी सरकारला विरोध करण्याचा अधिकार मान्य केला आहे. ज्या शासनयंत्रणेत हा अधिकार अमान्य केला जातो, ती जुलमी शासनव्यवस्था होय.

प्रतिकाराचा हक्क यासंबंधी खालील मुद्दे महत्वाचे आहेत.

१) प्रतिकाराचा हक्क म्हणजे काय?

२) कोणत्या परिस्थितीत हा हक्क समर्थनीय आहे?

३) प्रतिकाराच्या हक्काचे स्वरूप आणि साधने कोणती?

**प्रतिकाराचा हक्क म्हणजे काय? (Meaning)**

शासनाच्या आज्ञा आणि कायदे पालनास नागरिकांनी नकार देणे म्हणजे प्रतिकार करणे होय. राजकीय आज्ञापालन आणि आबंधन न करणे म्हणजे प्रतिकार करणे होय.

**शासनाला प्रतिकार करण्याचे उद्दिष्ट –**

लोकांचे अधिकार ज्यावेळी धोक्यात येतात त्यावेळी लोक राज्याला प्रतिकार करतात. अशावेळी त्यांना राजकीय व्यवस्थेत, कायद्यामध्ये, राज्याला धोरणात किंवा कार्यात बदल हवे असतात. राज्याने मनाई केलेली एखादी कृती करणे किंवा जी कृती करणे राज्याला कायद्याप्रमाणे आवश्यक आहे ती न करणे या दोन्हींचा समावेश राजकीय प्रतिकाराच्या हक्कात होतो.

जगाच्या इतिहासात राजकीय प्रतिकाराची अनेक उदाहरणे आहेत. अमेरिकेत जॉर्ज वॉशिंग्टन यांनी राजकीय प्रतिकाराद्वारे ब्रिटीश शासनाला विरोध केला. भारतात म.गांधींच्या नेतृत्वाला हजारो भारतीयांनी ब्रिटीश शासनाला दडपशाहीच्या धोरणात प्रतिकार केला होता.

**प्रतिकाराच्या हक्काचे समर्थन –**

नागरिकांना राज्याच्या कायद्यांना शासनाला प्रतिकार करण्याचा हक्क आहे. राज्याचे कायदे पाळणे, हे जसे नागरिकांचे कर्तव्य आहे तसेच अन्यायी कायद्यांना प्रतिकार करणे हे ही नागरिकांचे कर्तव्य आहे. राजकीय आबंधन निरपेक्ष (absolute) काही विशिष्ट परिस्थितीत सत्तेला विरोध करण्याचा लोकांना हक्क आहे. शासनाचा कायदा अन्यायी, नुकसानकारक लोकांच्या हक्कांचा भंग करणारा दडपशाही स्वरूपाचा असेल तर अशा कायद्याला विरोध करण्याचा अधिकार लोकांना आहे. प्रतिकाराचा हक्क न्याय कारणासाठीच वापरावा व विशिष्ट परिस्थितीतच अंमलात आणावा.

विविध राजकीय विचारवंतानी याबाबतीत वेगवेगळी मते मांडली आहेत. ॲरिस्टॉटल च्या मते, प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. तो १) न्यायप्राप्तीसाठी २)समता, समान दर्जा मिळावा यासाठी लोक अन्याय व आसमंत कधीच सहन करत नाहीत. त्यासाठी ते क्रांती करतात. जॉन मिल्टन म्हणतात की जुलमी आणि दडपशाही करणाऱ्या राज्यकर्त्याला विरोध करणे लोकांचा नैसर्गिक अधिकार आहे. व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र्य असते. स्वसंरक्षणासाठी व सर्व संमतीने लोकांनी शासनाची स्थापना केली आहे. तेच शासन अन्याय करीत असेल तर अशा शासनाला विरोध करणे लोकांचा हक्क व कर्तव्य आहे.

**उदारमतवादी विचार**

जॉन लॉकच्या मते, लोकांनी राज्याला विरोध करावा परंतु शेवटचा उपाय म्हणून लोकांनी प्रतिकार करावा. शासन खरोखरच अन्यायी असेल तरच प्रतिकार करावा. शासन लोकांकडे दुर्लक्ष करीत असेल. कायदेशीर किंवा घटनात्मक मार्गाचा अवलंब करूनही शासन लक्ष देत नसेल, लोकांच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर बंदी येत असेल तर अंतिम मार्ग म्हणून प्रतिकार करणे समर्थनीय ठरते.

**आदर्शवादी विचार**

डी.एच.ग्रीन या आदर्शवादी विचारवंताने प्रतिकाराला हक्काचे समर्थन केले आहे. विशिष्ट परिस्थितीतच व लोकांनी स्वतःला काही प्रश्न विचारूनच शासनाने प्रतिकार करावा. ग्रीन च्या मते खालील प्रश्नांचा विचार करून प्रतिकाराचा हक्क वापरावा

१) अन्यायी शासन व कायदे यात दुरुस्ती व्हावी यासाठी कायदेशीर आणि घटनात्मक मार्गाचा अवलंब केला काय?

२) प्रतिकाराचा हक्क वापरण्यापूर्वी शांतपणे योग्य-अयोग्यतेचा विचार केला काय?

३) ह हक्क सर्व लोकांच्या हितासाठी वापरणार आहोत काय?

४) प्रतिकाराचा हक्क बजावण्यासाठी ज्या नैसर्गिक शक्ती आवश्यक असतात, त्या माझ्यात आहेत काय? उदा. इच्छाशक्ती, धैर्य, निश्चय इ.

५) प्रतिकाराचा हक्क वापरण्याचा परिणाम कोणता होणार आहे? माझ्या कृतीमुळे परिस्थितीत सुधारणा होणार आहे काय?


ग्रीन च्या मते वरील प्रश्नांचा शोध घेऊनच प्रतिकाराचा हक्क वापरावा.

**गांधीवादी विचार**

म. गांधी यांनी ब्रिटीशांच्या दडपशाहीविरुद्ध या हक्काची अंमलबजावणी अनेकदा केली. त्याच्या मते अन्यायी कायद्याविरुद्ध प्रतिकार करण्याचा हक्क लोकांना आहे. जेव्हा सर्व घटनात्मक आणि कायदेशीर मार्गांनी विरोध केल्यानंतर सरकार दाद देत नाही. तेव्हाच लोकांनी प्रतिकार करावा. प्रतिकार शांततेच्या मार्गाने करावा. जयप्रकाश नारायण, मार्टिन ल्युथर किंग, दलाई लामा, ऑँग-साँग सूकी या सर्व

विचारवंतांनी असे मत मांडले की, अन्यायी कायद्डे नागरिकांनी पाळणे अनैसर्गिक आहे. न्याय कायदे पाळणे लोकांचे कर्तव्य आहे. जयप्रकाश नारायण यांनी शेतकर्यांच्याजमिनी संबंधी अन्यायी कायदे करण्याचा विरोध केला होता. आणि चळवळ केली होती. मार्टिन ल्युथर किंग यांनी अमेरिकेत वंशभेद करणारे कायदे नष्ट व्हावेत म्हणून चळवळ केली होती.


निष्कर्ष – यावरून असे म्हणता येईल की, प्रतिकाराचा हक्क समर्थनीय आहे. परंतु काही विशिष्ट परिस्थितीला ह हक्क असमर्थनीय ठरतो. म्हणूनच लॉर्ड ब्राईस म्हणतात की, Political Rights is not a daily Brade, it is maedicine. राजकीय प्रतिकाराचा अधिकाराचा औषध म्हणूनच वापर करावा. रिजच्या जेवणाप्रमाणे ह हक्क वापरू नये.




प्रतिकाराची साधने किंवा पद्धती (Forms and Resistance)
शासनाला प्रतिकार करण्याचे दोन मार्ग आहेत.

१) हिंसात्म्क मार्ग

२) अहिंसात्मक मार्ग




**हिंसात्मक मार्ग –**

क्रांती, दहशतवाद, लष्करी हस्तक्षेप, बंड, समस्याच उपयोक, जाळपोळ, तोडफोड करणे इ. मार्गांना हिंसात्मक साधने म्हणतात.

क्रांती (Revolution) – जबरदस्तीने शास्त्रज्ञाला सत्तेवरून काढून टाकणे म्हणजे क्रांती असा होय. क्रांती करून अन्यायाला प्रतिकार करणे ह फार जुना मार्ग आहे. अन्याय करणाऱ्या राजाविरुद्ध क्रांती करणे या मार्गाने प्राचीन भारतीय परंपरेत मान्यता होती. साधारणपणे क्रांतीचे स्वरूप हिंसात्मक असते. रक्तरंजित क्रांती अशा स्वरुपाची असते. रॉबर्ट ढाल यांच्या मते, क्रांती म्हणजे हिंसात्मक कृती जी समूहात्म्क असते, ज्या कृतीद्वारे प्रस्थापित सत्तेला लोक अमान्य करतात. ती सत्ता नष्ट करतात. प्रस्थापित सत्तेला लोक अमान्य करतात. ती सत्ता नष्ट करतात. प्रस्थापित व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवून आणणे हे क्रांतीचे उद्दिष्ट आसते.

जगाच्या इतिहासात  फ्रेंच राज्यक्रांतीत (१७८९) महत्वपूर्ण क्रांती समजण्यात येते. २० व्या सत्कात अनेक राज्यक्रांत्या झाल्या. त्यामध्ये १९१७ ची रशियन राज्यक्रांती आणि १९४९ मध्ये झालेली चीनची राज्यक्रांती होय.

आजच्या काळात दूरगामी बदलांनासुद्धा क्रांती म्हणतात. उदा. हरितक्रांती, संगणक क्रांती, प्रतिकाराचे साधन म्हणून क्रांतीचा उल्लेख होतो. तेव्हा सामाजिक किंवा राजकीय व्यवस्था प्रतिकाराच्या माध्यमातून काढून किंवा उलथून टाकणे होय. क्रांतीचे स्वरूप मोठे असते, ते खालीलप्रमाणे-

**१) राज्याच्या सर्व बाजूंवर परिणाम करणारी असते** – क्रांती राज्याला फाज्त राजकीय बाजूवर परिणाम करीत नाही तर समाज, अर्थ, संस्कृती अशा सर्व बाजूंवर परिणाम करणारी असते.

**२) क्रांतीने आमुलाग्र बदल होतो** – क्रांतीचे परिणाम संपूर्ण आमुलाग्र व दूरगामी असतात. क्रांतीने राज्यातील सर्व व्यवस्था नव्या स्वरुपात उदयास येतात.

**३) हिंसात्मक** – क्रांतीचे स्वरूप हिंसात्मक असते.

**४) नवीन व्यवस्था आणणे हे उद्दिष्ट** – प्रस्थापित व्यवस्थेचा शेवट करणे त्या व्यवस्थेला नष्ट करणे एवढाच उद्देश क्रांतीचा नसून त्या जागी नवी व्यवस्था आणणे हे क्रांतीचे उद्दिष्ट असते. बंड आणि क्रांती यात फरक आहे.

**दहशतवादी कारवाया** –

सत्तेला प्रतिकार करण्याचा हिंसात्मक मार्ग म्हणजे कट-कारस्थान, दहशतवादी कृती करणे होय. काही थोड्या व्यक्ती ज्या सत्तेबद्दल समाधानी नसतात. सत्ता ज्यांच्या विरुद्ध असते त्या व्यक्ती ज्या सत्तेविरुद्ध दहशतवादी कारवाया करतात. उदा. खलिस्तान, तमिलएलम इत्यादी संघटना दहशतवादी कुटी करून आपल्या मागण्या शासनाकडून  मान्य करून देण्याचा प्रयत्न करतात. याला कारवाया राज्यिविरोधी आणि राष्ट्र विरोधीही असतात. अशा संघटनांवर बंदी घालण्यात येते.

**लष्करी हस्तक्षेप** –

शासनाविरुद्ध बंड करून लष्करी हस्तक्षेपाद्वारे त्या शासनाला बडतर्फ करून सत्ता मिळविणे. ह्या हिंसात्मक प्रतिकाराचा मार्गाद्वारे अनेक देशामध्ये लवकर सत्ता आपल्या हाह्त घेते. उदा. पाकिस्तान, बांगलादेश, इत्यादी देशांमध्ये लष्करी हस्तक्षेपाद्वारे सत्ता मिन्विण्यात आली. महत्वकांक्षी असलेला लष्करप्रमुख मिळविण्यात यशस्वी होतो.

**अहिंसात्मक प्रतिकाराची साधने** –

दुसर्या महायुद्धानंतर म.गांधींचे अहिंसक प्रतिकाराचे साधन संपूर्ण जगामध्ये लोकप्रिय झाले आहे. त्यालाच सत्याग्रह असे म्हणतात. सत्याग्रह हे तंत्र जुने असले तरी त्याचा प्रभावी वापर म.गांधी यांनी केला. मानवी सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविण्यासाठी म.गांधींनी सत्याग्रहाचा अवलंब केला होता.

अन्यायी कायदे दडपशाही करणारे शासन कायदेशीर मार्गाने बदलत असेल तर अशाच शासनाला प्रतिकार करण्याचा लोकांना हक्क आहे. असा प्रतिकार शांततामय मार्गाने व्हावा. शांततापूर्ण मार्ग म्हणजे सत्याग्रह होय.

**सत्याग्रहाचा अर्थ –**

सत्याग्रह हे नैतिक साधन आहे. संघर्षाचा अहिंसात्मक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे सत्याला बांधील राहणे. सत्याग्रह म्हणजे आत्मशक्ती असे गांधी गांधी म्हणत. सत्याग्रहात प्रेमाने जग जिंकणे आणि लोकांचे नाही तर जागरूक, शूर आणि सक्रीय लोकांचे साधन आहे. सत्याग्रह हिंसेला नकार देतो. सत्याग्रहामध्ये स्वबलिदाना द्वारे अन्याय करणार्याला त्याच्या कृतीची जाणीव करून देण्यात येते.

**सत्याग्रहाचा हेतू** –

चर्चेने, समजुतीने, आत्मबलाने, स्वबलिदानाने लढा देण्याची अहिंसात्मक पद्धती आणि संघर्ष सोडविण्याची प्रक्रिया म्हणजे सत्याग्रह होय. त्यामध्ये अन्याय करणार्यांच्या मनामध्ये हृदयपरिवर्तन करणे हे उद्दिष्ट असते.

**सत्याग्रहाची तत्त्वे –**

१) **स्व नियंत्रण** – वचार, उच्चार, कृती यावर सत्याग्रहीचे संपूर्ण नियंत्रण असावे लागते. गांधींच्या मते, व्यक्तीचे स्वतःच्या विचारावर पूर्ण नियंत्रण असेल तर ती व्यक्ती यशस्वी ठरते. सत्याग्रह करताना आचार विचार कृती यावर नियंत्रण असते.

२) **भयमुक्तता** – सत्याग्रहीच्या अंगी भीती असता कामा नये. सत्याग्रही मृत्यू , तुरुंगवास इ. कोणत्याच गोष्टींना घाबरणारा असू नये. म्हणूनच सत्याग्रह हे, शुरांचे साधन आहे असे म्हटले जाते.

३) **मालकी नसणे –** सत्याग्रह करणार्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा लोभ असता कामा नये. तसेच सत्याग्रहीला स्वतःचे शरीर, वेळ, ताकद समाजाच्या हितासाठी वापरण्याची तयारी असावी लागते. सत्याग्रहीची लोभी वृत्ती असू नये. सत्याग्रहींनी संचय ठेवण्याची वृत्ती असू नये.

४) **शारीरिक श्रमाची तयारी** – सत्याग्रहीकडे कष्ट करण्याची श्रम करण्याची तयारी असावी. त्यांनी आपला वेळ विधायक कामासाठी वापरावा. शारीरिक श्रम करणे ही सर्वात मोठी समाजसेवा आहे असे गांधींचे मत होते.

५) **स्वदेशी** – आपल्याच देशात तयार होण्याच्या वस्तू वापरणे म्हणजे स्वदेशी होय. या मार्गाचा वापर करून आपली सेवा देशाला देणे.

६) **नमुना -** नमुना ह सत्याग्रहीचा मोठा गुणधर्म आहे. म्हणून सत्ता, पैसा, दर्जा यांचा गर्व असणारी व्यक्ती सत्याग्रह करू शकत नाही.

७) **आत्मशक्ती** – आपापसातील समजुतीने संघर्ष सोडविण्याची प्रक्रिया म्हणजे सत्याग्रह होय. त्यासाठी सहनशक्तीची गरज असते. आत्मशक्तीने सहनशीलता येते. आत्मशक्ती असणारी व्यक्ती सत्य, अहिंसा आणि बलिदान या मार्गाने आपले उद्दिष्ट साध्य करते.

**सत्याग्रहाचे मार्ग –**

१) **असहकार** – १९२० साली राष्ट्रीय स्तरावर शासनाला विरोधी आणि प्रतिकार करण्यासाठी म. गांधींनी असहकार चळवळ उभी केली. १९१९ या ब्रिटीश शासनाने दडपशाही करणारा रौलेट कायदा आणि जालियानवाला बाग हत्याकांड या घटनांचा निषेध करण्यासाठी ही चळवळ सुरु करण्यात आली. या चाळवळीत अनेक नेत्यांनी पदव्यांचा त्याग केला, शासकीय नोकर्या सोडल्या, कर दिले नाहीत, शाळा, न्यायालय यांवर बहिष्कार टाकण्यात मात्र अशाचप्रकारे सर्व बाजूंनी ब्रिटीशांचे सहकार्य बंद केले. भारतीयांच्या सहकार्याशिवाय शासन चालू शकणार नाही. हे या सत्याग्रहात लोकांनी ब्रिटिशांना दाखून दिले.

२) **सविनय कायदेभंग** – कायद्याचा आदर न करणे किंवा कायदा मोडणे म्हणजे सविनय कायदेभंग होय. सविनय कायदेभंग म्हणजे उघडपणे मुद्दाम अहिंसात्मक मार्गाने कायदा तोडणे किंवा कायद्याचा भंग करणे होय. जेव्हा लोक एखाद्या अन्यायी कायद्याला घटनात्मक मार्गाने प्रतिकार करतात, तरीही शासन त्याकडे लक्ष देत नाही. अशावेळी लोक सविनय कायदेभंग या साधनांचा उपयोग करतात. कायदे करताना शासन लोकांच्या सूचना आणि मागण्याकडे दुर्लक्ष करते, शासकीय धोरणे लोकांच्या विरुद्ध असतात. तेव्हा सविनय कायदेभंग केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

सविनय कायदेभंगमध्ये दोन कृतींचा समावेश होतो. १)शासनाने मनाई केलेली कृती करणे. २)शासनाने आवश्यक केलेली कृती न करणे. एखादी गोष्ट किंवा कायदा शासनाने मनाई केलेला असेल तरीही लोकांनी ती कृती करणे किंवा एखादी कृती किंवा कायदा आवश्यक आहे अशा शासनाचा आदेश असेल तरीही लोकांनी ती कृती न करणे, यालाही सविनय कायदेभंग म्हणतात.

३) **हरताळ –** विशिष्ट समस्या किंवा प्रश्नांवर लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सबंधित काम करणे थांबविणे म्हणजे हरताळ होय. अशावेळी दुकाने , हॉटेल्स, उद्योग बंद ठेवणे आणि जुलमी कायद्याला विरोध दर्शविणे म्हणजे सुद्धा हरताळ होय.

४) **बहिष्कार** – असंमती आणि विरोध करण्याचा एक मार्ग म्हणजे बहिष्कार होय. म.गांधींनी निरनिराळ्या कारणासाठी भारतात आणि द.आफ्रिकेत या साधनाचा उपयोग केला होता. उदा. परदेशी वस्तू, शासनाने दिलेल्या पदव्या इ. वर बहिष्कार टाकला होता. बहिष्काराचा मुख्य उद्देश म्हणजे शांततापूर्ण मार्गाने एखाद्या गोष्टीचा निषेध करून अन्यायी शासनाला सहकार्य करणार नाही असा संदेश देणे .

५) **शांततापूर्ण धरणे** – जी गोष्ट लोकांना मान्य नाही अशा गोष्टीसाठी धरणे धरतात. सत्याग्रहाच्या या तंत्रामुळे अन्याय व जुलूम करणार्यांवर सामाजिक आणि आर्थिक दबाव आणण्यात येतो. त्याला न्याय देण्यास भाग पाडण्यात येते, अशा वेळी लोकांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण केली जाते.

६) **उपोषण** – सत्याग्रहीचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे उपोषण होय. उपोषण सर्वात शेवटचा व अंतिम मार्ग आहे. योग्य आणि न्याय कारणासाठी उपोषण केले जाते. उपोषण करणाऱ्यामध्ये परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा व व्यक्तीमध्ये आत्मशक्ती हवी. त्याच्यामध्ये मृत्यूचेही भय असता कामा नये. व्यक्तिगत स्वार्थासाठी या मार्गाचा अवलंब करू नये. असे म.गांधींचे मत होते.

७) **अटक करवून घेणे** – अन्यायी कायद्याला विरोध करण्याचे सत्याग्रहाचे आणखी एक साधन म्हणजे कायदा मोडून मुद्दामहून स्वतःला अटक करवून घेणे होय. कायद्याला विरोध करण्यासाठी अशी कृती केली जाते. शासनाने न्याय द्यावा हीच यापाठीमागची मुख्य भूमिका असते. उदा. भारताच्या स्वातंत्र्य लढयामध्ये अनेक लोकांनी स्वेच्छेने अटक करवून घेतली होती.


८) **अर्ज, रॅलीज, निदर्शने , विनंती** – सत्याग्रहाचा हा प्रकार सौम्य स्वरूपाचा आहे.साधारणपणे घटनात्मक मार्गाने, पत्रके काढून, भाषणे करून, पोस्टरे काढून, मोर्चे काढून शांततेने निषेध करण्यात येतो. कायदे अन्यायी आहेत हे दाखविण्यासाठी अशा प्रकारचा निषेध करण्यात येतो.

## ५.६ निष्कर्ष

भारतात म. गांधींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाच्या मार्गाने स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला. लोकशाही शासनपद्धतीने अन्याय, दडपशाही, जुलूम इ.चा प्रतिकार करण्यासाठी सत्याग्रहाचे तंत्र उपयोगात आणले जाते. आज सर्वच लोक या तंत्राचा अवलंब करताना दिसतात

## ५.७ सारांश

**तक्ता**


प्रतिकाराचा हक्क
१) अर्थ
२) कारणे
३) अटी
४) मार्ग
१)अन्याय
२)असमानता
३)जुलूम
४)सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण
५)नैसर्गिक हक्क संरक्षण
हिंसात्मक
अहिंसात्मक
क्रांती
सत्याग्रह
१)विशिष्ट परिस्थितीत
२)अंतिम मार्ग
३)घटनात्मक मार्गाच्या अवलंबानंतर
४)परिणाम लक्षात घेऊन
५)शांततामय मार्गाने

❖❖❖❖